Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४८ ] आकोला-- सोमवार तारीख ६ माहे एप्रील सन १९१४ इ० अंक १३

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठुडें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.


### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ G. A. Phillips. एजंट
नं १

### मुंबई बँकचें सोनें.


मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६¼ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत व जारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० G. A. PHILLIPS. एजंट
नो० नं० २

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगात दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० ग्रेप्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकी किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्हीपीनें रु० १०६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी
नो० नं० ३

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानातील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तात्बडतोब दूर होतात. किं रु. १०८

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दु[illegible] व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे[illegible]ली लेबोरेटरी दादर, मुंबई य[illegible]त.
नो[illegible] ४

### [illegible]वयाचा आहे.'

[illegible]वोल, पूर्वीच्या डिस्ट्रिक्ट कोर्टा-[illegible] कै॥ राव बहादूर पुरुषो-[illegible]ण भट यांचा बंगला विका

खंडवा ते इंगोली व्हाया वाशीम लोकर रेल्वे लाईन ओपन होणार असल्यानें गरजूनीं किंमती वगैरे विषयीं समक्ष किंवा पत्रद्वारें खालील पत्यावर खुलासा मागवावा.

ना० खं० फडके
वऱ्हाड समाचार ऑफीस आकोला
नो० नं० ५ वऱ्हाड

### खिजाबे मसीहा ( कलप )

हा लावला असतांना पांढरे केंस ५ मिनीटांत काळे होतात इतकेंच नव्हे तर अगदीं मृदु होऊन तकाकी देतात. हा कलप बरेच दिवस टिकून कलप लाऊन केस काळे केले आहेत असा भासच होत नाहीं. एकदा अनुभव पहावा. पेटीस १ रु. व्ही. पी. खर्च निराळा.

**खाकीसास जनावे टानिक पिल्स** या योगें नपूंसक मनुष्य तेव्हांच बरा होतो. औषधाचा गुण ३ दिवसात कि. रु. २ व्ही. पी. खर्च निराळा.

**खाकीसास तिल्लाये मसिहा.** इंद्रियाच्या ढीलेपणावर आश्चर्यकारक खात्रीचा इलाज. तीन दिवसातच सदहू औषध आपला गुण दाखवितें. कि. रु. २ व्ही. पी. खर्च वेगळा.

शेट हरकचंद रतनजी आणि कंपनी.
३७ जुमा मसजिद मुंबई
नो० नं० ६

### चांदीचीं भांडीं.
### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ७

### मोठेंच आश्चर्य

खरुज, गजकर्ण खवडा वगैरे कोणत्याही त्वचाविकारावर मलम ८ डझन डब्यास ट० खर्चासह ३ रु० १ डबी १ मनुष्यास पुरेल. दंतमंजन, केशनाशकपूड, किं. २ आणे लहान मुलांचा डबा, डांग्या खोकला, अजिर्ण या विकारावर पूड किं० प्रत्येकीं ४ आणे. वातनाशकतेल २ दिवसांत ठणकणे वायूची चमक, संधिवाताचे सांधे धरणें दुरस्त होते, किं० १२ आणे. प्रमेह उपदंशावर ग्लीटवर रसायन नाहीं पथ्य नाहीं ७ दिवसांत पूर्ण गुण किं० ३ रु० पोटझोंबीवर ५ मिनिटांत गुण किं० ८ आणे. कॉलरा हागवण पोटशूळ अजिर्णावर अस्सल कर्पूर व शेपचा अर्क ४ आणे वि० ख० पत्रद्वारें.

व्ही. आर. मुळे नांदुरा
जी. आय. पी.
नो० नं० ८

### महाराष्ट्र साहित्य पत्रिका.

साहित्यपरिषदेची ही मासिकपत्रिका आगष्ट १९१३ पासून सुरू झाली आहे. या पत्रिकेंत मराठी साहित्याची चर्चा प्रसिद्ध होत असते. इतर देशी भाषांतील साहित्य प्रयत्नाचीही माहिती वेळोवेळ देण्याचा उद्देश आहे.

तूर्त १२ पानांची ही पत्रिका विविधज्ञानविस्तार या मासिक पुस्तकास जोडून निघते; आणि दोन्ही मिळून (पृष्ठें ०६) परिषदेच्या सभासदांस अडीच रुपयांस मिळतात. ज्यांस फक्त पत्रिकाच पाहिजे असेल त्यांस ती एक रुपया वार्षिक वर्गणीनें मिळेल. टपाल खर्च वेगळा — आणे चार.

पत्रिकेचे हा वेळपावेतों निघालेल्या पांच अंकांचें पुस्तक परिषदेच्या सभासदांस सहा आण्यांस मिळेल. पुस्तक "म्यानेजर," विविधज्ञानविस्तार, काळबादेवी पोस्ट, मुंबई या पत्यावर व्ही. पी. नें मागवावें.
नो० नं० ९

### NATIONAL MEDICAL COLLEGE OF INDIA SCHOLARSHIPS.

Registered as a corporate body under Act XXI of 1860 of the Acts of the Viceroy teaches the full curriculum of L. M. S. & M. B. Standards, classes.

Grants L. M. S. ( Natl ) & M. C. P. S. Diploma Hospital Practice College Fee Rs 3 monthly Dissections Boarding.

Scholarship offered by the Founder Dr. S. K. Mullic Rs. 50, 40, 30, 25, for Matriculates and non-Matriculates College Council Hon'ble Maharaja of Cassimbazar, Rajah Peary Mohun Mukerjee Bahadur C.S. I. Honble Justice A. Chaudhury. The Session begins January and June. Apply to the DEAN 301, Upper Circular Road, Calcutta.

No. No. 10

## नोटीस

रा. नारायण हरि खाकडे वस्ती बाभुळगांव यांसः—

माझा असिल तुळसीराम पांडू रा० बाभुळगांव यांजकडून तुम्हांस नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही माझे असिलाची आई बाई सकू मर्द शिवराम पासून ता. ३०-५-१९१० रोजीं तिचें मौजे टांकळखेड ता. बाळापूर येथील शेत सर्वे नं० २३ यांतील दोन त्रितियांश हिस्सा सन १९१० ते १९१६ असे ७ वर्ष पर्यंत वहीतीस पट्टयानें घेतलें व त्याचे स्वामित्वाबद्दल सन १९१२ ते १९१६ असे ५ वर्ष पर्यंत दरसालच्या १ ली जान्युआरीस ( ३५-१०-० ) पस्तीस दहा आणे देण्यास कबुलायत लिहून दिली. व तारखेवर रुपये नदिल्यास दरमहा दरशेंकडा रु. दोन प्रमाणें व्याज देण्यास लिहून दिलें.

अद्यापि सन १९१२-१३ व १४ असे तीन सालचा भाडा तुम्ही दिला नाहीं.

माझे असिलाची आई मरण पावली असोन माझे असिला कडून तुम्हांस नोटीस देण्यांत येते कीं दरसाल रु. ३०-१० प्रो॥ सदर्हू तीन सालचा भाडा रु. १०६-१४-० व ठरलेल्या तारखे पासून रक्कम माझे असिलांस मिळेपर्यंत व्याज वर दरमहा दरशेंकडा रु० दोन प्रमाणें व्याज माझे असिलास ही नोटीस पावल्यावर ४ दिवसाचे आंत पोंचते करावे. तसें न केल्यास माझा असिल तुम्हावर योग्य कायदेशीर इलाज घेईल व ह्या नोटीशीचा खर्च तुम्हावर आकारला जाईल हें कळावें.

आपला

किं. च. मश्रुवाला वकील.

नो. नं. १६

## नोटीस

नोटीस बेशमी नरशा वलद व्यंकटी जात बेलदार आडनांव मुतलवार राहणार वणी हल्लीं राहणार मारेगांव प्रगणें मार्डी तालुके वणी जिल्हे यवतमाळ यासः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तू माझा लग्नाचा नवरा असोन ** झाल्यास आंदाज १२ वर्षे झालीं असतील. तेव्हां पासोन दोन चार वेळां मी तुझे घरीं गेले व तूं नेलेस त्यानंतर अलीकडे १० वर्षां पासोन तूं मला नेत नाहीस व नांदवीत नाहीस याचें कारण समजत नाहीं. शिवाय मजला मारहाण करतोस त्यामुळें मी लाच्यार होऊन मायबापाचे घरीं राहून लोकांचें कर्ज काढून आपला निर्वाह करीत आहे. तेव्हां तुला या नोटीसीनें कळवीत आहे कीं, मी सज्ञान झाले पासोन अलीकडील तीन वर्षांत सावकार लोकांचें कर्ज रुपये दोनशे २०० घेतले आहेत. पोटखर्चास ते देऊन ज्याच्या त्याच्या पावत्या मजला आणून द्याव्या आणि मी चांगले प्रकारें चार चवघाचे रीती रिवाजा प्रमाणें नांदवीन मारहाण करणार नाहीं असे प्रकारचा लायक जामीन रुपये १००० चा देऊन त्या जामीनदार यानें मला करारनामा रजीष्टर करून द्यावा ह्मणजे मी येण्यास व नांदण्यास तयार आहे मजकडून नांदण्यास कोणत्याच प्रकारची हरकत नाहीं असे तुजकडून नोटीस पावले पासोन एक महिन्यांत न झाल्यास हीच फारकती समजून मी दुसरा पाटाचा नवरा करीन. मग मजवर तुझा हक्क व मालकी नवरे पणाबद्दलची राहणार नाहीं. अगर नोटीस न घेतां वापस केलेस हीच फारकती समजून पाट लावीन मग पाट लावणार याजवरही तुजकडून कायद्या प्रमाणें कांहीं करण्याचा हक्क राहणार नाहीं ही नोटीस दिली असे तारीख २८।३।१४ ई.

द० धोंडो सखाराम पेनशनर नाजर रा० दर्णी खुद

सही

भागीर्थी मर्द नरशा जात बेलदार आडनांव मुतलवार रा० वणी इचे हातची निशाणी बांगडी असे. द. वर प्रमाणें असे.

नो. नं. १७

## नोटीस

नोटीस बेशमी नरसू मर्द पापन्ना कोंपली तेलंगी रा. हल्लीं बुलडाणा गवळीपुरा तालुका चिखली जिल्हा बुलडाणा ईसः—

मी खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी लग्नाची बायको असून आजमासे ३ वर्षे झालीं तुला येथून तुझ्या मावशीनें नेलें त्या नतर मी व माझे घरची मंडळी सात ७ वळां तुला आणण्या करितां आलो परतु तूं माझे घरीं नांदण्यास यत नाहीं व तुझे आईबापही पाठवित नाहीं. तरी तुजला नांदण्याचे असल्यास नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत माझे घरीं येऊन नांदावे. असे न केल्यास मी तुला पुन्हा माझे घरांत घेणार नाहीं. तुला मोकळे होण्याचे असल्यास माझे तुझ्या अंगावर असलेले डागीने लग्नास लागलेला खर्च व येण्या जाण्यास लागलेला खर्च सर्व देऊन माझे हातची फारकती घेऊन मोकळे व्हावे असें न केल्यास माझा लग्नाचा हक्क तुजवर कायम राहील व तुजवर दिवाणींत फिर्याद करून कोर्ट मार्फत वरील डागीनें व खर्च भरून घेतला जाईल कळावें ता॥ ३१।३।१४ इसवी दस्तुर शिवचरणसिंग परशरामसिंग रजपुतपुरा अकोला

सही

पापंना वा॥ नरसैया जा. तेलंगी गोसंगी रा० मंगळवारा रजपुतपुरा द. खु. आकोला पेठ.

नो. नं. १८

## नोटीस

नोटीस बेशमी ठानू वा॥ दानू महार रा. शिरसोली हल्लीं रा. राजेगांव ता० आकोट यांस—

खालीं सही करणार नोटीस देतो कीं तूं आमचा चुलता असून तुला जवळचे आम्हींच वारस आहोंत. अलीकडे महारकीच्या हक्काची काठी मौजे शिरसोली येथील त्वां कोणास विकण्याचा इरादा केलास असें कळतें. तरी आम्हीं तुला मरेपर्यंत अन्नवस्त्र देण्यास तयार असतां असें करण्यांत तुला काय फायदा आहे हें आम्हाला समजत नाहीं. तरी या नोटीशीनें कळवितो कीं त्वां हा काठीचा हक्क कोणास विकूं नये. विकल्यास त्याबद्दल कोर्टमार्फत योग्य तजवीज केली जाईल. व घेणारा फसेल तुला दत्तक घ्यावयाचा असल्यास आपले कुळांतील वाटेल त्या गृहस्थास घ्यावा याबद्दल आमची तक्रार नाहीं. परंतु हा काठीचा हक्क घराण्याचे बाहेर देऊं नये अशी आमची इच्छा आहे. कळावें ता० ३०-३-१९१४

सही

अमृता वा॥ रावजी महार द० खु०

ना० नं० १९

## जाहिर नोटीस.

सर्वत्र माळवी सोनार मंडळी यांसः-

आह्मी खालील सह्या करणारे पंचमंडळी याजकडून जाहिर नोटीस देण्यांत येते कीं वऱ्हाडांत मागें आपले जाती संबंधीं संमेलन झालें होतें; त्यामुळें आपले जातींत एक विचार न राहतां बेबंदशाई झाली आहे, तरी त्या संबंधी सुधारणा करण्याकरितां व शिवाय आणखी आपले जातीसंबंधीं कांहीं अधिक सुधारणा करण्याकरितां कांहीं प्रमुख मंडळींनीं मनावर घेऊन आपले जातीचें ( श्री सर्व माळवी सोनार जातीचे ) संमेलन बार्शीटाकळी मुक्कामीं श्री खोलेश्वरावर भरविण्याचा नेम मित्ती चैत्र वद्य ९ रोज बुधवार तारिख १५ माहे एप्रिल सन १९१४ इसवी रोजीं केला आहे; तरी ( माळवी जातीची पुनर्विवाहाची मंडळी सोडून ) बाकी सर्वत्र मंडळींनीं जरूर येऊन ज्या धर्म सुधारणा करणें असतील, त्याबद्दल आपलें मत द्यावें. जर आपले कोणत्याहि सबबीनें येणें झाले नाहीं तर सर्वानुमतें जातीसंबंधीं ठराव अगर नियम होतील ते तुम्हास कबूल आहेत असें समजले जाईल. मागाहून तुमची तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें ही विनंती ता० ३१।३।१९१४ इसवी.

व्यवस्थापक

१ किसन अंबादास सोनार राहणार बार्शीटाकळी द० खु०

२ देवीदास गणपत सोनार राहणार बाळापूरकर द० खु०

३ त्रिंबक आत्माराम सोनार बाळापूरकर द० खु०

४ तुळशीराम मारुती सोनार पाटखेडकर द० खु०

५ रामजी वा॥ मारुती सोनार मेडशीकर नि॥ खु. हातची असे धोंडु वा॥ बळीराम सोनार द० खु.

७ गणपत सोनार बाहड बार्शी टाकळी द० खु०

८ सखाराम वा॥ जयराम सोनार गुर्डीकर निशानी खुद द० धोंडु

नो० नं० २०

## नोटीस

नोटीस बेशमी रुस्तमखां पिरखां रा० सारगांव जहागीर पो० शेलगांवबाजार ता० मलकापूर जि० बुलडाणा यासः—

खालीं सही करणार नोटीस देतो कीं तुम्ही माझी बायको नामे अफझलबी हिची आई आजारी असतांना नेण्यास आले होते. आजारी असल्यामुळें मी तिला तुमच्याबरोबर पाठविले. जातेवेळेस तिच्या अंगावरील दागिने खालीं लिहिल्याप्रमाणें होते. —

तोड्याचा जोड १०० भार, पायांतील कडे ५० भार, पैंजन ३० भार, जोडवे १२ ताळ, सो. हलके चार तोळ २, सो. बाळ्या चार तोळा १, सो. वज्रटीक तोळा १. सो. चावलपोत तो. २. सो. चौकडा माशे ९, सो. नथ तोळा १ सा. बुलाख माशे ६ सोनें बुगड्या तो. १, दंडावरील कडे तोळे १० बाजूबंद तोळे ८, पोंचा तोळे १२, गजरे तोळे १२, पाकळ कडे तोळे ४, आरसी अंगुस्ताना तोळे ६ इ.

मी जनाब सलामखांभाईला पाठविले, परंतु आपण सांगितले होते कीं अद्याप तिची आई आजारी असल्यामुळें पाठवितां येत नाहीं. ह्याचप्रमाणें मी पुष्कळवेळां माझे नातेवाइकास आणण्यास पाठविलें, पण आपण त्या त्यावेळेस सबबी दाखवून पाठविलें नाहीं.

पुढें मी खानसा० काजी खाजाफयाजोद्दीन साहब यांच्याकडे जाऊन अर्ज केला. नंतर काजीसाहेबांनीं, हैदरखांसा०, मक्तेदार महमदमुनीरसा०, ज. अब्बासबेगसा०, ज. अबदुलअजीजसा०, मिस्तरी सय्यदअनवरसा० हे पंच तुमच्याकडे माझ्या बायकोस आणण्याकरित. पाठविले होते, परंतु तुम्ही त्यांच्याहीबरोबर पाठविलें नाहीं.

माझी बायको वयांत असून ३ इतके ज्या ह्या सबबी दाखवून पाठवीत नाहीं याचें कारण काय?

वरील लिहिलेल्या दागिन्यांपैकीं जर कांहीं दागिने आपण कांहीं सबबीमुळें गहाण वगैरे ठेवले असतील तर त्या दागिन्यास दोन महिन्यांतही दिले तर हरकत नाहीं. मी या नोटिसीच्याद्वारें कळवितो कीं माझ्या बायकोस एका महिन्याच्या आत पाठवून द्यावे. न पाठविल्यास मी कोर्टांत रितीप्रमाणें फिर्याद करीन.

सही.

अबदुस्समद फत्तेमहंमद मलकापूर

ना. नं. २१ द० खु०

## जाहिर नोटीस

सर्वत्र महार लोक मौजे शिरसोली ता० आकोट व इतरास

या जाहिर खबरीनें कळवितो कीं आमचा चुलता नाम ठान्या व० दान्या महार रा० सिरसोली हल्लीं राजेगांव हा आपला महारकीचा हक्क विकणार आहेसे ऐकतो. आह्मी त्याचे प्रत्यक्ष पुतणे असून त्यांस जन्म पर्यंत अन्नवस्त्र देण्यास तयार आहोंत. या काठीचे या गृहस्थाचे मागे कायदेशीर वारस आह्मी आहोंत. तरी कळवितो कीं वरील हक्क इसम मजकूरा जवळून कोणीही विकत अगर गहाण घेऊ नये. घेतल्यास त्याचे मोबदल्यांत दिलेले रुपये बुडतील. व असे बद्दल जे कागद पत्र होतील ते रद्द समजले जातील क० ता० ३०-३-१४

सही

अमृता वा॥ रावजी महार द. खु.

नो० नं० २२

वऱ्हाडसमाचार

मित्ती चैत्र शुद्ध ११ शके १८३६

## करन्सी कमिशनचा रिपोर्ट

हिंदुस्थानांत नाण्यासंबंधाची जी हल्लीं व्यवस्था आहे तिचें संशोधन करण्याची अवश्यकता आहे कीं काय याचा व त्याच प्रमाणें चांदीखरेदी व सोन्याची गंगाजळी या बाबतींत स्टेटसेक्रेटरीच्या इंडिया कौंसिलाच्या कारभाराविरुद्ध विलायतेंतल्या पत्रांतून कडकडून रण माजल होतें त्याचा विचार करण्यासाठीं मि. चेंबर्लेन यांच्या नेतृत्वाखालीं बसलेल्या करन्सी कमिशनचा साग्र रिपोर्ट आतां विलायतच्या पत्रांतून आला आहे. या रिपोर्टाचा सारांश मराठी वाचकांसाठीं देत आहों या कमिशनच्या एकंदर ३४ बैठकी झाल्या. पैकीं २३ बैठकींत साक्षीदारांच्या साक्षी घेण्यांत आल्या. रिपोर्टाचीं पृष्ठें ९६ आहेत. रिपोर्टावरून कमिशनचा रोख सध्याच्या स्थितींत परिवर्तन करण्यास प्रतिकूल आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें पाडणें व त्यांचा अधिक प्रचार करणें या दोन्ही गोष्टींपासून हिंदुस्थानच्या लोकांत सुखवृद्धि होणार नाहीं, उलट अपकारकच होईल. चांदीच्या नाण्याला त्यापासून धक्का बसेल ही भिती नाहीं, पण नोटांच्या व्यवहाराला धक्का बसेल अशी भीती कमिशनला वाटत आहे. हिंदुस्थानच्या लोकांना रोजच्या व्यवहारांत सोन्याच्या नाण्याचा उपयोग करण्याचा प्रसंग त्यांच्या दारिद्र्यामुळें क्वचित्च येतो, चांदीचीं नाणीं व फार तर दहापांच रुपयांच्या नोटा यांनींच त्यांचा व्यवहार चालतो. हिंदुस्थानांत हल्लीं जेवढीं सोन्याचीं नाणीं आहेत तेवढीं बेताचीं आहेत, ज्यादा नाणीं पाडण्यासाठीं सोन्याची टांकसाळ घालण्याचें प्रयोजन नाहीं. हिंदुस्थानच्या लोकांना सोन्याची टांकसाळ हवीच असली व हिंदुस्थानसरकार तिचा खर्च शिरावर घेण्यास तयार असलें तर एखादी लहानशी टांकसाळ काढून तींत फक्त पंधरा व साडेसात रुपये किंमतीचीं दोन नाणीं पाडावीं. सरकारनें लोकांची मागणी पुरी करावी पण नोटांच्या व्यवहाराला धक्का न लागूं देण्याची खबरदारी घेणें त्यांचें कर्तव्य आहे. हें सोन्याच्या नाण्यासंबंधानें झालें. सोन्याची गंगाजळी विलायतेंत ठेवावी किंवा हिंदुस्थानांत या संबंधानें गतवर्षी याच दिवसांत मोठा वाद चालला होता. या संबंधांत कमिशनचा अभिप्राय असा आहे हिंदुस्थानाला सोन्याचा संग्रह करण्याची जरूरी आहे खरी, पण हिंदुस्थानच्या लोकांच्या हातांत तो संग्रह जाण्यापासून हिंदुस्थानच्या, सांपत्तिक शक्तीला मदत होईल हा भ्रम आहे. हा संग्रह विलायतेंत स्टेटसेक्रेटरी साहेबांच्याच हातांत राहण्यापासून हिंदुस्थानचें हित आहे. हिंदुस्थान सरकारची विलायतेंतली बिलें चुकतीं करण्यास या गंगाजळीचा उपयोग होईल ह्मणून ती विलायतेंतच असणे हितावह आहे.

सरकारी बँक काढण्या संबंधानें कमिशननें आपला निश्चित अभिप्राय दिलेला नाहीं. कमिशननें येवढेंच ह्मटलें आहे कीं या संबंधांत कित्येक सभासदांचे अभिप्राय उशीरानें हातीं आल्यामुळें या विषयीं कांहीं निर्णय करतां येत नाहीं. तथापि हा प्रश्न महत्वाचा असल्यामुळें व्यवहार शास्त्रज्ञ अशांची कमिटी नेमण्याची शिफारस कमिशननें केली आहे.

कमिशनच्या रिपोर्टाच्या या सारांशावरून सरकार या प्रश्नाचा निकाल कशा रितीनें लावील त्याचा कांहीं अंदाज करतां येतो. सोन्याची टांकसाळ हिंदुस्थानांत जोरानें चालविण्याची आतां बिलकुल आशा नाहीं. नोटांच्या व्यवहाराला आतां विशेष उत्तेजन मिळेल. हिंदुस्थान सरकारचे मुख्य फडनीस बजेट तयार करतांना तर्कशास्त्राचे जे विचित्र विलास दाखवितात. त्यांना कांहीं आळा घालण्यांत यावा असेंही कमिशननें सुचविलें आहे. तसेंच सरकारी वर्ष मार्च अखेर संपतें, तें यापुढें आक्टोबर अखेर किंवा दिसेंबरमध्य संपावें वगैरे कित्येक किरकोळ सूचनाही कमिशननें केल्या आहेत.

## तिबटावरलें संकट

आमचे उत्तरसीमेवरील शेजारी तिबेटन लोक नाना प्रकारच्या संकटांत आहेत. एकीकडे चीनचें सरकार तिबेटवरलें आपलें स्वामित्व परत मिळविण्यासाठीं तयारी करीत आहे. दुसरीकडे इंग्रज लोकांच्या अधिकाराचा प्रश्न आहे. याचवेळीं खुद्द घरांतल्या घरांत लामालामामध्यें भांडणें सुरू आहेत. एक पक्ष चीनचा अधिकार नको ह्मणणारा व दुसरा त्याचें स्वामित्वाखालीं राहूं इच्छिणारा. अशा विपत्तींत आणखी एका गोष्टीची भर नुकतीच पडल्याची खबर आली आहे. ती अशी— गतवर्षी चीन व तिबेट यांच्यामध्यें लढाई चालली होती तेव्हां तिबेटांत राहणाऱ्या कित्येक नेपाळी व्यापाऱ्यांचें नुकसान झालें होतें हें त्यांचें नुकसान भरून द्या अशी नेपाळ सरकारनें तिबेट सरकारकडे मागणी केली. पण तिबेट सरकारनें तिकडे लक्ष दिलें नाहीं. त्यावर नेपाळनें चीनकडे दाद मागितली. त्यावर चीन सरकारनें उत्तर दिलें कीं चीन सरकार पुन्हां स्वारी करून तिबेट आपल्या ताब्यांत घेईल तेव्हां तुमच्या मागणीचा विचार करण्यांत येईल. या उत्तरानें समाधान न होऊन नेपाळ सरकारनें आपली फौज तिबेटच्या सरहद्दीवर पाठवून तिबेटसरकारला सांगून पाठविलें कीं नेपाळी व्यापाऱ्यांच्या नुकसानीची भरपाई लवकर न झाल्यास आमची फौज हद्द ओलांडून तिबेटांत येईल. हा निर्वाणीचा निरोप ऐकून लामासाहेबांची घाबरगुंडी उडाली आहे. लामानें आपल्या अधिकाऱ्यांना हुकुम केला आहे कीं सदर नेपाळी व्यापाऱ्यांच्या मालावर घेण्यांत येणाऱ्या जकातींतून त्यांच्या नुकसानीची भरपाई करावी. ही जकातीची रकम नुकसानीची भरपाई करण्याइतकी मोठी असल्यास लवकरच शांतता होईल. पण तसें नसल्यास व आपल्या खजिन्यांतून सदर नुकसान भरून देण्यास लामा तयार न होतील तर नेपाळ व तिबेट यांच्यांत लवकरच युद्ध जुंपण्याचा संभव आहे.

## गुरुशिष्यसंबंधाची दुसरी अवस्था

### -पूर्वार्धाचा उपाग्घात-

(अंक ७ वरून पुढें चालू)

आह्मी बरेच वेळां लिहून चुकलो आहों कीं हा लेख कोणत्याही रितीनें कोणाचाही उपहास करण्याच्या बुद्धीनें लिहिलेला नाहीं जे आपल्या विद्येनें पूर्णत्वानें अगर स्वार्थनिरपेक्ष बुद्धीनें दुसऱ्याचें कल्याण करूं इच्छितात असे गुरुही या लेखामधून वगळलेले आहेत. पुनः अशा गुरूच्या धवल यशास कोणी कितीही नांवें ठेविलीं तरी कांहीं मलीनता येईल हें शक्यच नाहीं. अशा गुरूच्या योगानें संपूर्ण जगाचें कल्याण होत असतें त्यास मानापमानाची विषय वासनेची अहंकाराची बाधा कधींच होत नाहीं. ते इतके दयार्द्र असतात कीं त्यांच्या सदिच्छेनें आणि नुसत्या आशीर्वादानें सर्व जगाचें कल्याण होत असतें व हाच अर्थ '**जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति**' या सदुक्तीचा आहे. यांच्या नुसत्या अस्तित्वानें सर्व जगाचा व्यवहार चाललेला असतो. अशा गुरूचें अगर संताचें नुसतें दर्शन ज्यांस घडत असेल किंवा घडलें असेल ते खरोखर धन्य आहेत. '**आपणा सारिखे करिती तात्काळ। नाहीं काळ वेळ- तयांलागीं ॥**' या सदुक्तीचा अनुभव अशा भाग्यवंतास संत दर्शन झाल्या बरोबर येतो. अशा संतांची थोरवी आमच्या सारख्या व्यवहारिक लोकांकडून गाइली जाणें शक्यच नाहीं. त्यांचा थोरपणा इतका पूजार्ह आणि वंदनीय आहे कीं त्याच मान्यतेच्या खालीं त्यांच्या महिम्यामुळं दुसऱ्या अनंत गुरूंचा उदय होतो. अशा गुरूंच्या मागें लोक लागतात ते तरी या महात्म्यांतील साम र्थ्यामुळें. खरेंच आहे कोणतेंही उच्चतत्व हजारों लोकांची आहुती घेतल्याशिवाय उदयास येत नाहीं. राम सत्यनिष्ठ होते, राजविद्या ऊर्फ ब्रह्मविद्या पारंगत होते त्यांस ब्रह्मविद्येचा विजय करण्यासाठीं किंवा आर्य अनार्य संमेलन करण्यासाठीं किंवा यज्ञयागादि क्रियांवर निवळ शील, स्वभाव आणि वर्तन यांनीं विकास पावणाऱ्या अध्यात्म विद्येचें वर्चस्व स्थापण्यासाठीं किती कष्ट भोगावे लागले, किती अनार्य ब्राह्मणांचा वध करावा लागला याची सर्वांस कल्पना होण्यासारखी आहे. त्यांच्या नांवावर नुसतें नाव घेतल्यानें हल्लीं किती लोक आपला उदरनिर्वाह करून घेत आहेत हें आपण पहातच आहों. भगवत् प्राप्तीच्या मार्गांत मनुष्य चुकण्याचा संभव आहे ह्मणूनच दुर्बल मन प्रबल मनाचा आलंब घेत असतें अशा आलंबाचेंच नांव **श्रद्धा**. हा आलंब जेवढा दुर्बल मन प्रबल मनास मानतें, प्रबल मनावर पूर्ण विश्वास ठेवतें, प्रबल मनापासून आपणास उदात्त आणि पवित्र तत्वांशिवाय दुसरें कांहींच मिळणार नाहीं असा विश्वास धरतें तेवढाच शक्य आहे. अशा वेळीं दुर्बल मनास हेंही समजत असतें कीं प्रबल मनाच्या पूर्ण योग्यतेस पोहोंचण्यास आपणास पुष्कळ अवधि आहे. व पुष्कळ साधनें केलीं पाहिजेत ह्मणूनच सर्वेतामुखीं '**गुरु करसो नहीं करना। गुरु कहेसो करना**' हा महत्त्वाचा ज्ञानसिद्धांत सांपडतो. याचे उलट याज्ञवल्क्यस्मृतीमध्यें याज्ञवल्क्य मैत्रेयीस ह्मणतात. **गुणदोषान् पर्यालोच्य । गुणः बुधैः ग्राह्याः नदोषाः'** या दोन सिद्धांतांचा सकृत् दर्शनी परस्पर विरोध आहे असें भासतें परंतु विरोध नाहीं. पहिला सिद्धांत क्रियेसंबंधानें आहे. गुरु सिद्धावस्थेंत असतो. त्याला शिष्यास कोणतीं कर्में उचित आहेत. व इष्ट आहेत हें सांगण्याचें सामर्थ्य असतें ह्मणून गुरुवचन पाळावें. त्याच्या कृतीचें अनुकरण करूं नये. याज्ञवल्क्यस्मृतींत गुण स्वीकारावयाचे असतील तर ते कोणापासूनही केव्हांही गुण आणि दोषाचें नीट निरिक्षण करून दोषांस त्यागून गुण स्वीकारावेत असें सांगितलें आहे. याच सूत्राच्या मुळाशीं गुणदोष पाहिल्याशिवाय ह्मणजे प्रत्ययाशिवाय गुरु केल्यास उभयतां गुरुशिष्य नरकाप्रत जातात असा सिद्धांत आहे. सिद्धांत ह्मणजे अपवादानें कधींही बाधित नहोणारें सत्यतत्व. ज्या सिद्धांतास अपवाद आहे तो सिद्धांतच नव्हे. हिंदुस्थानांत असे सिद्धांत आबालवृद्धांच्या मुखीं आहेत परंतु ज्यावेळीं हे सिद्धांत निश्चित केले गेले त्यावेळेपासून आपण इतके दूर आलेंत कीं त्या वेळेच्या आणि हल्लींच्या स्थितींत अज्ञानामुळें मृतभाषेमुळें पारतंत्र्यामुळें धर्म भोळसरपणामुळें इतकें अंतर पडलें आहे कीं या सर्व सिद्धांतांचा मेळ घालणें देखील अशक्य झालें आहे. असे परस्पर विरोधी सिद्धांत अनंत आहेत त्यांतील दहाच आह्मी निवडतो.

| | |
|---|---|
| अ | अहिंसा परमोधर्मः / जीवो जीवस्य जीवनम् |
| आ | व्यवहारांत परतंत्र परंतु परमार्थांत एक व्यवहार तोच परमार्थ. |
| इ | नहि सत्यात् परोधर्मः / शठंशाठ्ये समाचरेत्. |
| ई | आडांत नाहीं तर पोहऱ्यांत कोठून येईल. / गुरु केल्यावांचून ज्ञान नाहीं. / देवता मोक्ष देऊं शकत नाहीं. / मोक्ष ज्ञानानेंच होतो. |
| उ | माया त्रिगुणात्मक आहे, ती दुर्लंघ्य आहे ती आवरली पाहिजे. |
| ऊ | बायकोचा गुरु पतीच आहे. अन्य पुरुष भ्रात्यासमान आहेत पण त्यांनाही गुरु जरूर पाहिजे. |

वरील उदाहरणादाखल घेतलेल्या परस्पर विरोधी सिद्धांतांत बाधकपणा कोठेंच नाहीं परंतु हा एकेवेळीं सर्वांस सुगमविरोध आतां नुसतें समजणेंच कठिण झालें आहे इतकेंच नाहीं तर त्याच विरोधाच्या पायावर कैक लोक आपला अकल्पनीय अधमपणा छपवून टाकतात. असो. या सिद्धांतांतील विरोध कसे भ्रामक आहेत आणि वस्तुतः नाहींतच हें पाहूं.

**अ – अहिंसा परमोधर्मः** या ठिकाणीं **हिंसा** यो पदाचा अर्थ दुसऱ्यास कसल्याही प्रकारची इजा मग ती शारिरिक असो अगर मानसिक असो. हिंसा शब्दाचा अर्थ न

कळल्यानें विरोधसा भासतो. **जीवो जीवस्य जीवनम्** या ठिकाणीं जीवाचें रक्षण जीवाच्याच योगानें होतें. यास आधार - **यदन्नेनाऽतिरोहाति** "{ कारण तो अन्नाच्या योगानें वाढतो. सर्वच वस्तु जीवमय अतएव चैतन्यमय अतएव परमात्ममय आहेत ह्मणून जीवाचें पोषण जीवानेंच होतें हा अर्थ आहे. ह्मणजे जीव जीवाच्या योगानें आणि दुसऱ्या कोणत्याही अयोगानें राहतो. यात जीव कोणाचीच हिंसा करूं शकत नाहीं हें उघड आहे. यासाठीं **अहिंसा परमोधर्मः** यांतील हिंसा शद्बाचा अर्थ आह्मी वर केला आहे तसाच घेतला पाहिजे.

**आ** — व्यवहारातील पारतंत्र्य श्रमविभागामुळें आणि पूर्वजाच्या विद्या भांडारामुळें प्रत्येकास अनुभवतां येतें. व्यवहारिक पारतंत्र्यामुळेंच मनुष्य नीतिशास्त्राचे नियम पाळतो. जेव्हेळीं जीव भूतांस पृथक् भावानें पहातो तेव्हा व्यवहार सुरू होतो. ज्यावेळीं तो आत्मोद्धाराची खटपट करितो तेव्हां त्याचा परमार्थ सुरू होतो. परमार्थ बीज कोणत्याही सद्गुणाचा नेटानें आश्रय घेण्यात आहे. सद्गुणाचा अभ्यास करीत असता जीं संकटें आणि विघ्नें येतात त्यांतून न डगमगणें हे मात्र प्रत्येकाच्या मानसिक सामर्थ्यावर अवलंबून आहे.

**'मात्रास्पर्शास्तु कौंतेय।**
**शीतोष्णसुखदुःखदाः।**
**आगमापायिनोऽनित्या।**
**स्तांस्तितिक्षस्व भारत॥**

खरें शौर्य, खरी सहिष्णुता, खरी एककार्यपरायणता दुःखें सहन करण्यांत आहे तीं टाळण्यांत नाहीं यासाठीं परमार्थ किंवा पुरुषार्थ साधावयाचा असेल तर प्रत्येकाची **तितीक्षा** च त्यास मदत करील. ही ज्याची त्यास. यांत मनुष्य परतंत्र राहूं शकत नाहीं ह्मणून जरी व्यवहारांत एकाचें दुसऱ्या वांचून अडतें तरी परमार्थ साधणें प्रत्येकाच्या **तितीक्षा** शक्तीवर आहे ह्मणजे मनोव्यापारांत प्रत्येक स्वतंत्र आहे. व्यवहार आणि परमार्थ एक हा सिद्धांत स्पष्ट आहे. परमार्थ ह्मणजे ज्ञानव्यवहार ह्मणजे विज्ञान. जो परमार्थ मनुष्यास बोलण्यांत मोहक तत्वें शिकवीत असेल पण व्यवहारात त्याचे उलट वागावयास लावीत असेल तो परमार्थ खोटा आहे असें साधकानें समजावें. हाच या सिद्धांताचा मतलब आहे.

सत्य हा सद्गुण आहे. शाठ्य हें वर्तनावरून ओळखण्याजोगें आहे. सत्य दृश्य नाहीं अनुमेयही नाहीं. शाठ्य दृश्य आहे व अनुमेय आहे. खरा धर्म सत्य आहे. सत्यानें वागणें जरूरीचें आहे. आपल्याशी कोणी शाठ्य करीत असेल तर आपलें वर्तन **शाठ्या** प्रमाणें त्यास वाटेल. **शाठ्य प्रसंगीं** ह्मणजे दुसरा आपल्याशीं लबाडीनें वागत असेल तर आपण त्यास शठा प्रमाणें वागत आहों असें दिसूं. **प्रिन्स बिस्मार्क** ह्मणत असे नेहमी खरें बोलावें. लबाड मनुष्यास दुसऱ्याचें बोलणें खरें असूनही खरें वाटावयाचेंच नाहीं ह्मणजे जेथें **शठभाव** असेल त्याठिकाणीं एकाद्याचें वर्तन कितीही सत्य असो तें शठाच्या वर्तना प्रमाणेंच आहे ह्मणजे शठतुल्य आचार चालला आहे असेंच शठांला वाटणार.

**ई**— संपूर्ण सर्व वेदांताचा पाया जीव आणि ब्रह्म एक आहेत या सिद्धांतावर रचलेला आहे. पूर्वी वेदांत ज्ञान गुरुगम्य होतें. मन आपल्या आकर्षण शक्तीनें अथवा मारानें आपलेकडे ओढून घेईल तो गुरु. तो मानव कायेंतच पाहिजे असें नाहीं. तो पुस्तक रूपानें, निसर्ग देवता नियम रूपानें, स्वप्रत्यय रूपानें असूं शकेल. त्याचा बोध होईल तो आपल्या जीवात्म्यास होईल. जीवात्म्यास बोध बुद्धीच्या द्वारें होतो. या सर्व सिद्धांताचा अर्थ प्रत्ययावांचून ह्मणजे अनुभवावांचून ज्ञान नाहीं. याठिकाणीं प्रत्यय आणि अनुभव हेच गुरु. प्रत्ययानुभवानें जें ज्ञान येतें त्यांपासून ज्ञात्यास कोणीही विमुख करूं शकत नाहीं. इतर सर्व ज्ञान तें

**" व्यर्थ भाराभर केलें पाठांतर।**
**जोंवरी अंतर शुद्ध नाहीं॥ "**

असेंच उर्फ वाचानक ज्ञान. गुरु फक्त मोक्ष देऊं शकेल, व्यवहारिक कामात गुरु कांहींच करूं शकत नाहीं. तो मनास शांति देईल. ज्ञान साक्षात्कारानें मनाची तळमळ मिटवील. मन खेचून घेऊन शिष्याची व आपली योग्यता एक करील परंतु हरवलेलें कोंबडे किंवा अशाच दुसऱ्या ऐहिक गोष्टी त्यास आणून देतां येणार नाहीं. अगर शिष्याचे घरीं पाणी भरणार नाहीं. अगर शिष्याचें स्त्रीत्व पत्करून तो शिष्याचे येथें सासुरवास काढणार नाहीं. अशा लीला फक्त देवताच करील. देव ह्मणतात माझे भाव अनंत आहेत. मी कामधेनु आहे जो ज्या दृष्टीनें मला आळवतो तीच त्याची भावना मी यथार्थ करून देऊन फक्त पूर्ण करतों.

**ये यथा मां प्रपद्यंते।**
**तां तथैव भजाम्यहम्॥**

हरएक देवतेचें स्तोत्र पहा. तिला मोक्षदायी करुणामयी, मंगलदायी, ब्रह्मरूपी इत्यादि विशेषणें आहेत. सद्गुरु किती झाले तरी पडले मनुष्य. त्यांना मोक्षदाते, ज्ञानी, ब्रह्मनिष्ठ इत्यादि विशेषणें लागतात मिळून गुरूपासून मिळतो कोरडा मोक्ष व देवतेपासून मिळतात मोक्ष आणि मोक्षेत्तर वस्तु. अपण कोण, काळ जन्मास आलों, आपलें इति कर्तव्य काय आपण भक्तीपूर्वक राहिलों तर आपलें आणि परमेश्वराचें तादात्म्य कसें होईल याची प्रतीति येणें यासच ह्मणतात ज्ञान. उघडच आहे हें झाल्याशिवाय ह्मणजे देवता साक्षात्कार किंवा ज्ञान साक्षात्कार झाल्याशिवाय ज्यास ज्ञान ह्मणतात तें ज्ञान होणें शक्य नाहा.

तसलें अनुभवजन्य ज्ञान जों पर्यंत नाहीं तों पर्यंत मोक्षही नाहीं.

**उ**— प्रथमतः माया त्रिगुणात्मक कशी. मायेचा संबंध व्यवहाराशीच आहे. व्यवहारांत कर्ता कर्म आणि कार्य किंवा सोप्या शद्बांत बोलूं गेलें असतां बोलणारा, ज्याच्याशीं बोलावयाचें असेल तो व जें कार्य घडवावयाचें असेल तें अशी त्रयी असते. बोलणारा सत्वगुण, कार्य रजोगुण ज्याचेशीं बोलावयाचें असेल तो तमोगुण अशी त्रयी असते. जेव्हां ज्याचेशीं बोलावयाचें असतें तो बोलूं लागतो तेव्हां तो सत्वगुण आणि प्रथमतःचा बोलणारा तमोगुण- या तिन्ही गुणाचें संमेलन होतें तेव्हां इष्टकार्य घडतें. मिळून स्थूलमानानें अगर सूक्ष्म मानानें सर्व दृश्यवस्तु एक त्रिगुणात्मक व्यापार चाललेला दिसतो ह्मणून माया त्रिगुणात्मक आहे.

हा माया शक्तिरूप आहे ही नुसती ओळखली जाते. हिचें सामर्थ्य प्रत्येकास भासतें व प्रत्येक इच्छा स्वाधीन असतो ह्मणून ही दुर्लंघ्य आहे. मुळीं जगच वासनेच्या योगानें ह्मणजे रजोगुणाच्या योगानें उत्पन्न झालें. सर्व वासना नष्ट करून परमार्थ प्राप्तीची वासना रात्रंदिवस ठेविली कीं आपोआप माया आवरली गेली. हीच कायती अट- ही अट न पाळिली कीं माया दुर्लंघ्य- **विषया विनिवर्तंते। निराहारस्य देहिनः॥ रसवर्जं रसोऽप्यस्य। परं दृष्ट्वा निवर्तते॥**

**ऊ**— हा सिद्धांत पुनः हातीं घ्यावा लागणार आहे. संपूर्ण रामदास सांप्रदाय, एकनाथ माणिकप्रभु आदि संतमंडळ, देवी भागवत प्रमाणानुमानानें श्रीमत् भागवत आणि इतर ग्रंथ स्त्रियाना षट्कर्णी भिद्यमान होणारा अतएव एकांतांत स्त्री आणि परपुरुष यांच्यामध्यें स्वीकारला जाणारा आणि दिला जाणारा मंत्रोपदेश शास्त्रविरुद्ध आहे. **पतिरेको गुरुःस्त्रीणाम्** येथें एकः याचा अर्थ **एव न काऽपि अन्यः** असा आहे. जरी स्त्रीचा गुरु पति आहे तरी त्यानें गुरु या नात्यानें आपल्या पत्नीस उपदेश दिला पाहिजे याशिवाय तिला मोक्ष नाहीं हा अर्थ दुसऱ्या सिद्धांताचा— दुसरा सिद्धांत **गुरूचा** अर्थ गुरु जो पति त्याच्या द्वारा ज्ञानोपदेशाशिवाय आधुनिक गुरु या सुधारणा कालांत फार नाहीं पण वाईस सुधारक झाले आहेत. ते खुशाल सुवासिनीस उपदेश देतात. तो शास्त्र सिद्ध आहे किंवा नाहीं तो कोणत्या हेतूनें गुरुलोक देतात आणि त्याचे परिणाम व्यक्तींवर आणि समाजावर कसे घडतात हें पुढें यावयाचेंच आहे.

मागें ज्ञानी ओळखणें कठीण असें ह्मटलेंच आहे तरी ज्यालोकांत स्वार्थत्याग व भूतदया नसेल, ज्याच्यांत शांती नसेल, ज्याच्या ठिकाणीं क्षमा सांपडणार नाहीं, ज्याच्यांत समरसता नसले ह्मणजे ज्यांच्यावर विपत्ती येऊन पडली असतां, ज्यांची दुर्दशा झाली असता ज्यांच्या हृदयाचा चांगुलपणा कायम राहतो अशी वृत्ति ज्याच्यात नसेल ज्यांचें वर्तन न्यायास अनुसरून नसेल व जे नेहमी क्षुल्लक आधारावरून दुसऱ्यात दोष आहेत असें समजून त्या दोषाबद्दल लोकांची निंदा करीत असतील, ज्याच्यांत नम्रता नसून जें आपण दुसऱ्यास बोलण्यास भीत नाहीं ह्मणून अहंकार दर्पानें प्रौढी मारीत असतील ते खास ज्ञानी नाहींत. भक्तिविनम्र लोकात हे दोष आढळूं शकतील परंतु ज्ञानाग्नि अशाच प्रकारचा वन्ही आहे कीं त्यात हे दोष भस्म होऊन गेलेच पाहिजेत. कोणी ह्मणेल कांही व्यवहार व परमार्थ एकच आहे. आह्मी नेहमीं स्वरूपांत मग्न असूनहीं व्यवहारासाठीं व्यवहार करितों. आह्मी ज्ञानी नाहीं अत कशावरून! यास उत्तर इतकेंच कीं तुह्मी ज्ञानी असाल परंतु जे दोष आह्मास आह्मांमध्यें दिसतात तेच आह्मी तुह्मांमध्यें आहेत असें सप्रमाण सिद्ध करून देतों. तुह्मांस मी ज्ञानी आहे असें वाटतें यावरूनच तुमचा अहंभाव नष्ट झाला नाहीं तुह्मास आह्मांप्रमाणेंच लिंगोपाधि, प्रपंच उपाधि, जीवयात्रा कळते. तुह्मी मी ज्ञानी आहे असें अज्ञान उगाच भासविता.

अशा प्रकारचे ज्ञानी लोक आजकाल आह्मीं पूर्वीं सांगितल्या प्रमाणें मंत्र बाडांतून शिष्यास एक मंत्र देतात व त्या दिवसापासून आपणास गुरु ह्मणवून घेऊं लागतात. या उपदेश दान स्वीकारांत शिष्याची पात्रता अनुरूप उपास्य दैवत इष्ट देवता शिष्याची योग्यता ह्यांतील कशाचाही विचार केलेला नसतो. क्षुधितास अन्नभेद कसा करवणार. गुरुजी हपापलेले असतात. शिष्य करण्यास त्यांची नजर असते. शिष्याच्या आसुरी संपत्तीवर त्यांस माहित असतें शिष्य आहे भोळसर आणी वेडगळ धर्म समजुतींचा. शिष्याचे ताप मी हटवले असें त्यास मी सहज भासवून देईन. माझ्या जवळ जुने पुराणें मंत्रबाड आहे आणि शिवाय विद्या मार्तंड फाल्गुन भट महागुरु शद्धे मला लागेल तो आधार काढून देण्यास समर्थ आहेत इतक्या जोरावर कांहीं दिवस पर्यंत गुरु निर्धास्त असतात. इकडे थापाडलेला शिष्य प्रथमारंभीं अत्यंत श्रद्धायुक्त असतो. त्यास वाटत असतें माझ्या मंत्रानें मी माझ्या बायकोचा हिस्टेरिया बरा करीन, प्रमोशन पटकावीन, माझ्या कुवारी गाईस पुत्र संतान प्राप्त करून देईन, साराष सर्व आधिभौतिक मनोरथ या आधि दैविक मंत्रानें आणि वारंवार मिळत जाईल अशा गुरुबोधामृतानें मी प्राप्त करून घेईन. कांहीं शिष्य भरज्वानींत अशा प्रकारचा उपदेश घेतल्यापासून दोनतीन वर्षांच्या अवधींत इहलोक सोडून मोक्ष संपन्न झालेले आह्मी पाहिले आहेत. प्रवास वर्णन करून गुरुदास पोहोंचलेल्या एका महात्म्यांनीं एका क्षय रोग्यास आशीर्वाद दिला. क्षयरोगांत दोन चार प्राक् मरण मूर्च्छा येत असतात हें ज्यांनीं ज्यांनीं क्षयरोग्याची शुश्रुषा केली असेल त्यांस अनुभवानें माहित आहेच. गुरु आशीर्वाद देण्यास लाबून अग्निरथाचा आणि नंतर अश्वरथाचा प्रवास करीत आल. शिष्यास मूर्च्छेंतून उठविलें. शिष्य शिष्यिणीनीं गुरु आसन्न निधन पीडितास मरणापासून सोडवितात अशी तारीफही केली. पुढें पाच सहा दिवसानीं गुरुजी गेले मात्र, शिष्यांनीं मोक्ष मार्ग धरला.

अपूर्ण

---

## दिशा चुकली.

ना॰ मि॰ गोखले यानीं सक्तीचें शिक्षण मुफत देण्याविषयींचा ठराव कौंसिलापुढें आणिला होता तेव्हां त्याला विरोध करणारांचा हा एक आक्षेप होता कीं शिक्षण सक्तीचें व सार्वत्रिक केल्यास त्यापासून अन्य तऱ्हेनें फायदा होईल खरा, पण शेतकऱ्याच्या मुलांना मग शेतकाम आवडेनासें होऊन हातांत नांगर धरण्यापेक्षां लेखणी धरून खर्डेघाशीचें काम त्यांना अधिक आवडूं लागेल. हा आक्षेप खरोखर विचार करण्यासारखा आहे ही गोष्ट आयर्लंडच्या अनुभवाला आलेली आहे. आयर्लंड देश आमच्या देशासारखा कृषिप्रधान असून तेथें आमच्या सारखेंच दारिद्र्य लोकाच्या पाठीस लागलें आहे. शिक्षण प्रसारार्थ केलेल्या प्रयत्नांचा हाच परिणाम झाला कीं देशांतल्या तरुणांना खेड्यांत

राहून शेतीवाडी करण्याचा वीट यऊं लागला, आणि ज्या शेतीवाडींतून त्यांच्या शिक्षणाचा खर्च करण्यांत आला तिच्याशींच त्यांनीं बेइमानपणाचें वर्तन केल्यामुळें शिक्षणप्रसारामुळें हिताचे ऐवजीं अहितच फार झालें. याचा दोष शिक्षणाकडे होता असें ह्मणण्यास आह्मी तयार नाहीं शिक्षण पद्धतीकडेस तो होता. आयर्लंडातल्या अनुभवाची हिंदुस्थानांत पुनरावृत्ति होणें कोणी ही इष्ट ह्मणणार नाहीं. यासाठीं शिक्षणप्रसार तर हवा पण त्यापासून येणारी व्यवसाय पराङ्मुखता त्याच्या बरोबर न यावी यासाठी योग्य ती खबरदारी घेतली पाहिजे. ज्याच्या वंशपरंपरागत धंदा कृषिकर्म किंवा कारागिरी हा आहे अशांना बेतापुरतें लिहिण्यावाचण्याचें शिक्षण देऊन त्या बरोबरच हातकामाचें ही शिक्षण देण्याची व्यवस्था केल्याशिवाय नुसत्या पुस्तकी शिक्षण देण्यानें अपयच होईल. ना. गोखले यांनीं शिक्षणाविषयक ठराव आणिल्यापासून अनेक संस्थानिकांनीं आपापल्या संस्थानात मुफत व सक्तीचें शिक्षण सुरू केलें आहे, पण त्या बरोबर वर निर्दिष्ट केलेली सावधगिरी ठेविली आहे कीं नाहीं तें आह्मांस ठाऊक नाहीं. नसेल तर त्याच्या सद्धेतुपूर्वक केलें ल्या प्रयत्नाची दिशा चुकली आहे ती त्यांनीं वेळेवर सुधारली पाहिजे तरच त्याच्या श्रमाचें व द्रव्याचें चीज होईल.

## हिंदुस्थानचे माजी व्हाइसराय.

हिंदुस्थानातली आपली कामगिरी संपवून विलायतेंत जाऊन राहिलेले असे हिंदुस्थानचे तीन माजी व्हाइसराय हल्लीं विद्यमान आहेत. लॉर्ड ल्यान्सडौन, लार्ड एल्गिन व लार्ड कर्झन हे होत. तिघांचीं हिंदुस्थानाविषयींचीं मतें प्रसिद्धच आहेत. लार्ड एम्प्थिल हे आक्टिंग व्हाइसराय होते. हे काय ते हिंदुस्थानाच्या हितार्थ मनापासून झटत आहेत. विसाव्या शतकाला प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत गेल्या चौदा वर्षांत लार्ड डफरिन १९०२ मध्यें, लार्ड नॉर्थब्रुक १९०४ मध्यें, लार्ड रिपन १९०९ मध्यें व लार्ड मिंटो १९१४ मध्यें असे चार माठाले व्हाइसराय मृत्युमुखीं पडले. या चौघांत लार्ड डफरिन खेरीजकरून बाकींच्या तिघांनींही हिंदुस्थानचें कल्याण आपापल्या शक्तिप्रमाणें व प्रसंग येत गेले तसें केलें. ह्मणून हिंदुस्थानात त्यांची कीर्ति चिरकाल राहील. विद्यमान असलेल्या माजी व्हाइसरायाच्या त्रयींत मात्र हिंदुस्थानचा हितकर्ता या सन्मान्य पदवीस लायक एकतरी गणिला जाईल कीं नाहीं याची शंकाच आहे.

## प्रकाशाचा दुरुपयोग.

आमचे लोक किती अनुकरण प्रिय आहेत व या अनुकरणाच्या पायीं आपल्या शीलाची, अब्रूची, शरीराची व द्रव्याची कशी हानि करून घेत आहेत हें पाहावयाचें असेल तर झगझगीत प्रकाशाविषयींची आमच्या लोकांची वाढती अभिरुचि पाहावी. आमच्यांत अंधें अनुकरणशीलता आहे याबद्दल अनेक पाश्चात्य विद्वान् आमचा उपहास करीत असतात, आह्मांला माकडें ह्मणतात, तरी आमचे लोक निर्लज्जपणानें आमचा राष्ट्रीय पोषाख टाकून सोलो हॅट, नेक टाय ( गळ फास ) वगैरे गोष्टी टाकण्यास तयार होत नाहींत. आमच्या घरांत पूर्वीं समया असत. त्यांच्या पासून वातींच्या संख्येच्या मानानें हवा तेवढा कमज्यास्त प्रकाश आह्माला मिळविता येत असे. त्या समया गेल्या व स्वस्तपणामुळें आह्मी राकेल वापरूं लागलों. त्या बरोबर काचेच्या चिमण्या आल्या. यांचा प्रकाश आमच्या अशिक्षित लोकांच्या गरजांच्या मानानें ज्यास्तच होता तरी स्वस्तपणासाठीं तो पतकरला. पण आतां पहावें तर शहरांतून किटसनचे दिवे, किंवा ग्यासचे अगर विजेचे ल्याप लावून आपणा स्वतःला व गिऱ्हाइकांना अंधता आणून देण्यांत चढाओढ लागलेली दिसून येत आहे. शास्त्रज्ञाचें असें मत आहे कीं नेहमींच्या व्यवहाराला पाच मेणबत्त्याचा उजेड पुरेसा व आरोग्यकारक असतो. झकपकपणासाठीं हा उजेड फार तर दुप्पट, चौपट, फार तर दसपट करा. पण सध्या एक हजार मेणबत्त्यांचा उजेड देणारे दिवे दुकानातून लावण्यात येतात, या मूर्खपणाला काय ह्मणवें! अतिशय झगझगीत उजेड केला ह्मणजे सौंदर्य वाढतें या मूर्खपणाच्या समजुतीला आमचे दुकानदार शेळ्या सारखे बळी पडत आहेत. खरें सौंदर्य अधिक उजेडात नसून प्रकाशाच्या प्राकीरणांत आहे हें आमच्या सुशिक्षितांसही कळूं नये हें आश्चर्य आहे. युरोपियन लोकांचीं नाटकगृहें पहा, आणि आमचीं पहा. पाहिल्यात प्रकाशाचा सौम्यपणा आणि त्या प्रकाशाच्या प्राकिरणार्थ केलेल्या तजविजी आणि त्या पासून मनाला होणारा आनंद याची कल्पनाच आह्मा लोकाना नाहीं. जसे दागिन्यांनीं सगळें शरीर मढवून काढणें ह्मणजे श्रीमंती, किंवा पायांनीं चार पावलें चालण्याची शक्ति नसणें याचें नांव वैभव तसें डोळे वर करून पाहिले असता ते दिपून अंधता यावी इतका उजेड करणें याचें नाव रोषणाई असा अर्थ आमचे लोक करतात! हा प्रकार सध्याच्या प्रमाणावर आणखी कित्येक वर्षें चालला तर मुंबई सारख्या शहरांत एकही दुकानदार चांगला डोळस राहील कीं नाहीं याची वानवा आहे.

## स्त्रियांकरितां वैद्यकी पाठशाला

हिंदुस्थानांत दिवसेंदिवस स्त्रीशिक्षणाचें पाऊल पुढें पडत आहे त्यामानानें स्त्रियांच्या शिक्षणाच्या नवीन नवीन सोयीही होत आहे हें पाहून कोणाही सुधारणेच्छूला आनंदच होईल. कांहीं वर्षांपूर्वीं स्त्रियांकरितां स्वतंत्र हायस्कुलें नव्हतीं. आतां मुंबईस एक, पुण्यास एक, उमरावतीस एक व इंदुरास एक अशीं चार हायस्कुलें झालीं आहेत. स्त्रियां कारितां स्वतंत्र कॉलेज काढण्याचेंही कांहीं थोर व्यक्तींच्या डोक्यांत आलें आहे व योग्य समय येतांच ती संस्था उभी राहील यांत आह्मांला शंका नाहीं, पण आर्टस कॉलेजापेक्षांही वैद्यकीच्या शिक्षणांच्या कॉलेजाची अधिक उणीव होती, आणि ती ना. लेडी हार्डिंज यांच्या अविरत परिश्रमानें भरून निघून दिल्ली येथें लवकरच ही संस्था निर्माण झालेली दिसून येणार आहे. या कॉलेजाच्या इमारतीची कोणशिला बसविण्याचा समारंभ नुकताच झाला. या कॉलेजाची इमारत लवकरच तयार होऊन अभ्यासक्रमालाही सुरुवात होईल. त्यापूर्वीं एक गोष्ट सुचवून ठेवणें योग्य दिसतें. ती ही कीं ही पाठशाला केवळ स्त्रियासाठींच असल्यामुळें व हिंदी स्त्रियानीं या संस्थेपासून फायदा घेण्यास पुढें यावें असा संस्थापकाचा हेतु असल्यामुळें या पाठशाळेंत प्रवेश होण्यास विशेष कडक निर्बंध ठेवूं नयेत. इतर मेडिकल कॉलेजांतून इंग्रजींत शिक्षण देतात तसें न देतां हिंदुस्थानीसारख्या देशी भाषेंत तें देतां आलें तर उत्तमच. निदान इंग्रजींत शिक्षण देण्याचे ठरल्यास प्रवेशाधिकार प्राप्त होण्यास युनिव्हार्सिटीची इंटर मीजियेट किंवा प्रवेश परिक्षेची आडकाठी नसावी. विद्यार्थिणीला इंग्रजी भाषेचें ज्ञान बेताचें आहे किंवा नाहीं तें पाहावें, पण युनिव्हार्सिटीच्या सर्टिफिकेटाची जरूरी ठेवूं नये. ह्मणजे घरगुती इंग्रजी शिकलेल्या पुष्कळ बायांना या कॉलेजाच्या शिक्षणाचा लाभ घेता येईल. ही संस्था काढणाराचे हेतु सफळ होवोत.

## स्त्रियांचें मासिक पुस्तक.

अलाहाबादेस मर्यादा या नांवाचें एक हिंदी मासिक पुस्तक निघत असते. त्याचे संपादकत्व पुरुषाकडे आहे व पुरुषांच्या उपयोगाचे विषय त्यांत नेहमीं येत असतात. पण याच्या प्रकाशकांनीं एक अंक खास स्त्रियांसाठीं व स्त्रियांच्याच लेखांनीं भरून काढला. या अंकाचें संपादकत्व एका विदुषीकडच दिलें होतें. स्त्रीशिक्षणाचे मार्गात संयुक्त प्रांत मुंबई इलाख्याचे फार मागें आहे. पण तेथें सुद्धां स्त्रियांसाठीं एक खास अंक लिहिणाऱ्या विदुषी पुढें झाल्या. आमच्या इकडे स्त्रियासाठींच केवळ असें एकच 'भगिनी समाचार' मासिक पुस्तक आहे. पण त्यांत साळूबाईच्या गोष्टी किंवा अगदीं जुन्या तऱ्हेचीं ठराविक चरित्रें वगैरे पलीकडे त्याच्या संपादकाची दृष्टि गेली नाहीं. तितका विस्तृतपणा येण्यास फार कालावधि लागेल. गोव्यास प्राचीप्रभा हें एक स्त्रीनें चालविलेलें मासिक पुस्तक आहे. पण त्यांत स्त्रियांसाठीं चालविल्याचा विशेषपणा असा कांहींच नाहीं. आमच्या इकडे असें एखादें मासिक पुस्तक जोरदार रीतीनें चालविण्याचें सामर्थ्य असलेल्या विदुषींची वाण आहे असें नाहीं. श्री. सौ. कानिटकर, गिरिजाबाई केळकर, काशीबाई हेरलेकर, कु. कृष्णाबाई ठाकुर, व सेवासदनांत काम करणाऱ्या अनेक सुशिक्षित स्त्रिया यांनीं मनावर घेतल्यास मराठी भाषेंतलीही उणीव त्या सहज भरून काढतील. आकोल्याच्या साहित्य संमेलनाचे वेळीं श्री. सौ. गिरिजाबाई केळकर यांनीं या संबंधांत आपल्या भगिनींना सूचना ही केली होती. तिकडे अजून तरी त्यांचें लक्ष जाईल अशी आह्मांस आशा आहे.

## नवीन भूगोल शिक्षण पद्धति.

आजपर्यंत शाळेंतल्या मुलांना पृथ्वीवरल्या निरनिराळ्या देशांतल्या शहरांची नावें, उत्पन्न होणारे जिन्नस, नद्यांचा लांबी, आगगाड्यांचे रस्ते वगैरेंच्या यादी पाठ कराव्या लागत असत, आणि त्यांतच ते अगदीं कंटाळून जात. आंता त्यांत आणखी प्रत्येक देशाचा व समुद्राचा वास कशासारखा आहे या विषयींच्या माहितीची भर पडल्यावर बिचाऱ्यांची कींव करणार नाहीं असा कोण आहे! प्रवासी लोक इतके दिवस आह्मी अमक्या ठिकाणीं अमुक पाहिलें असे सांगत. दृष्टि हें एकच प्रवासांत ज्ञानसंग्रहाचें साधन त्यांनीं वापरलें, पण यापुढें मि किपालिंग यांचें अनुकरण करून त्यांना घ्राणेंद्रियाचाही उपयोग आपल्या प्रवासांत करून दृष्टीनें मिळविलेलें ज्ञान घ्राणेंद्रियानें तपासून घेतलें पाहिजे. दाक्षिण महासागरांत पर्यटन करतांना स्पिरिट ल्यांपचा वास आला नाहीं, किंवा पश्चिम आफ्रिकेच्या किनाऱ्यापाशीं कुजट घाण आली नाहीं तर खलाशानीं आपणाला फसवून भलत्याच ठिकाणीं आणिलें ह्मणून खुशाल समजावें. उत्तम गुलाबासारखा मनाला उल्लसित करणारा वास आला ह्मणजे मॉरिशस बेटांत आपण आहों असें समजावें एडनला उबलेल्या चामड्याची, रुमानियाला घोड्याच्या लीदेची, अरबस्थानाला सडक्या कोण्याची, ब्रह्मदेशाला चिरुटाच्या धुराची घाण आलीच पाहिजे; आणि ही घाण जोंपर्यंत आपल्या नाकांत नीट कोंबली नाहीं तोंपर्यंत प्रवाशानें त्यात्या देशांचे ज्ञान मिळविलें असें कसें ह्मणतां येईल? घ्राणेंद्रियानें ज्ञान मिळवावें असा ईश्वरी संकल्प नसता तर कुत्र्यामांजराला तीक्ष्ण घ्राणेंद्रिय त्यानें कां दिलें असतें? ज्याअर्थी मनुष्यप्राणीही कुत्र्यामांजरासारखा पण बिन शेपटीचा प्राणीच आहे तों पर्यंत त्यानेंही कुत्र्यामांजरासारखे वासावरून आपला शत्रुमित्र ओळखण्यास शिकलें पाहिजे. घ्राणेंद्रियाच्याद्वारें भूगोल शिकविण्याची पद्धति अशा रीतीनें असल, शास्त्रोक्त आणि सृष्टीनियमाशीं जुळणारी आहे. ही पद्धति आमच्या इकडे ट्रेनिंग कॉलेजाच्या अभ्यासक्रमांत केव्हां अग्रस्थान पटकावते आणि आमचे भावी शिक्षक आपल्या घ्राणेंद्रियानें प्रवासजन्य ज्ञान संपादण्याची विद्या शिकून केव्हां तयार होतात अशी उत्सुकता आह्मांला झाली आहे.

## नवें मन्वंतर

केरळ कोकिळाचे माजी संपादक रा० कृष्णाजी नारायण आठल्ये यांनीं कांहीं वर्षें विश्रांति घेऊन आतां ह्मातारपणीं वाङ्मयाच्या सेवेसाठीं कंबर कसलेली पाहून आह्मांस खरोखर आनंद होतो. पंचवीस वर्षांपूर्वीं केरळ कोकिळ हें भाषेच्या दृष्टीनें उत्तमांतलें एक मासिक पुस्तक होतें. रा. आठल्ये यांच्या सरळ सोप्या, पण सुरस कविता कितीही वाचल्या तरी वाचकांची तृप्ति होत नसे. त्यांच्या ' लोकोत्तर चमत्कारा , च्या वर्णनानें कित्येकांस वेड लाविलें होतें. त्यांच्या पुस्तक परीक्षणाची शैली मोठीशी सभ्य नव्हती. बाष्कळपणाची भाषा असे, तरी पण परीक्षण मार्मिक-

पणाचें होतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्याच रा० आठल्यांनीं पुण्याजवळ पारेंचें येथें नवें मन्वंतर नांवाचें मासिक पुस्तक काढून मराठी वाचकांशी असलेल्या परिचयाचें पुनरुज्जीवन केलें आहे. या मासिकाचें स्वरूप हुबेहुब पूर्वींच्या केरळ कोकिळा सारखें आहे. फरक येवढाच आहे कीं हल्लींच्या मासिकांत शेवटीं मराठींत गीतेवर थोरलें भाष्य क्रमशः येणार आहे ज्या प्रमाणावर या भाष्यांत गीतेचें विवेचन सुरू झालें आहे त्याप्रमाणानें पाहतां हें भाष्य पूर्ण होण्यास एक तप तरी पाहिजे. ईश्वर यामा० पु० च्या संपादकास, प्रकाशकास व वाचकांस ही दीर्घायुष्य देऊन हें भाष्य पूर्ण झाल्याचें पाहण्याचें सामर्थ्य देवो. नमुन्याचा ह्मणून जो अंक प्रसिद्ध झाला आहे त्यांत रा० हरिभाऊ आपटे यांच्या 'उषःकाल' कादंबरीवर मार्मिक पण बाष्कळ भाषेनें लिहिलेली टीका आली आहे. रा. आठल्ये हे जर नव्या मन्वंतरात वावरूं इच्छित आहेत तर त्यांनीं नव्या मन्वंतराच्या सभ्यपणाच्या चालीशीं व भाषासंप्रदायाशीं' नीट परिचय करून घ्यावयास पाहिजे आहे हें नवें मन्वंतर विचारांत, आचारांत, भाषेंत सर्वत्र बाबतींत क्रांतिकारक आहे. पूर्वींचें लेखनसाहित्य घेऊन आतां चालणार नाहीं. जुन्या बाटल्यांतून नवी दारू ठेवणें हा शहाणपणाही नाहीं असें आह्मी रा० आठल्ये यांस स्नेहभावानें सुचवितों, व त्यांच्यां अंगीकृत कार्यास यश चिंतितों.

## विलायतेंतली धामधूम.

आयरिश होमरुलासंबंधानें विलायतेंत सध्यां विलक्षण धामधूम चालली आहे. होमरूल बिल पास करून घ्यावयाचें हा प्रधान मंडळाचा कृतनिश्चय आहे. तरी अल्स्टरमधील लोकाचा अतिशय विरोध पाहून 'अर्धं त्यजति पंडितः' या ह्मणी प्रमाणें अल्स्टरला सवलत देण्यास प्रधान मंडळ तयार झालें. मऊ पाहिलें ह्मणजे कोपरानें खणावेसें वाटतें. तसें यामुळें विरुद्ध पक्षाला होऊन त्यांनी सवलती मनांत न आणितां होमरूल बिलाला विरोध करण्याचें व्रत तसेंच चालविलें आणि बंड, क्रांति, दंगा वगैरे शब्दाचा पुनरुच्चार करून सगळें वातावरण क्षुब्ध करून सोडलें. लढाऊ व्हालंटियर जमा होऊं लागले व शस्त्रांची आयात होऊं लागली हीं चिन्हें पाहून प्रधानमंडळानें लष्करी अधिकाऱ्यांना सावध राहण्याविषयीं हुकूम सोडले हे हुकूम सोडण्यांत एका आफिसरानें कांहीं पदरचा मजकूर घुसडून दिल्यावरून अल्स्टरच्या लोकांवर हत्यार चालविण्यास प्रधानमंडळ सांगत आहे अशी गैरसमजूत होऊन लष्करी अधिकारी भराभर राजीनामे देऊं लागले. असा गाधळ ज्यांच्या चुकीमुळें माजला ते कर्नल सीली राजीनामा देऊन बसले, प्रधानमंडळानें आपला हुकूम खरोखर काय होता तो समजावून सांगितला, तरी एकदां डोक्यांत वारें शिरलें तें निघत नाहीं, व लष्करी अधिकारी दिलेले राजिनामे परत घेत नाहींत.

कर्नलसीली हे युद्धखात्याचे प्रधान होते. त्यांचें काम सध्याच्या समयीं अतिशय जबाबदारीचें असल्यामुळ दुसऱ्यावर सोंपविणें बरें नाहीं असें पाहून मुख्य प्रधान मि. ॲस्क्विथ यांनीं तें काम स्वतःकडे घेतलें आहे. पण तसें केलें असतां पार्लमेंटच्या नियमाप्रमाणें मि० ॲस्क्विथ ज्या परगण्याकडून निवडून आले त्या परगण्या कडून पुनः निवडणूक व्हावयास पाहिजे. यासाठीं आतां पुढच्या आठवड्यांत ही निवडणूक व्हावयाची आहे. तींत मि० ॲस्क्विथ हेच पुनः निवडून येतील असा मोठा भरंवसा वाटत आहे. कारण गेल्या निवडणुकीचे वेळीं युनिअनिस्ट पक्षाच्या उमेदवारापेक्षां यांना सतराशेंवर अधिक मतें मिळालीं होतीं. होमरूल बिला मुळें हें बहुमत जरी थोडेंसें कमी झालें असलें तरी मि० ॲस्क्विथ यांना निवडून येण्यास अडचण पडणार नाहीं. पण कदाचित अनपेक्षित अशी गोष्ट घडून मि० ॲस्क्विथ नच निवडून आले तर मात्र प्रधान मंडळाची काय दशा होईल तें सांगतां येत नाहीं. प्रत्येक घटकेला कांहीं तरी चमत्कारिक आणि खळबळ उठवून देणारी बातमी येते यावेळीं गप्पा पिकविणारांनाही फावलें आहे. हिंदुस्थान आणि वसाहती यातील लष्करी अधिकाऱ्यांनीही राजीनामे पाठविले आहेत अशी चळवळ उडवून देणारी बातमी एका पत्रानें याचवेळीं प्रसिद्ध केली. त्यामुळें आगींत तेल ओतल्यासारखें या प्रकरणाला अधिकच उग्र स्वरूप आलें. पुढें आणखी काय काय रंग पालटतात इकडे वर्तमानपत्रें वाचणाऱ्या मनुष्यमात्राचे डोळे लागले आहेत. गेल्या पंनास साठ वर्षांत सध्याच्या इतका धामधुमीचा काळ कधीं गेला नाहीं असें वृद्ध लोक ह्मणत आहेत. अशा काळांत आणि अशा अस्वस्थतेच्या वेळीं मि. ॲस्क्विथ हे धिमेपणानें व फार हुशारीनें राज्यसूत्रें हलवीत आहेत आणि मुत्सद्देगिरीनें एकेक डाव खेळत आहेत. परवा त्यांनीं लष्करी खात्याचें काम स्वतःकडे घेण्यांत जी मुत्सद्दगिरी दाखविली आहे तिचें कौतुक सगळ जग करीत आहे. मि. ॲस्क्विथ हे पुनः निवडून आले तर यंदाचे सालीं होमरूल बिल पास करून घेतल्याशिवाय ते राहणार नाहींत.

## साखरेचा धंदा

मुंबई इलाख्याचे शेतकी खात्याचे डायरेक्टर मि. किटिन याचे टाइम्स आफ इंडियांत वरील विषयावर एक पत्र प्रसिद्ध झालें आहे. निरनिराळ्या देशांत साखरेचा धंदा कसा चालतो यासंबंधीं व्यवस्थित चौकशी मि. किटिंज आणि मि. जी. एन. सहस्त्रबुद्धे यांनीं केलेली आहे. व त्यासंबंधीं तीन पत्रकें शेतकीखात्याकडून लौकरच प्रसिद्ध होणार आहेत. त्यांत जावा फार्मोसा वगैरे ठिकाणीं साखर कशी तयार होते यासंबंधीं मि. किटिंज यांचा एक निबंध आहे त्याचप्रमाणें पुण्याजवळ शेतकी खात्यानें जी उसाची लागवड केली आहे तिच्यांसबंधीं प्रो. नाईट यांचा एक निबंध बाहेर पडणार असून कमी खर्चांत अधिक ऊस कसा उत्पन्न करावा यासबंधी त्यांत ते लिहिणार आहेत. महाराष्ट्रांत गुळापेक्षां साखर करणें स्वस्थ पडेल असें मात्र मि. कीटिंज यांचें ह्मणणें नाहीं. त्याप्रमाणेंच शेतकऱ्यांना टनभर ऊस करण्याला १० रुपये खर्च येतो, परंतु विकतांना पंधरा रुपये टन किंवा जमल्यास २० रुपये टन असा भाव लावतात असें मि. कीटिंज यांचें ह्मणणें असून साखरेपेक्षां गूळच करणें अधिक फायदेशीर असल्याबद्दल त्यांनीं आपलें मत दिलें आहे.

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**—दिवसा कडक ऊन पडतें. पण रात्रीं व पहाटे चांगली गुलाबी थंडी असते. गेल्या रामनवमी पर्यंतच्या गर्भावलीच्या मेघांनीं आमच्या येथें पाऊस पडला नाहीं पण क्वचित् क्वचित् ठिकाणीं थोडा पाऊस झाला आहे. रोगराई कांहीं नसून सध्याची रुक्ष हवा आरोग्याला मोठी हितकारक आहे.

आह्मांस कळविण्यास आनंद वाटतो कीं यवतमाळचे म्युनिसिपल सभासद रावसाहेब लांडगे हे प्रांतिक कायदे कौंसिलच्या कौंसिलदारीसाठीं उमेदवार उभे रहाणार आहेत.

नामदार सर गंगाधरराव चिटणीस व नामदार रावबहादूर वासुदेव रामचंद्र पंडित हे उभयतां व्हॉइसरिगल कौंसिलची सभा बरखास्त झाल्यामुळें परत नागपुरास आले तेव्हां लोकांनीं त्यांच्या चांगल्या कामगिरीमुळें त्याचें पुष्कळसें अभिनंदन केलें.

रा. रा. अबदुल रहिमान तहासिलदार यांस रजा संपतांच आकोल्यास नेमण्यांत आलें आणि रा. रा. मीर तसलिम हुसेन यांस दारव्यास नेमण्यांत आलें.

डॉ० गौर बॅरिस्टर नागपूर यांच्या विरुद्ध कोर्टाचा अपमान केल्याबद्दल नामदार ज्युडिशियल कमिशनर यांजकडून नोटीस काढण्यांत आली होती पण त्या प्रकरणाचा निकाल समाधानकारक होऊन अपमानासंबंधाची नोटीस रद्द करण्यांत आली हें उत्कृष्ट झालें.

रा. रा गंगाधर बोवा चोळकर गवई हे आमच्या नगरचे गायनवादन कुशल असे वयोवृद्ध गुणी गृहस्थ होते त्यांस गेल्या शनिवारीं रात्रौ देवाज्ञा झाली. हे मोठे सरळ मार्गी असून आपल्या ललितकलेंत त्यांनीं चांगलें नैपुण्य संपादलें होतें आणि हल्लींच्या थकल्या काळांतही ते मोठ्या आणीबाणीनें व करारानें रहात असत. त्यांस एक चिरंजीव आहे तो वडिलाप्रमाणें त्याच गुणावर पुढें येईल अशी आशा आहे.

## मुंबई इलाख्याची प्रांतिक परिषद्

यंदा ही परिषद् सातारा येथें ता० २१ मार्च रोजीं भरणार होती पण ही तारीख बदलल्यामुळें आतां कायमच्या तारखा २६, २७ व २८ एप्रिल या मुक्रर करण्यांत आल्या आहेत. स्वागत मंडळीचे अध्यक्ष रा० रा० रघुनाथ पांडुरंग उर्फ दादासाहेब करंदीकर हे आहेत. परिषदेच्या अध्यक्षाचा बहुमान मुंबई कौन्सिलाचे कौन्सिलदार ना. रा. रा. दत्तात्रय व्यंकटेश बेळवी बी. ए., एल एल. बी यांस देण्यांत येणार आहे सभासद व प्रेक्षक यांच्या सर्व उतरण्याच्या व जेवणाखाण्याच्या सोयी स्वागत मंडळी करणार आहे. या परिषदेमुळें तरी साताऱ्याच्या निद्रिस्थ भागांत कांहीं चेतना उत्पन्न होईल तर मोठाच कार्यभाग होईल.

## सुकृतोद्रेक

### ( कौंसिलदारांची निवडणूक )

प्रांतिक कौंसिलांत निवडून जाण्यासारखे आमच्या इकडे जमेदार, म्युनिसिपल सभासद रा.बोर्डाचे सभासद पुष्कळसे आढळतील ही मोठी समाधानाची गोष्ट होय. पण आजपर्यंत विनयानें ह्मणा किंवा रा. ब. मुधोळकर, व जोशी, व रा. सा. दामले यांच्या आजपर्यंतच्या सुकृतीकडे दृष्टि दिल्यानें कित्येक कायदे पंडित, निस्पृह व व्यवहारचतुर लोक पुढें सरसावले नाहींत. तथापि त्यांच्या अंगीं लोककार्य करण्याचें जें तेज आहे त्याची लोकास ओळख देण्यासाठीं तरी निदान आणखी नवीन उमेदवार पुढें येतील असा आह्मास भरंवसा आहे. उमेदवार पुष्कळ झाले ह्मणून आमची मतदारमंडळी डगमगतील अशी आह्मास बिलकूल भीति नाहीं. आणि ते आपल्या सद्बुद्धी प्रमाणें हेलक्षीर न्यायाला अनुसरून ज्याचीं ज्याचीं सार्वजनिक सुकृतें उद्रेका प्रमाणें लोकांच्यापुढें बहिस्फुट आहेत त्यांचींच ते निवड करतील. पण सध्यां आह्माला जी मोठी जरूर आहे ती ही कीं लोकांनीं पुष्कळसे उमेदवार पुढें आणिले पाहिजेत. ही निवडणुकीची मोहीम उमेदवारांना कदाचित् जड जाईल पण तिच्या पासून सार्वजनिक कामामध्यें मत देण्याचें लोकशिक्षण मिळेल आणि याच लाभासाठीं आह्मी कांहीं सुकृती भावी उमेदवारांची मुद्दाम याचना करितों कीं त्यांनीं अशा सुसमयीं माघार घेऊं नये.

श्रीराम, श्रीहरी, सच्चिदानंद, ॐ दत्त, कृष्ण. विठ्ठल, संतदर्शन व मोनोग्राम ह्याकार्डसा ९ मुफ्तांत दर्मीळ साधुसंतांचे २९० फोटो! किं. २। रु. चौऱ्यांशी आसनें, लोकोत्तर चमत्कार, सृष्टींतील अद्भुत चमत्कार व मनोविकार ह्याका. सा. ४ मुफ्तांत २०० फोटो! किं. १ रु.

श्री. वा. नगरकर, नाशिक.

नो० नं०

**पाहिजे आहेत.** पैसा आणि जोखमे वांचून धंद्या करणारे. जास्त माहिती जे आदम आणि कंपनी कोर्ट मुंबईकडून विचारणें.

नो. नं. २३

## विद्यार्थ्यांची सोय

१० माहे एप्रिल सन १९१४ ई. पासून आमचे येथील शाळेंत इंग्रजी तिसरा वर्ग सुरुं होणार आहे व बाहेर गांवच्या मुला करिता बोर्डिंगचीही व्यवस्था केली आहे. येऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनीं व त्यांच्या पालकांनीं त्वरित हजर व्हावें.

पातुर शेखबाबू
ता. बाळापूर
ता. २७।३।१४

गोविंदसिंग मनसबदार
म्यानेजर
नार्ज इंग्लिश स्कूल

नो० नं० २४

## नोटीस

बेशमी रा. रा. नरहर धोंडदेव वैद्य ब्राह्मण रा० आकोला ताजनापेठ यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे मालकीची आह्मास [illegible]र्षा करिता पट्यानें दिलेली मौजे रिधोर ता० बाळापूर येथील शेतें—

| सर्वे नं. | ए. | गुं. | आ. | रु. | हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १०८ | ३१ | ११ | | ७० | सालीम |
| १९९ | २४ | ३९ | | ९२ | सालीम |

हीं शेतें तुह्मी आह्मांस सन १९१३ चे मे महिन्यांत पांच हजार रुपयाच्या मरण्यांत विकत देण्याचें कबूल केलें आह्मी तुह्मास इसारा दाखल परभारे एकफाळी येथील नथू देशमूख याज कडून रोख नगदी रु. २०० आणून तुह्मास दिले व असें ठरलें कीं यंदाच्या गेलेल्या हंगामाच्या वेळेस ह्मणजे डिसेंबर सन १९१३ राहिलेली रकम तुह्मास आणून द्यावी व तुह्मी वरील शेताचें खरेदीखत लिहून नोंदून द्यावें. व आमच्या पट्टयाची राहिलेल्या दोन वर्षांची रकम आपल्याकडे असलेल्या कर्जांत सोडून द्यावी. असेंही ठरलें. हंगामाच्या वेळेस ह्मणजे डिसेंबर १९१३ पासून तुह्माकडे बऱ्याच वेळा खरेदी करून द्या पैश्याची व्यवस्था झालेली आहे असें सांगण्यास आलो परंतु तुह्मी खरेदी करून देण्याची गोष्ट प्रत्येक वेळेस लांबणीवर टाकीत आहा ह्यावरून असें दिसतें कीं करारा प्रमाणें शेताची खरेदी करून देण्याचा विचार दिसत नाहीं तरी ही नोटीस पोहोचल्या पासून १५ दिवसाचे आत खरेदी करून नोंदून द्यावें नाहींतर आह्मी काढलेल्या रकमेच्या व्याजाचे बोजा बद्दल तुह्मी जबाबदार व्हाल व आह्मास करारा प्रमाणें खरेदीखत तुह्माकडून करून घेण्यास कायदेशीर तजवीज करावी लागेल ही नोटीस दिली सही ता. २।४।१९१४

सही

किसन पाडोबा द० खु०

नो० नं० २५

## नोटीस

नोटीस बेशमी मलकचांद वा मलकमहचंद मु॥ रा. नादूरा यांसः—

खालीं सही करणार नोटीस देतो कीं मी तुह्मास कोर्टाचे कामा करितां कुल मुखत्यारपत्र ता. ३१ १०-१९११ रोजीं रजिष्टर करून दिलें. परंतु अलीकडेस तुमचे कडून दुकानचे कोर्टाचें काम बरोबर होतनसल्यानें आज तारखे पासून तें रद्द केल आहे. या पुढें यादुकानचे नावावर तुह्मी कोणताही व्यवहार केल्यास तुह्मास जबाबदार धरलें जाईल. तुमची नौकरी ८ दिवसा पासून बंद आहे तुमचे जवळ दुकानचे असलेले कागदपत्र आणून द्यावेत व त्याबद्दल पावती न्यावी. क. ता. ५-४-१९१४

सही ( मारवाडी )

छगनलाल कनैयालाल द. खु.

नो. नं. २६

## नोटीस

रा. गोविंदराव त्रिंठोबा कुणबी मास्तर राहणार सावरमंचनपूर तालुके आकोट यांस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं मी तुह्मास कुलमुत्यारपत्र दिले होतें. ज्या कामाकरितां तुह्मास मुखत्यारपत्र दिले होतें तीं सर्व कामें निकाल झाली करितां या नोटीसीनें तुह्मास कळविले जाते कीं तुह्मास दिलेले कुलमुखत्यारपत्र आज तारीखेपासून रद्द केलें आहे. आतां तुह्मास त्या कुलमुखत्यारपत्राच्या आधारें कोणतेंच काम करण्याचा अधिकार राहिला नाहीं इतक्या उपर तुह्मी काहीं कामें केल्यास तीं रद्द समजावी कळावे. तारीख ३१-३-१९१४ इसवी

सही

नारायण पांडुरंग भजन पाळन करणार आई गिरजाई मर्द पांडुरंग तेली रा. मना तर्फे मुखत्यार नारायण लक्ष्मणजी द. खुःद

नो. नं. २७

## नोटीस

नोटीस बेशमी धनको लक्षमन इरापा आपा रा० चोंढी तालुका बाळापूर याजकडून लक्ष्मण वा मारोती आंद रा० चोंढी हल्लीं मुक्काम मुंगळ तालुका वाशीम यांसः—

नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमचे जवळून रुपये ४० तारीख १४।५।१७ रोजीं कर्जाऊ घेऊन गहाणखत लिहून दिलें आहे ते रुपये व्याजा सुद्धा ही नोटीस पावल्यापासून १० दिवसाचे आंत द्यावे नाहीं पेक्षां या नोटीशीचे खर्चासुद्धां व फिर्यादीचे खर्चाची रकम द्यावी लागेल असे न कराल तर गहाण माल विकून कोर्ट मार्फत वरील सर्व खर्चासुद्धा रुपये आह्मी वसूल करून घेऊ कळावे ता० ३।४।१४ इ.

सही

लक्ष्मण ईरापा आपा काचार
रा० चोंढी द० खु०

नो० नं० २८

## नोटीस

नोटीस बेशमी बायनाबाई मर्द शिवराम इंगळे पाटील राहणार मौजे रोंदलापूर ता० दर्यापूर जि० उमरावती ईस खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी साक्षांत आई असून तुझ्या पोटच्या चार मुली आहेत त्यांत दुसरी मुलगी मी आहे. माझे तीर्थरुपास मरून आज सुमारे ११ सव्वा वर्ष झाले आहे, तेव्हां पासून माझी थोरली बहीण मंजुरी मर्द विठोबा जायले आकोली जाहगीर ही तुझे जवळच आपल्या नवऱ्यासह राहत आहे. साल गुदस्त वर्षी पीक चांगलें झालें असून सावकारास एक पैसाही वसूल दिला नाहींस व समुळ पीक लावणी खर्चास घातले आहेस त्याच प्रमाणें यंदाही केलेस सदहू शेत माझे बापचे साडेतीन तिफनीचे असून अंदाज दोनशें रुपयाची लागवड आहे. शिवाय तुझी इच्छा आहे कीं जास्त कर्ज काढून माझे वडलाकडेस असलेले कर्ज देऊन बाकीचे रुपयांत तुजजवळ असलेली वडील मुलगी तिच्या एका मुलाचें लग्न करावें, तेव्हां तुझी असलेली अशी समज अगदीं चुकीची आहे. उगीच खर्च वाढवून आमच्या हक्काची हानि करणें आहे कारण सदरहू इस्टेट वडिलोपार्जित असल्या मुळें तुझ्या मरणानंतर आह्मी चौघी बहिणी त्या इस्टेटीच्या वारसदार आहोंत वडिलोपार्जित इस्टेट अफरा तफर करण्याचा अगर कोणास गहाण वगैरे देण्याचा तुला मुळींच हक्क नाहीं दिल्यास तो हक्क रद्द केला जाईल. फक्त तुं अन्नवस्त्रासंबंधी व डिलाचें कर्ज फेडण्यासंबंधी मालकीण आहेस कळावे ता० १-४-१४ दस्तुर भोनाजी दानाजी कोरपे पाटील रा. जैनपूर ह. खैसांग

सही

द्रौपदी उर्फ लक्षमी दर्म सूर्यभान कोरपे
रां. जैनपुर हल्ली खैसांग निशाणी हातची

नो० नं० २९

## जाहिर नोटीस

खालीं सही करणार इजकडून सर्वत्रांस जाहीर करण्यांत येते कीं माझी साक्षांत आई बायनबाई मर्द शिवराम इंगळे रा. रोंदलापूर ता. दर्यापूर जिल्हे उमरावती हिनें तिचे ताब्यांत असलेली वडिलार्जित इस्टेट विक्रीस काढल्यास अगर दुसरे कोणतेप्रकारें त्या इस्टेटीची तिनें विल्हेवाट लावण्याचा इरादा केल्यास ती कोणींही गहाण किंवा खरेदी घेऊं नये. घेतल्यास त्याचा हक्क या जाहीर नोटिशीच्याअन्वयें रद्द करण्यांत येईल कळावें. १।४।१४ इसवी.

दस्तुर भोनाजी दानाजी कोप पा॥ राहणार जैनपूर हल्लीं वस्ती खैसांग

सही

द्रौपदी उर्फ लक्ष्मी मर्द सूर्यभान कोर्पे मौजे जैनपूर हल्लीं वस्ती मौजे खैसांग निशानी बांगडी

नो० नं० ३०

## WANTED

Seven Revenue Inspectors. Pay Rs. 25 plus Rs. 10 as pony allowance. None need apply who have not passed the Matriculation or School Final Examination.

Applications with testimonials should reach the undersigned by the end of April 1914. Rejected applications will not be replied to. Selected candidates will have to join the posts at once

Dated Akola the 19 March 1914.

F. Dewar
Deputy Commissioner, Akola

No. N. 31

## महाराष्ट्र साहित्य पत्रिका.

साहित्यपरिषदेची ही मासिकपत्रिका आगष्ट १९१३ पासून सुरू झाली आहे. या पत्रिकेंत मराठी साहित्याची चर्चा प्रसिद्ध होत असते. इतर देशी भाषांतील साहित्य प्रयत्नाचीही माहिती वेळोवेळ देण्याचा उद्देश आहे.

तूर्त १२ पानांची ही पत्रिका विविधज्ञानविस्तार या मासिक पुस्तकास जोडून निघते; आणि दोन्ही मिळून ( पृष्ठें ९६ ) परिषदेच्या सभासदांस अडीच रुपयांत मिळतात. ज्यांस फक्त पत्रिकाच पाहिजे असेल त्यांस ती एक रुपया वार्षिक वर्गणीनें मिळेल. टपाल खर्च वेगळा — आणे चार.

पत्रिकेचे हा वेळपावेतों निघालेल्या पांच अंकांचें पुस्तक परिषदेच्या सभासदांस सहा आण्यांस मिळेल. पुस्तक "म्यानेजर," विविधज्ञानविस्तार, काळबादेवी पोस्ट, मुंबई या पत्यावर व्ही. पी. नें मागवावें.

नो० नं० ९

## NATIONAL MEDICAL COLLEGE OF INDIA SCHOLARSHIPS.

Registered as a corporate body under Act XXI of 1860 of the Acts of the Viceroy teaches the full curriculum of L. M. S. & M. B. Standards, classes.

Grants L. M. S. (Natl) & M. C. P. S. Diploma Hospital Practice College Fee Rs 3 monthly Dissections Boarding.

Scholarship offered by the Founder Dr. S. K. Mullic Rs. 50, 40, 30, 25, for Matriculates and non-Matriculates College Council Hon'ble Maharaja of Cassimbazar, Rajah Peary Mohun Mukerjee Bahadur C.S.I. Honble Justice NA. Chaudhury. The Session begins January and June. Apply to the DEAN *301, Upper Circular Road, Calcutta.*

No. No. 10

| | |
|---|---|
| तांबूल नवरत्न | न कत्थेकी परवा न चुनेसे काम, हमारे मसालेका सबको सलाम. पानाच्या विड्यांत खाण्याचा उत्तम मसाला. चुना व कात्याची जरुर नाहीं. किंमत डबीस सहा आणे. |
| नवरत्न टेबलेट | उत्तम सुवासिक अत्तराच्या वड्या. किंमत डबीस तीन आणे. |
| नवरत्न तमाखु | पानांत खाण्याची केशर, कस्तुरी इत्यादि सुवासिक वस्तु मिश्रित तमाखु. किंमत दर तोळ्यास दीड आणा. |
| मद्रासी नस | अति उत्तम सुवासिक नस. मेंदूवर खास गुणकारी. बाटलीस चार आणे |
| गजकर्णाचें मलम | गजकर्णावर उत्तम औषध. डबीस चार आणे. |
| केश काढण्याचें तेल | केश काढण्याचा उत्तम इलाज. किंमत सीसीस अडीच आणे. |
| चन्द्रकांत बाम | मेंदूला व डोक्याला अति उपयोगी. सीसीस किंमत आठ आणे. |

बनविणार टी. एस. मित्र. जळगांव.

आकोल्याचे सोल एजंट- चमन कंपनी.

पत्ता— ताजनापेठ बाजार- आकोला.

नो. नं. ११

अनुभवास योग्य

सुवर्ण पदक मिळालेले

# ओटोमोहिनी

टिकाऊ, आनंद दायक, सुगंधी पदार्थ. जर कोणी ओटो मोहिनीचा सुवास चार दिवसांत उडून जातो असें प्रमाणसिद्ध करून दाखवील तर त्यास १०० रुपये बक्षीस देऊं, तर एकदां अवश्य १ बाटली खरीदी करून अनुभव पहावा व बक्षीसास तयार व्हावें. ।॥ औंसाच्या बाटलीची किंमत २ रुपये आणि १ ड्रामाच्या नळीस १२ आणे. ओटो मोहिनीचे सुगंधी कागद १२ आणे डझन.

मिळण्याचा पत्ता—ओरियेंटल ड्रग आणि केमिकल कंपनी सोल प्रोप्रायटर्स जुमा मसजिद मुंबई

नं. नं. १३

## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी

### राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

### राजवंशी सांध्याचें तेल,

किंमत रुपये ९ ट्रेड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे.

सरकारचे अॅनॅलायझर, वैद्य, डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सार्टिफिकिटें दिलीं आहेत.

### परमा सायरप

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट, यांचा दवाखाना.

३८ जांबळी मोहल्ला मुंबई.

नो० नं० १४

सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा



डॉ० वामन गोपाळ याचा

## आयोडाईज्ड सार्सापरिला.



हा सार्सापरिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धीवर गुण वाटून इतर रक्तशुद्धी करणाऱ्या औषधांत "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे. जुना संधिवात, त्वचे संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याची सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे. याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाण:-- डॉ. गौतमराव केशव

नो० नं० १६ ५६३ ठाकुरद्वार मुंबई.

## Oriental Government security Life Assurance Company, Limited,

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

R. PATERSON BROWN, MANAGER.

**FUNDS EXCEED 4½ CRORES.**

Claims paid for over 3½ Crores.

***ALL PERSONS***

WHO ASSURE FOR THE FIRST TIME
OR
WHO INCREASE THEIR PRESENT ASSURANCE
WITH

***THE ORIENTAL***

BY EFFECTING A WITH PROFIT POLICY
ON OR BEFORE 31 ST DECEMBER 1913 WILL BE ENTITLED TO

# THREE YEARS BONUS

PROVIDED
THREE YEARS PREMIUMS HAVE BEEN PAID
AND
THE POLICY IS IN FORCE ON 31St DECEMBER 1915.

Prospectus, forms, and further information can be obtained on application to—
CHIEF AGENCY FOR C. P. BERARS AND KHANDESH,—
NAGPUR.

M. DESOUZA
CHIEF AGENT,
*Nagpur.*

No N. 12

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

*Regd. NO N. 150*

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४८ ] आकोला—– सोमवार तारीख १३ माह एप्रील सन १९१४ इ० अंक १४

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

---

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.

हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील- नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठुडें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

---

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक { G. A. Phillips.
आकोला २।९।०९ { एजंट
नं १

---

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६¦ तोळे असतें.

[illegible] वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत [illegible]दराखालीं सांपडेल.

{ G. A. PHILLIPS.
१० { एजंट

---

## ' विकावयाचा आहे. '

वाशीम येथील, पूर्वीच्या डिस्ट्रिक्ट कोर्टाजवळ असलेला के॥ राव बहादूर पुरुषोत्तमराव नारायण भट यांचा बंगला विकावयाचा आहे.

खंडवा ते इंगोली व्हाया वाशीम लौकरच रेल्वे लाईन ओपन होणार असल्यानें गरजूनीं किंमती वगैरे विषयीं समक्ष किंवा पत्रद्वारें खालील पत्यावर खुलासा मागवावा.

ना० खं० फडके
वऱ्हाड समाचार ऑफीस आकोला
नो० नं० ३ वऱ्हाड

---

## खिजाबे मसीहा ( कलप )

हा लावला असतांना पांढरे केंस ५ मिनीटांत काळे होतात इतकेंच नव्हे तर अगदीं मृदु होऊन तकाकी देतात. हा कलप बरेच दिवस टिकून कलप लाऊन केस काळे केले आहेत असा भासच होत नाहीं. एकदा अनुभव पहावा. पैटीस १ रु. व्ही. पी. खर्च निराळा.

**खाकीसास जनावे टानिक पिल्स** या योगें नपूंसक मनुष्य तेव्हांच बरा होतो. औषधाचा गुण ३ दिवसांत किं. रु. २ व्ही. पी. खर्च निराळा.

**खाकीसास विल्लायें मसिहा.** इंद्रियाच्या ढीलेपणावर आश्चर्यकारक खात्रीचा इलाज. तीन दिवसांतच सदर्हू औषध आपला गुण दाखवितें. कि. रु. २ व्ही. पी. खर्च वेगळा.

शेट हरकचंद रतनजी आणि कंपनी.
३७ जुमा मसजिद मुंबई
नो० नं० ४

---

## अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० ग्रेग्रनाईट नोटपेपस व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही.पी.नें रु० १०६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत

पत्ता—वैद्रे आणि कंपनी पुणेंसिटी

नो० नं० ५

---

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ६

---

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानातील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तात्रडतोब दूर होतात. किं रु. १०८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ७

---

## WANTED

Seven Revenue Inspectors. Pay Rs. 25 plus Rs. 10 as pony allowance None need apply who have not passed the Matriculation or School Final Examination.

Applications with testimonials should reach the undersigned by the end of April 1914. Rejected applications will not be replied to. Selected candidates will have to join the posts at once

Dated Akola the 19 March 1914.

F. Dewar
Deputy Commissioner, Akola.

No. N. 8

---

### नोटीस

नोटीस आपि जवजे आपाजी काळे रा. सोनाटी ता. मेहकर इजला-

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुझी नोटीस ता. १७-३-१४ इ ची पावली, त्यांतील मजकूर अगदीं खोटा आहे तुझे लग्न होऊन सुमारें ६-७ वर्षें झाली. लग्न झाल्यानंतर माझा बाप तुजला आणण्या करितां तुझे बापाचें घरीं गेला असतां ( तूं ) अज्ञान आहेस तूर्त पाठवित नाहीं म्हणून २-४ वेळा तुझे बापानें बाहणें केल्यावरून माझा बाप परत आला. त्या नंतरही ( तूं ) सज्ञान झाल्यावर माझा बाप आणि मी स्वतः तुजला घेऊन येण्या करितां ४-५ वेळा आलों असतां तुझे बापानें हिलें बाहणें सांगून तुजला पाठविले नाहीं; आणि तूंही आली नाहींस लग्नाचे वेळेस तुझ्या आंगावर डागिनें घातले तेः-

| रु. | तपसील |
|---|---|
| १३ | सोन्याची नथ १ सहामासे |
| २५ | सोन्याच्या बळ्या ४ तोळा १ |
| ९ | मंगळसुत्र सोन्याचें १ |
| ३० | पितांबर १ |
| १८॥। | कडे चांदीचे २ वजन तोळे २५ |
| १६ | चांदीच्या कोपऱ्या जोड १ तोळे २० |
| १५ | चांदीची हासळी १ तोळे १६ |
| ७॥ | चांदीच्या पाटल्या जोड १ तोळे १० |
| १२७। | |

येणें प्रमाणे डागिनें तुझे अंगावरील पचविण्याचा आणि तुजला दुसरा नवरा करून देऊन त्याचेकडून कांहीं पैसे घेऊन खाण्याचा विचार तुझे बापाचा असल्याचे तुमकडून आलेल्या नोटीसीवरून कळून येत आहे. तुझे लग्नझाल्या दिवसांपासून मी व माझा बाप तुजला आणण्या करितां वर्षांतून दोन वेळा येत होतो. परंतु तुझे बापानें पाठविले नसून तूं न आल्यामुळें तुझे पोटगी खर्चांबद्दल मी जबाबदार नाहीं. हल्लीं ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांत वरील डागिन्या सुद्धां तूं माझे घरीं येऊन संसार करावा. मी तुजला वागवून तुझ्याशीं संसार करण्यास तयार आणि खुष आहों. दुसरा नवरा करण्यास माझी परवानगी नाहीं इतक्या वरही तूं दुसरा नवरा करशील तर डागिन्या बद्दल १२५ रुपये व लग्नखर्चा बद्दल १०० रुपये वसूल केले जाऊन तुजवर व गंधर्वीचें नवऱ्यावर व तुझे बापावर काम चालविले जाईल कळावे. तारीख ४-४-१९१४ इसवी.

सही
आयाजी वा० असरुजी काळे रा०
पांगरीकुटे ता० वाशिम पोष्ट
मालेगांव जाहागीर
नो० नं० ९

**पाहिजे आहेत.** पैसा आणि जोखमे वांचून धंदा करणारे. जास्त माहिती जे. आदम आणि कंपनी कोर्ट मुंबईकडून विचारणें.

नो. नं. १०

## पत्रव्यवहार

## अनाथ बालिकाश्रम--पुणें.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

सा. न. वि. वि. हिंदूंच्या ज्या जातींत विधवा विवाह रूढ नाहीं. त्या जातींतील अल्पवयस्क विधवांना शिक्षण देऊन त्यांचीं मनें सुसंस्कृत करणें, व आपलें जीवित उपयोगी असून तें कोणत्या तरी कार्याला लावितां येईल असा विश्वास त्यांच्यामध्यें उत्पन्न करणें, हा आश्रमाचा मुख्य हेतु आहे. आमच्या समाजाचा विधवा संबंधानें एकंदर रोख असा आहे. कीं, विधवा झाल्याबरोबर "आतां आपल्यास जगून तरी काय करावयाचें आहे? स्वतःला व दुसऱ्याला भार अशा या जीविताचा एकदां लवकर शेवट होईल तर बरें" असे विचार विधवा स्त्रीयांच्या मनांत नेहमी येतात. अशा अनाथ विधवा आश्रमांत आल्यानंतर लवकरच त्यांची वृत्ती प्रफुल्लित होते. व आपलें जिवित म्हणजे स्वतःच्या व देशाच्या उपयोगी पडण्यासारखी एक मुल्यवान चीज आहे, असें त्यांना वाटूं लागतें. शिक्षकिणीचें, सुईणीचें, आजाऱ्याच्या शुश्रूषेचें काम करून स्वतःच्या पायावर उभें राहण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं आणावें, ही आश्रमाची इच्छा आहे. एका विधवेमागें वर्षाचा सरासरीनें शंभर रुपय खर्च येतो. आश्रमांतील आयुष्यक्रम घरच्या आयुष्य क्रमाशीं बराच जुळतो गृहकृत्यामध्यें त्यांनां थोडेंसें लक्ष घालावें लागते. आणि त्यांच्या नैतिक व धार्मिक शिक्षणाची फारच चांगली सोय आश्रमांत केलेली आहे. हिंदु-परंपरेला अनुसरून धर्मीतील उदात्त तत्वांची कल्पना त्यांना दिली जाते. आश्रमांतील विद्यार्थिनीची संख्या सुमांर १०९ आहे व ती दर महा वाढत चालली आहे. विधवा मुलींची जातवारी येणें प्रमाणें आहे.

| | |
|---|---|
| कोकणस्थ | ३४ |
| देशस्थ | ३१ |
| कऱ्हाडे | १९ |
| सारस्वत | १० |
| कायस्थ प्रभू | ९ |
| दैवज्ञ ब्राह्मण | ९ |
| वैश्यं | ३ |
| उच्च कुलांतील मराठे | १ |
| देवरूख | १ |

आश्रमाच्या शाळेतील शिक्षण क्रम बहुतेक सरकारी अभ्यास क्रमाप्रमाणें आहे. हिंदी भाषा शिकविण्याची सोय आश्रमांत केलेली आहे. ड्रॉइंग थर्ड ग्रेटपर्यंत शिकवितात. मराठी पांचव्या वर्गापासून संस्कृत शिकविण्याचा आरंभ होतो. इंग्रजी ६ वे इयत्तेचा वर्ग सध्या आश्रमांत आहे त्यांत १० विधवा शिकत आहेत. आणखी एका वर्षीनें म्यादिक्युलेशनचा वर्ग काढून आश्रमाचे पूर्ण हायस्कुल होईल. हल्लींची आश्रमाची जागा पुरत नाहीं, त्यासाठीं सुमारें पंधरा हजार रुपयांची नवीन इमारत बांधण्यास सुरवात केली आहे. आश्रमाचा दरसालचा खर्च सुमारें १९ हजारावर आहे. कोणावर फारसें ओझें न पडतां एवढा वार्षिक खर्च चालण्यास हरकत पडूं नये. आश्रमाची ज्यांना माहिती आहे व आश्रमाचें काम ज्यांना आवडतें आहे अशा सर्व सद्गृहस्थानीं उदार हस्तानें आश्रमास मदत करावी अशी विनंती आहे आश्रमाची माहिती देऊन वर्गणी जमविण्याकरितां मी सध्या वऱ्हाडांत फिरत आहे तरी या सत् कार्यास सर्वांनीं मदत करावी अशी मी पुन्हा एकदा विनंती करतो. वर्गणीचें कामीं मला खालील सद्गृहस्थानीं फार मेहनत घेऊन मदत केली मि० डी. बी. साने उमरावती. मि दोंदे अकोला, मि. मुधोळकर मलकापूर, मि. कोठारे खामगांव इत्यादी. वर्गणीदारांची यादी नांववार व गांववार खालील प्रमाणें आहे.

### उमरावती

| | रु. |
|---|---|
| मि० केशवराव भोसले मालक ललितकला नाटक संगीत मंडळी. | १०० |
| रा. सा. ना. भा. गाडगिळ | १९ |
| मि. स. द. सबनिस | १० |
| " लाला रामचरण C/O भगाडे सबजज्ज | १० |
| " ह० ज० खरे वकील | ५ |
| " बी. जी. बोधनकर | ५ |
| " डी. जी. आपटे | ५ |
| रा० सा० ब्रह्म वकील | ४ |
| मि. एल. जी. देशपांडे वार्षिक | २ |
| " जी. व्ही. काणे | २ |
| " बी. आर. गडबोले मुनसफ | २ |
| " टी. एल. शेवडे | २ |
| " पी. बी. दिक्षित | २ |
| " हितचिंतक वार्षिक | २ |
| " वाय. जी. देशपांडे | २ |
| " एन्. व्ही. शारंगपाणी | २ |
| " आर. पी. बेंद्रे | २ |
| " पांडे वकील | २ |
| " जोग | २ |
| " संजाना | २ |
| " बापुसाहेब पेंडशे | २ |
| रा. सा. गोळवलकर मुनसफ | २ |
| मि. पां. रा. जोशी | १ |
| " गु. शी. देशमुख | १ |
| " पालेकर वकील | १ |
| " एम्. बी. गणोरकर | १ |
| " डी. के. अमीन | १ |
| " एस्. एस्. केतकर | १ |
| डॉ. शहाणे | १ |
| मि. आर. एम्. खर | १ |
| एकूण | १९० |

### आकोला

| | |
|---|---|
| धि. बरार ट्रेडिंग कंपनी से. हतवळणे वकीलमार्फत सन १९१३ व १४ सालची वार्षिक वर्गणी | १० |
| मि. एम्. डी. भागवत से. ट. श्रीलक्ष्मी आइलमिल कंपनी | १० |
| मि. एन्. के. दाते वकील वार्षिक | १० |
| " व्यं. कृ. देसाई वकील वार्षिक | ५ |
| मि. ए. बी. नरगुंदकर वार्षिक | १ |
| " रा. आ. दोंदे वार्षिक | १ |
| धि. से. प्लीडर्स क्लॉर्क असोसियेशन रा. य. फडकेमार्फत | १ |
| मि. ना. ग. कान्हेरे वार्षिक | ८ |
| एकूण | ३८८ |

### खामगांव

| | |
|---|---|
| मि. वि. स. अगेकर वकील वार्षिक | १२ |
| " वि. वि. कर्वे | १० |
| मेसर्स कारकून मंडळी वकीलाची | ७ |
| " ना. म. जोशी | ५ |
| " ना. य. टीपनीस वार्षिक | ५ |
| " 'क्ष' | ५ |
| " वि. ना. ठोसर वकील | ५ |
| रा. सा. वाय. एम्. चिटणवीस वार्षिक | ५ |
| " मि. क. ना. देशमुख | ५ |
| " त्रिं. के. खानझोडे | ५ |
| " नारायण रामचंद्र | २ |
| " एन. डि. धरव | २ |
| " एम्. डब्ल्यु. नेरीकर | १ |
| " आर. एन् गुते | १ |
| " सखाउल्लाखान | १ |
| " रा. के. काळे | १ |
| " बळीराम जयराम | १ |
| एकूण | ७३ |

### मलकापुर

| | |
|---|---|
| मि. ग. भ. पाटणकर | ४८।१२ |
| " वि. बा. सावजी | २० |
| " श्री. गो. मुधोळकर | १२ |
| " बा. बि. सोमण | ५ |
| " गो. ज. बापट वार्षिक | ३ |
| " पु. कृ. काळेले | ३ |
| रा. सा. शि. कृ. करमरकर | २ |
| मि. ग. बा. चेपे | २ |
| " दा. ब. काणे | २ |
| " ग. म. सोमण वार्षिक | १ |
| " बी. आर. ओक | १ |
| " वाय. आर. भिडे | १ |
| " बा. रा. पाटील | १ |
| मि. गो. प. परांजपे | १ |
| " धों. रा. बंदिष्टे | १ |
| " कों. रं. शेंबेकर | १ |
| " पा. ह. रानडे वकील | १ |
| एकूण | १०९।१२ |

### चाळीसगांव —खानदेश

| | |
|---|---|
| मि. ना. शेवडे | ५ |
| रा. सा. के. ही. वझे वार्षिक | ५ |
| मि. ए. डी. धरमसिंह | २ |
| " नारायण बेटक शेट | २ |
| " भा. गो. शहाणे | १ |
| " भा. ना. राव | १ |
| " श. मो. कुलकर्णी | १ |
| एकूण | १७ |

एकूण रुपये ४२४।४ जमले आहेत याच कामाला मी पुढें बुलठाणेकडे जात आहे बाकीची पोंच पुढें पाठवून देईन क. हे वि.

ता० ३०-३-१९१४ आकोला

केशव मोरेश्वर फडके
आश्रमातर्फे कामगार

वऱ्हाडसमाचार

मित्ती चैत्र वद्य ३ शके १८३६

## साध्वी श्री अहिल्याबाई होळकर.

इंदूरचे रा. 'पुरुषोत्तम' नामधारी लेखक यांचे परिश्रम व श्रीमंत सौ० चंद्रावती महाराणीसाहेब होळकर यांचें औदार्य व पूर्वजांविषयींचा सदाभिमान यांच्यामुळे गतवर्षी प्रसिद्ध झालेल्या देवी श्री अहिल्याबाईच्या सुंदर चरित्राचें अवलोकन करीतअसतां त्या साध्वी राज्ञीच्या न्यायीपणाची साक्ष देणारी एक महत्त्वाची गोष्ट सदर चरित्रांत देण्याचें राहून गेल्याचें आढळून आल्यावरून आमच्या एका विद्वान मित्रानें सदर ग्रंथाची पूर्तता करण्याच्या उद्देशानें पुढील गोष्ट आमचेकडे प्रसिद्धीसाठीं पाठविली आहे. आमचे व्यवसायबंधु ती उतरून घेऊन तिचा प्रसार करतील असा आह्मांस पूर्ण भरंवसा आहे. ती गोष्ट अशी —

साध्वी अहिल्याबाई राज्य करीतअसतां पुण्यास श्री. नारायणराव पेशवे यांचा सुमेरसिंग व इतर गारदी यांनीं खून केला व त्यावरून पुण्याचे दरबारी वातावरण क्षुब्ध होऊन खून करणाऱ्या सुमेरसिंग आ० लोकांना दहशत बसण्यासारखी शिक्षा व्हावी अशा बुद्धीनें व कांहीं अंशी क्षुब्ध मनोवृत्तीला वश होऊन त्या दरबारानें सुमेरसिंगाचे भाईबंद, आप्त, वगैरे कोठें असतात, त्यांच्या निर्वाहाचें साधन काय आहे, त्यांचे जवळ जिंदगी किती आहे वगैरे गोष्टींचा तपास केला. तेव्हां त्यांना बातमी लागली कीं इंदूर संस्थानांत सदर खुनी माणसाचे आप्त आहेत. त्यावरून पुणें दरबारानें पुढें अहिल्याबाईला पत्र लिहिलें कीं सुमेरसिंग राजद्रोही असल्यामुळें त्याच्या आप्तांची जिंदगी जप्त करून सरकार जमा करावी. अहिल्याबाईच्या राज्यांत सदर आप्त राहत होते ही गोष्ट खरी आहे. तथापि ते गरीब स्थितींत होते व त्यांचें सदर खुनाचे कामांत बिलकुल अंग नव्हतें अशी पक्की खात्री करून घेतल्यावर अहिल्याबाइला त्यांची दया आली, आणि अशा निरपराधी माणसांची जिंदगी जप्त करणें हा अन्याय होईल असें जाणून त्यांनीं पुणें दरबारास साफ लिहिलें कीं सुमेरसिंगाचे ते आप्त येवढ्याच कारणासाठीं त्याचेकडे कांहीं गुन्हा नसतां त्याची जिंदगी जप्त करणें हा इश्वराचे घरीं मोठा अन्याय होईल, आणि तो करण्यास माझे हात धजत नाहींत. त्यांचेकडे खरोखर अपराध असता तर कोणतीही शिक्षा त्यांना करणें योग्य होतें. पण अपराध नसतां केवळ बादरायण संबंधामुळें त्यांना शिक्षा भोगण्यास लावणें हें कृत्य माझ्यानें होणार नाहीं. अहिल्याबाईच्या या स्पष्टोद्गारावरून तिची प्रजावत्सलता पापभीरुता, न्यायबुद्धि आणि मनाची खंबीरता हे गुण उत्तम प्रकारें व्यक्त होतात. ही गोष्ट काल्पनिक किंवा ऐकीव दंतकथा नसून तिला कागदपत्रांचा पुरावा आहे असें कळतें.

## ब्राह्मसमाजाची पीछेहाट

बंगाल्यांत ब्राह्मसमाज नांवाची धर्मसुधार-ी एक संस्था आज साठ वर्षें अस्तित्वांत हे या साठ वर्षांत तिचें पाऊल पुढें न तां उलटें आंत येत चाललें आहे याचें रण काय असा एक प्रश्न हातीं घेऊन ळकत्त्याचें इंडियन मिरर नांवाचें सन्मान्य नेक पत्र ह्मणतें कीं या पछिहाटीचें हें ख्य कारण आहे कीं या समाजाचे कांहीं ायक धर्मप्रचार हें आपलें मुख्य कर्तव्य न मजतां राजकारणांत पडून आपला वेळ, क्ष, आणि बुद्धि तिकडेच खर्च करतात व ुख्य कार्यास विसरतात. ही कारणमीमांसा ामच्या मतें चुकीची आहे. कारण या समाजाचे संस्थापक राजा राममोहनराय हेही राजकारणांत पडणारे होते आणि त्यांच्या वेळीं ही संस्था जोमांत होती. शिवाय राजकारण आणि धर्मसुधारणा हे विषय परस्पर विरोधी आहेत ही समजूत चुकीची आहे. आमच्या मतें या समाजाची पीछेहाट होण्याचीं कारणें त्या समाजाच्या इतिहासांतच अंतर्भूत आहेत, आणि तीं सरल रीतीनें शोधून पाहणारास सहज दिसणारीं आहत. इतर समाजाहून निराळे राहण्याची प्रवृत्ति, नायकांच्या शिलांतले ठळक दोष, खऱ्या कळकळीचा अभाव, उच्चार आणि आचार याच्यांतला छत्तीसाचा आकडा, जातिभेदासारख्या सनातन संस्थेवर वेळीं अवेळीं करण्यांत येणारा ...ार मूलक प्रहार, मूर्तिपूजेचा द्वेष, एकीचा अभाव वगैरे अनेक दुसरीं कारणें आहेत. त्या कारणांचा निर्देश न करता भलतेंच कारण पुढें करण्यांत अर्थ नाहीं.

## शास्त्रीय ज्ञान आणि उद्योग.

कलकत्त्याचे त्रिखंड कीर्ति मिळविलेले शास्त्रज्ञ डा. पी. सी. राय यानीं या विषयावरील आपले विचार नुकतेच प्रकट केले आहेत, आणि ते खरोखर मनन करण्यासारखे आहेत. अलीकडे आपल्या देशांत शास्त्रीयज्ञानाचा प्रसार ज्या मानानें होत आहे व आपले लोक परदेशांतून शास्त्रीय विषयांत पदव्या मिळवून येत आहेत, त्या मानाने इकडे नवीन कारखाने निघून उद्योगी वाढ कां होत नाहीं? असा प्रश्न कधीं कधीं विचारण्यांत येत असतो. याचें उत्तर डा. राय असें देतात कीं आमचे लोक शास्त्रज्ञान शिकून आल्यावर मग त्यांना कारखाना चालविण्यास लागणारें व्यवहारज्ञान मिळवावें लागतें. हें व्यवहारज्ञान सहज मिळणारी वस्तु नाहीं. इतर विषयासारखीच कालातरानें येणारी ती विद्या आहे. पण आमचे लोकांस उतावीळपणा होऊन हें व्यवहारज्ञान मिळण्याचे अगोदरच ते कारखाने काढतात व व्यवहारज्ञानाचे अभावीं अपयश पदरीं घेऊन बसतात. दुसरी गोष्ट अशी कीं ते परदेशीं एखादी विद्या शिकण्यास जाण्यापूर्वी तिच्यासंबंधानें आपल्या देशांत मिळणारी माहिती मिळवीत नाहींत, एकदम परदेशीं जातात, व परदेशांतली परिस्थिति आपल्याहून भिन्न आहे ही गोष्ट लक्षांत न घेतां परत आल्यावर एकदम कारखाना चालवूं पाहतात, आणि त्यामुळें फसतात. तिसरें कारण, जर्मनी वगैरे देशांतून कारखान्याला जोडून उद्योगधंद्यासंबंधानें शोध करण्याच्या कामांत गुंतलेले असे शास्त्रज्ञ पगारी ठेविलेले असतात. मालक कारखान्यांत अधिक चांगला कसा काढतां येईल तें पाहणें येवढेंच काम त्यांचें. इतर गोष्टींकडे त्यांनीं पाहावयाच नाहीं. अशी व्यवस्था आपल्या इकडे कोठें आहे? वाटोळ्या भोकांत चौरस बसविल्याप्रमाणें आमच्या इकडे स्थिति बहुधा असते. ज्यांना व्यवहार कळत नाहीं, व उद्योगधंद्याचें विशेष ज्ञान नाहीं अशांच्या हातीं कारखान्याची व्यवस्था असते, आणि ज्यांना शास्त्र कळत नाहीं ते शास्त्रज्ञांच्या व्यवस्थेंत ढवळाढवळ करूं पाहतात. मिळून शास्त्रीय शोध व कारखान्यांची व्यवस्था दोघांचा ही विचका होऊन मालही चांगला निघत नाहीं व निघाला तरी तो खपत नाहीं. आपल्या देशांत इतक्या ब्यांका बुडाल्या त्याचें एक कारण हें आहे. शास्त्रीयज्ञान आणि व्यवस्था हीं कारखन्यांचीं दोन अंगें आहेत. आणि तीं स्वतंत्र असली तरच त्यांची वाढ होऊं शकते. नाहीं पेक्षां दोन्ही खुरजटतात. आमचे कारखाने नीट न चालण्याचें आणखी एक कारण हें आहे कीं परदेशाहून शिकून आलेली तरुण मंडळी इकडच्या कारखान्यांत काम करणाऱ्या अशीक्षित कारागीरी वर्गांत मिसळत त्यांना आपल्या ज्ञानाचा फायदा करून देत नाहींत. ते साहेबी थाटानें या कारागिरापासून दूर दूर राहतात. याचा परिणाम असा होतो कीं या लोकांच्या शास्त्रीय कल्पना पाच्याच जवळ राहून कारागिरांच्या कृतींत जें प्रत्यक्ष स्वरूप त्यांना यावयाला पाहिजे तें मुळींच येत नाहीं. या सर्व गोष्टी आमच्या औद्योगिक अवनतीच्या मुळाशीं असता त्यांचा विचार व्हावा तसा आपले कारखानदार व सुशिक्षित आणि सधन लोक किंवा उद्योगाच्या उत्कर्षाचें काम शिरावर घेणाऱ्या संस्था यांचे हातून व्हावा तसा अद्याप झालेला नाहीं त्यामुळें जो उठतो तो शास्त्रीय ज्ञान व्यावहारिक नसतें असा व्यर्थ दोषारोप आमच्या सुशिक्षितांवर करतो, कोणी भांडवलाच्या आमच्या शीलाविषयीं छिद्रान्वेषण करतो, कोणी भांडवलाच्या अभावीं आमचे कारखाने चालत नाहींत असे विधान करतो, तर कोणी परकीय लोकांची स्पर्धा, सरकार किंवा अन्य गोष्टी यांच्यावर अपेशाचें खापर फोडण्यास तयार होतात. पण वस्तुस्थिति वर सांगितलेल्या प्रकारची आहे. ती सुधारणें आपल्या हातचें आहे. ती सुधारण्यास सरकारच्या मदतीची किंवा अधिक भांडवलाची खरोखर जरूरी नाहीं. व्यवहार हे शास्त्र आहे. त्याचा अभ्यासही इतर शास्त्राप्रमाणें पद्धतशीर केला पाहिजे आणि योग्य स्थानीं योग्य वस्तु ठेवण्याचें धोरण ठेविलें पाहिजे येवढी गोष्ट जर आमचे सुशिक्षितलोक व कारखानेवाले व भांडवलवाले ध्यानांत ठेवतील तर हल्लींच्या स्थितींत पुष्कळ सुधारणा होईल असें डा. राय यांचें ह्मणणें आहे. डा. राय हे स्वतः उत्तम शास्त्रज्ञ आहेत, तसा इंग्रजी औषधें, अर्कवगैरे तयार करण्याचा कारखानाही त्यांनीं उत्तम प्रकारें चालविला आहे. तेव्हां अशा माणसाच्या अनुभव प्राप्त शिकवणीचा विचार आमचे लोकांनीं अवश्य करावयास पाहिजे.

## देशाचें ऋण.

आपल्या शास्त्रांत ऋणांत मरणें हें एक मोठें पाप गाणिलें आहे. ऋण अनेक प्रकारचीं आहेत. धनाचें ऋण हेंच एक ऋण नाहीं. एखाद्याचे उपकार करून घेणें हें ऋणच आहे आणि प्रसंग मिळाला असतां ही तें न फेडणारास समाज कृतघ्न अशी निंदासूचक संज्ञा देत असतो. पितरांचें ऋण हे एक ऋणच आहे आणि त्यां प्रेमानें वागणें त्यांच्या आज्ञा पाळणें, वृद्धपणी त्यांची निगा राखणें व त्यांच्या मरणोत्तर त्यांच्या तृप्तीसाठीं श्राद्धें वगैरे करणें हे ऋण फेडण्याचे प्रकार शास्त्रांत सांगितलें आहेत. हीं जशीं ऋणें आहेत तसें देशाचें ही एक मोठें ऋण आहे. कारण जन्मभूमि ही आपली जननीच आहे. तेव्हां मातेवर प्रेम करणें आणि तिची सेवा करणें हे जसे तिचे ऋण फेडण्याचे प्रकार आहेत, तसें आपल्या जन्मभूमीवर प्रेम करून तिची सेवा अर्थात् आपल्या देशबंधूंची—सेवा करणें हेंही तितक्याच महत्त्वाचें आणि अवश्य कर्तव्य आहे. हे ऋण इतरांपेक्षां सुशिक्षितांवर ज्यास्त आहे. कारण, त्यांच्या अन्नवस्त्रादलीकडे कांहीं ज्यास्त त्यांना त्यांच्या देशबंधूकडून फुकट मिळालें असतें. हें ज्यास्त काय आहे ते स्पष्ट करून सांगण्याची अवश्यकता नाहीं. सरकारी रिपोर्टाचें अवलोकन करणारास हें ठाऊक असलें पाहिजे कीं त्यांच्या शिक्षणासाठीं लागणारा खर्च त्यांच्या फीतून भागलेला नाहीं. कॉलेजात शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यामागें दरसाल माणशीं सरासरी १७९ रु. खर्च येतो. पैकीं फीच्या रुपानें विद्यार्थ्याकडून फक्त ७९ रु. वसूल होतात. हायस्कुलांतल्या प्रत्येक विद्यार्थ्यामागें दरसाल सुमारें २६ रु. खर्च येतो. पैकीं फक्त १४ रु. तो देतो. आणि प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यामागें ४ रु. खर्च येतो. पैकीं १ रुपयासुद्धां त्याला द्यावा लागत नाहीं. हा ज्यास्त खर्च कोण देतें ? सरकार ही गोष्ट खरी आहे. पण सरकार किंवा म्युनिसिपालिट्या अथवा लोकलबोर्डें तरी पैसा कोठून आणतात ? याचें उत्तर शेतांत खपणाऱ्या गरीब शेतकऱ्यांकडून हेंच सामान्यतः ह्मटलें पाहिजे. कारण हिंदुस्थानांत शेकडा ८० लोक शेतकीचा धंदा करणार असल्यामुळें त्या गरीबांच्या चतकोर भाकरीतला एक तुकडा त्यांना देशांतल्या मुलांच्या शिक्षणासाठीं द्यावा लागतो. यावरून उघड झालें कीं ज्याला नुसतें रटफ करतां येत आहे त्यापासून तों तहत हायकोर्ट जज्ज, संस्थानिकांचे दिवाण किंवा कोट्याधीश पेढीवाले याचे पर्यंत प्रत्येक जण आपल्या शिक्षणा पुरता तरी गरीब शेतकरी व कामकरी वर्गाचा ऋणी आहे. या वर्गानें आपण स्वतः अर्धपोटीं राहून आपल्या भाकरीतला तुकडा आपल्या बांधवांच्या शिक्षणासाठीं दिला त्यांचे उपकार सुशिक्षित फेडीत आहेत काय? फेडण्याचा कोणता यत्न ते करीत आहेत? आतां पर्यंत आपण हें ऋण किती अंशानें फेडलें व किती अंशानें फेडावयाचें राहिलें याचा हिशोब प्रत्येक सुशिक्षितानें आपल्या मनाशीं करावयास नको काय? जर तो न करील तर ईश्वराचे घरीं पातकी ह्मणून ठरणार नाहीं काय? नीतिशास्त्राच्या आणि व्यवहाराच्याही दृष्टीनें त्याची गणना अधमांत होणार नाहीं काय? हें ऋण फेडण्याचें प्रसंग सुशिक्षिताला पदोपदीं येत आहेत. पण त्यांचा उपयोग खरोखर कितीजण करून दाखवीत आहेत? किती सुशिक्षित हें ऋण फेडण्यासाठीं आपला पोटापाण्याचा धंदा करून राहिलेला वेळ शेतकऱ्यांच्या व आपल्या इतर देशबंधूंच्या मुलांना व मुलींना फुकट शिक्षण देण्यांत खर्चीत आहेत? कितीजण द्रव्यप्राप्तीच्या आशेनें नव्हे तर, खरोखर देशबंधूच्या उपयोगीं पडावें व त्यांच्या खर्चानें आपण सुशिक्षित झालों, तसें आपल्या स्वेच्छाप्रेरित कृतज्ञबुद्धीच्या सेवेनें पुस्तकें लिहिण्याच्या, छापण्याच्या व त्यांचा प्रसार करण्याच्या पवित्र कार्यांत गुंतले आहेत? किती जण आपणांस येत असलेला धंदा इतरांस फुकट व हौसेनें शिकविण्यास तयार आहेत? आह्मी सुशिक्षित होऊन आपणांवर उपकार करणारांशीं कृतघ्न झालों असा काळीमा आपणाला लावून घ्यावा काय? नसेल तर तरुण मंडळीहो, जागे व्हा, विचार करा, तुह्मी उपकारबद्ध आहां, देशाचे ऋणी आहां ही गोष्ट डोळ्यांसमोर ठेवा, आणि आपणावरचें देशाचें उपकाराचें ऋण फेडण्यास राजनिष्ठा, सत्यनिष्ठा, आणि कर्तव्यनिष्ठा या त्रयीनें प्रेरित होऊन पुढें व्हा. तरच तुह्मी आपल्या शिक्षणाचें चीज केलें असें होईल. नाहींतर सद्विचाराच्या दृष्टीनें आणि धर्मशास्त्राच्याही दृष्टीनें तुमची पतितांत गणना होईल.

## काळयाची बहादुरी.

दक्षिण आफ्रिकेंत काळ्या गोऱ्यांत चालत आलेला झगडा जगविश्रुत आहे. त्याच आफ्रिकेच्या दुसऱ्या एका भागांत केप कॉलनी नांवाच्या वसाहतींत एका काळ्या आदमीनें गोऱ्या प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादल्याचें वर्तमान ऐकून कोणाला हर्ष होणार नाहीं? केप कॉलनीच्या वसाहतीचा कारभार करणाऱ्या पार्लमेंटाची निवडणूक नुकतीच झाली. तेवेळीं एका परगण्या तर्फे एक मुसलमान व एक युरोपियन असे दोन उमेदवार होते, मुसलमान गृहस्थाचें नांव डा. अबदुल रहमान हें आहे. आश्चर्याची गोष्ट ही कीं डा. अबदुल रहमान यांस युरोपियन उमेदवारापेक्षां दोन अडीचेंशें मतें अधिक मिळालीं, या विजयाबद्दल डा, अबदुल रहमान यांचें आह्मी अभिनंदन करतों, आणि त्याच्याच बरोबर तेथील गोऱ्या रहिवाशांचीं मनें हिंदी माणसाविषयीं अद्याप शुद्ध आहेत व त्यांना गुणाची खरी परीक्षा आहे हें पाहून आनंदही होतो.

## हिंदु मुसलमानांचें ऐक्य.

हिंदु व मुसलमान यांचें ऐक्य करण्यासाठीं सार्वजनिक पुढाऱ्यांकडून आजपर्यंत

अनेक वेळां प्रयत्न झाले, पण त्यांना यांवे तसें यश आलें नाहीं. खुद्द कांग्रेसनें ही एकवार असा प्रयत्न करून पाहिला होता. पण उच्चादर्शीच्या सरकारी अधिकाऱ्यांनीं असा प्रयत्न केल्याचें उदाहरण संयुक्त प्रांताचे ले. ग. सरजेम्स मेस्टन यांचेंच एकट्याचें आहे. यांनीं दोन्ही जातींच्या निवडक पंचवीस पंचवीस पुढाऱ्यांना एकत्र बोलाविलें आहे. या कान्फरन्स पुढें कोणती योजना ते मांडणार आहेत व त्यावर कशाप्रकारें चर्चा होते तें पाहणें आहे. सर जेम्स मेस्टन यांनीं हरिद्वार येथील गुरुकुलाला जाऊन त्याविषयीं जो प्रशंसापर अभिप्राय व्यक्त केला व कानपूर येथील मशीदीबद्दलच्या तंट्याचा समाधानकारक निकाल लावण्यांत जी मानसिक उदारता व सहानुभूति व्यक्त केली, त्यांवरून या कान्फरन्सपासून इष्टार्थांचीच निष्पत्ति होईल असें ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं.

## डा० जगदीशचंद्र बोस

यांची शास्त्रीय शोधाविषयींची कीर्ति कोणास ठाऊक नाहीं? यांनीं आजपर्यंत जे शास्त्रीय शोध लाविले त्यांची यादी बरीच लांबलचक होईल. यांचे निबंध वाचून इंग्लंड, जर्मनी, व अमेरिका या देशांतील विद्वन्मंडळ्या कौतुकानें मान तुकावत आहेत, आणि त्यांना आपल्या सभेंत व्याख्यानें देण्यास आदरानें बोलावीत आहेत. पण दिव्याखालीं अंधार या ह्मणीप्रमाणें खुद्द कलकत्यांतल्या कलकत्यांत तेथील युनिव्हर्सिटीला डा० जगदीश यांची किंमत वाटत नाहीं! त्या युनिव्हर्सिटीनें हजारों रुपये खर्चून परदेशाहून व्याख्याते आणविले, पण डा० जगदीशराय यांना विद्यार्थ्यांना व्याख्यानें देण्याइतकी पात्रता आहे हें मुद्दां ठाऊक नाहीं. फार काय पण या युनिव्हर्सिटीच्या फेलोंच्या यादींत मुद्दां यांचें नांव नाहीं. सायन्स कॉलेजच्या कमिटींतही त्यांना घातलें नाहीं! याचें नांव गुणज्ञता! परवा आह्मीं यंत्र केलें आणि त्यंव केलें ह्मणून त्या युनिव्हर्सिटीचे व्हाइसचान्सेलर डा. सर आशुतोष मुकर्जी यांनीं आत्मश्लाघेचें जें पुराण वाचलें त्यावर आणि युनिव्हर्सिटीच्या गुणग्राहकतेवर ही एक मनोहर टीका छापली पाहिजे. खुद्द कलकत्ता युनिव्हर्सिटींत देशी व्हाइसचान्सेलरांच्या अमदानींत हा आंधळेपणा, मग मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या आवारांत त्यांच्या जगन्मान्य ग्रंथांना मज्जाव असल्याचें नवल काय? कलकत्ता युनिव्हर्सिटीनें गुणग्राहकता दाखविली नाहीं ह्मणून डा. बोस यांची कोणत्याही प्रकारें हानि झालेली नाहीं व होणार नाहीं, त्या युनिव्हर्सिटीचा नादानपणा मात्र सगळ्या जगाला दिसून देत झाला येवढेंच.

## गुरुशिष्यसंबंधाची दुसरी अवस्था

### -पर्वार्धाचा उपाग्घात-

मागील अंकावरून पुढें चालूं.

दुसऱ्या अवस्थेच्या पूर्वार्धांत गुरूंची सारखी क्रिया आणि विधान सांगण्याची धांदल उडालेली असते. रात्रंदिवस शिष्यगृहाशिवाय त्यांस दुसरें गृहच दिसत नाहीं. व्यवसायांतून सुटके नासुटके कीं सत् गुरुवेनमः अथवा सच्चिदानंद असें ह्मणत ह्मणत शिष्यांच्या घरीं पोहोंचलेच. वेळहीं अशी शोधावयाची कीं पुरुष शिष्यें घरीं नसावीत. हळच घरांतील स्त्री मंडळीस उपदेश देऊन आधुनिक गुरु घरचें घर काबीज करून घेतात इतक्या अवघींत विधानांत गुंतलेली शिष्यें आतां तर त्यांच्यामागें विधानें लावलेलींच असतात. शिष्यिणीं बरोबर ज्ञान चर्चा करण्यास गुरुजीस बरीच संधि सांपडते. ही ज्ञानचर्चा ह्मणजे बहुत करून घरांतील माणसांचे अवगुण शिष्यिणीं कडून ठच्चारवावयाचे, गुरुजीस भागवतांतील स्त्रीधर्माची चिरड, पतिव्रता धर्माची शिसारी, भक्तिमार्गाचा तिरस्कार असावयाचाच. हीं नसतील तर गुरुजींची पद्धत जुळतच नाहीं. वर सांगितलेल्या रितीनें प्रथमतः घरांतील एकदोन शिष्यें माठाळलीं कीं गुरुजी स्त्रियांस उपदेश करण्याच्या उद्योगास लागतात. मग स्त्रियांच्या वशिल्यानें त्यांच्या पतींस उपदेश करतात हें मागें सांगितलेंच आहे. ह्या उपदेशाची पद्धतिही मागें सांगितलीच आहे. गुरुजी मंत्रांचें नुसतें थोतांड करतात; त्यांस शिकवावयाचा असतो वेदांत ह्मणजे दिलेला मंत्र कुच कामाचा आहे असें मंत्रदातेच गुरु सांगत असतात. गुरु नेहमीं ह्मणत असतात, अहो भक्तिमार्ग लंगडा आहे तो मोक्ष देऊं शकत नाहीं देवतेस मोक्ष देण्याचें सामर्थ्य नाहीं. वेदांत मार्ग खरा. लोक दुराग्रही नसतील तर वाटेल त्यापुढें मी वेदांत हा प्रत्येक वस्तूंचा पाया आहे असें सिद्ध करून देईन अशा वल्गना नित्य बायकां जवळ केल्यानें त्यांच्या मनांवर काय परिणाम घडत असतील तें कल्पनानुमेय आहे. त्यांस आपणास ज्ञान प्राप्त करून देणाऱ्या गुरू शिवाय कांहींच दिसेनासें होतें. त्यांत गुरुजी हळूच सांगूं लागतात मी सद्गुरु ह्मणजे प्रति सर्व शक्तिमान् परमेश्वर मला न मानणें ह्मणजे न मानणारा नास्तिक होय तसा तुमचा हा पति आहे. सर्व जग रजोगुण वृत्ति असतेंच कारण विश्वोत्पत्ति तरी रजोगुणा पासूनच झालेली परंतु स्त्रियांस तुमचा पति रजोगुण वृत्ति आहे ह्मणून त्यांच्याजवळ त्यांच्या पतीची निर्भर्त्सना करण्यास गुरुजी सुरुवात करतात हेतु इतकाच कीं अतःपुरांत गुरुजींची डाळ पक्की शिजावी. गुरुजी हळू हळू आपल्या मरणाची ( छे! वेदांत्यास मरण नाहीं देह पाताची ) गोष्ट शिष्यांपुढें काढूं लागतात. शिष्यिणी पुढें होणाऱ्या वियोगाबद्दल धायधाय रडून दुःख प्रदर्शित करतात. आपलें वजन किती पडलें हें पाहून गुरुजी खुष होऊं लागतात. कान फुंकल्यापासून ह्मणजे गुरूच्या भार्षेत बोलू गेलें असतां उपदेश दिल्यापासून गुरुजी विवेकसिंधुशिवाय मुकुंद रायाचा परमामृतग्रंथ आपल्या शिष्य शिष्यिणींस वाचावयास लावतात. भारताचीं आणि भागवताचीं भाषांतरें झालीं आहेत हा लाभ किंवा हानि हेंच आह्मांस समजत नाहीं. परंतु भाषांतरें गुरुजी ह्या उभय भाषांतरांतील गुरुशिष्य संबंधाचीं सर्व प्रकरणें रंगनाथी योग वासिष्ठांतील गुरुशिष्य प्रकरण आणि या सर्वांस मसाल्यासाठीं एकनाथ भागवतांतील गुरुशिष्य प्रकरणें रोज दोनदोन चारचार तास खर्चून शिष्यिणीकडून वाचवितात. याचा परिणाम असा होतो कीं **शिष्यिणी देहानें रहातात एका पुरुषाजवळ आणि मनानें रहातात दुसऱ्याच जवळ.** यांत गुरुजींना मानसिक वर्चस्व मिळवावयाचें यापलीकडे त्यांचा कांहीं अन्य हेतु असतो असें आह्मांस ह्मणतां येत नाहीं. क्वचित् प्रसंगीं नाटकी ब्रह्मचाऱ्यांनीं अत्याचार केले असतील ' नाहीं ' तरी कसें ह्मणावें परंतु असलीं दुष्कर्में इतकीं कमी घडत असतील कीं तीं घडतच नाहींत असें धरून चालल्यास तरी चालेल.

अपूर्ण

## वऱ्हाडवृत्त

**हवामान—** आकाश अभ्राच्छादित असतें व रोज थोडी बहुत पर्जन्य वृष्टी झाल्या शिवाय राहत नाहीं. दुपारीं उष्मा फार होतो. रोगराई विशेष नाहीं.

रा. रा. बी. डब्ल्यू डूरी असि. सुप. ऑफ पोलीस वाशीम यांस सहा महिन्यांची रजा देण्यांत आल्यान्वयें रा. रा. ए. जी. स्कॉट असि. डि. सुप. ऑफ पोलीस आकोला यांस वाशीमास बदलले.

रा. रा. एफ जे. वुडवर्ड. आय. सी. एस. डिस्ट्रिक्ट जज्य बैतुल यांस उमरावती पूर्व वऱ्हाड येथें आडि. डिस्ट्रिक्ट आणि सेशन जज नेमण्यांत आलें.

रजेवरून आल्यावर रा. रा. बाळकृष्ण भास्कर करकरे इ. ए. सी यांस बुलडाणा येथें नेमलें.

रा. रा. डी. चिद्दम इ. ए. सी. खामगांव सबडिव्हीजन यांना सहा आठवड्यांची हक्काची रजा दिली. व रा. रा. धनजीशहा दोराबजी दादीमास्तर इ. ए. सी. यांस खामगांवास बदलण्यांत आलें.

रा. रा. कृष्णप्रसाद वर्मा इ. ए. सी. आकोला यांना एक महिना बावीस दिवसांची रजा दिली त्यांच्या जागीं रा. रा. शहा महमद इशक टे. इ. ए. सी. यवतमाळ यांस नेमलें.

रा. रा. इ. ए. लुगार्ड एक्झि. एंजिनीयर पूर्व वऱ्हाड यांस सहा महिन्यांची रजा देण्यांत आल्यान्वयें त्यांच्याजागीं रा. रा. बी. एन. सरकार असि. एंजिनीयर यांस नेमण्यांत आलें.

**म्युनिसिपाल कमेटी इकडे लक्ष देईल काय?** एप्रिल महिनाच सुरू असून पिण्याच्या पाण्याची अतिशय टंचाई आहे. या सप्ताहांत तर मधीं दोनतीन दिवस पाण्याची इतकी टंचाई होती कीं कित्येक तोट्यांत मुळींच पाणी भरलें नव्हतें. इकडे म्युनिसिपाल अधिकारी लक्ष देऊन कांहीं व्यवस्था करतील अशी आशा आहे.

नामदार सर बेंजामिन राबर्टसन के. सी. एस. आय. सि. आय. ई. आय. सि. एस. हे त्यांजकडे मुद्दाम सोपवलेली दक्षिण आफ्रिकेंतील कामगिरी करून ता. ७ रोजीं मुंबईस सुखरूप येऊन दाखल झाले. व ता. ८ रोजीं त्यांनीं नामदार राजमान्य राजश्री ऑफ्रबुक यांजपासून मध्यप्रांताच्या चिफ कमिशनरीचा चार्ज घेतला. दक्षिण आफ्रिकेंतील लोकांचा प्रश्न हिंदीलोकांस योग्य अशा रितीनें सुटो व नामदार साहेबांनीं घेतलेल्या प्रश्नाचें चीज होवो असें आह्मी इच्छितों.

**पोंच—** सनातन लिटरेचर सोसायटी कुडाळ जि. रत्नागिरी यांचें 'गोवध निषेधावरील व्हाख्यानें' पुस्तक पोंचलें. यानीं गोवधाला थोडातरी आळा बसेल अशी आशा आहे. या भेटीबद्दल त्यांचे फार आभारी आहों.

रा. रा. वसुदेव गोविंद आपटे बी. ए. यांची वाङ्मय सेवेबद्दल करावी तितकी स्तुति थोडीच आहे. त्यांत भर घालण्याकरितां त्यांनीं मराठी बंगाली शिक्षक हें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. बंगाली भार्षेतील उत्तम पुस्तकांचा लाभ करून घेण्यास हें उत्तम साधन होईल. याच्या या भेटी बद्दल आह्मी फार आभारी आहों.

आचार्य नांवाचें पाक्षिक वर्तमान पत्र पुणें येथें चैत्र शुद्ध ११ शके १८३६ पासून सुरू झालें आहे. याचें मुख्य ध्येय ह्मणजे वैदिक धर्माचा उहापोह हें असून कोणत्याही मता संबंधानें अगर व्यक्ती संबंधानें तिरस्कार व्यक्त न करण्याचा संपादकाचा निश्चय दिसतो. पत्र लोकांच्या आदरास पात्र होईल अशी आशा आहे. याच्या भेटीबद्दल आह्मी त्यांचे फार आभारी आहोंत.

## पत्रव्यवहार

रा. रा. वऱ्हाड समाचार पत्र कर्ते महाराज यांस सा. न. वि. वि. गेल्या वर्षप्रतिपदेच्या दिवशीं शहरांत पैसा फंड मागितला हें आपल्यास माहीत आहेच एकंदर वसूल २३१॥८१४॥ झाला. पैकीं २०॥८१४॥ खर्च झाला तो वसुलांत वजा जाता बाकी रुपये २११ सेक्रेटरी पैसा फंड कचेरी मुंबई यांजकडे पाठविले आहेत; कृपा करून याची प्रसिद्धी आपल्या पत्रांत जरूर करावी.

आपला
गोपाळ कृष्ण चितळे
स्वयंसेवक

NATIONAL MEDICAL COLLEGE OF INDIA SCHOLARSHIPS.

Registered as a corporate body under Act XXI of 1860 of the Acts of the Viceroy teaches the full curriculum of L. M. S. & M. B. Standards, classes.

Grants L. M. S. (Natl) & M. C. P. S Diploma Hospital Practice College Fee Rs 3 monthly Dissections Boarding.

Scholarship offered by the Founder Dr. S. K. Mullic Rs. 50, 40, 30, 25, for Matriculates and non-Matriculates College Council Hon'ble Maharaja of Cassimbazar, Rajah Peary Mohun Mukerjee Bahadur C.S.I. Honble Justice A. Chaudhury. The Session begins in January and June. Apply to the DEAN *301, Upper Circular Road, Calcutta.*

No. No. 16

## नोटीस

नोटीस बेंशमी शेख अबदुला वल्लद शेख मोहिदीन मुसलमान मन्यार राहणार शहर बाळापूर

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी मौंजे गाजीपुर येथील शेत सर्वे नंबर १४ एकर ८ गुंठे १७ आकार रुपये १७ या शेताबद्दल ता. ४।४।१९१२ इ. रोजीं पट्टेखत लिहून ता० १०।४।१९१२ इ. रोजीं नोंदुन आणुन दिले त्यांत असें लिहून दिलें कीं तुमची स्वामित्वाची रक्कम दरसाल आगाऊ वर लिहिलेल्या तारखेस आणुन देईन. करारसीर रक्कम न दिल्यास वहीतीवर माझा कांहीं हक्क नसून तुह्मी आपले शेत तुमचे कबज्यांत घेऊन वाटेल ती व्यवस्था करावी. यापुढें आपण वरील शेतांत वहीतीस जाऊ नये. करार तोडल्यामुळें तुमचा कौलपट्टा रद्द असल्याचे मी तुह्मांस पूर्वींच कळविले आहे कळावे ता० ११।४।१४ इ.

सही

नारायणराव दवलतराव देशमुख बाळापूर दस्तुर खुद

नो. नं. १७

## [illegible] नोटीस.

सर्वत्र [illegible] कळविण्यांत [illegible] इस्टेटीची सर्व व्य[illegible] माझा मुलगा जनार्दन लक्ष[illegible] मी अझूनपर्यंत समाइकींत आहों. है [illegible] तरी तो अझून अनुभवानें कमी असल्यामुळें त्याचेकडं दुकानचीं अगर इतर इस्टेटीची कोणतेही प्रकारची व्यवस्था दिली गेली नाहीं. सबब दुकानासंबंधी किंवा सावकारी देणें घेणें संबंधीं अगर शेतीचें लागवणी संबंधीं किंवा इतर कोणतेही स्थावर जंगम इस्टेटी संबंधीं त्याच्याशीं कोणीही व्यवहार करूं नये. केल्यास त्याजबद्दल मी जबाबदार नाहीं व ते व्यवहार मी कबूल करणार नाहीं व आधी ही केले असल्यास ते मजला कबूल नाहींत. कळावें ता० ९।४।१४ इ.

सही

लक्ष्मण रामकृष्ण घुडे कारंजकर

नो. नं. १८

## नोटीस

नोटीस बेशमी मोहनलाल श्रावणला पवार गुजराथी, रा. बाळापूर ता. मजकूर जी. आकोला

यांस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मजला आकोला येथें दुकान लावावयाची होती ह्मणून मी तुमचे जवळून २००० दोन हजार रुपये कर्जाऊ घेण्याचा विचार केला त्या प्रो॥ वरील रुपये तुह्मी देण्याचे कबूल करून २।१।१४ रोजीं स्थावरचे गहाणखत लिहून घेऊन ता॥ ३।१।१४ रोजीं आकोला डि. र. सा. यांचे कचेरींत नोंदून घेतले. त्यावेळीं सालीम भरणा मजपासी नाहीं ४०० चारसे रुपये आहे बाकीचे राहीलेले रुपये १६०० घरीं देतों बाळापुरास चल अशी समजूत करून नोंदणारें अमलदारासमक्ष भरणा कबूल करण्यास लाविला व तुमचे ह्मणण्या प्रो॥ मी कबूलही केला. नंतर मजपासून रु. १६०० सोळासेची पावती लिहून घेतली परंतु रुपय घरीं गेल्याबरोबर देतों असें कबूल करून तुह्मी परभारे खोलापुरास निघून जाऊन पांच सहा दिवस तिकडून वापस आले नाहीं व वापस आल्यावरही रुपये दिले नाहीं. बरेच वेळ रुपये मागीतले असतां देत नाहीं मी आजपावेतो वाट पाहिली परंतु रुपये देण्याचा तुमचा विचार दिसत नाहीं. मी विश्वासावर स्थावरचे गहाणखत लिहून देऊन पावतीही लिहून दिली त्यामुळें तुह्मी आपला मतलब करून घेऊन माझ्यासी विश्वासघात केला असे स्पष्टपणें दिसून येत आहे आतां तुह्मास या नोटीसीनें कळवितो कीं ही नोटीस पावले तारखेपासून चार दिवसाचे आंत सदरहु गहाणखतापैकीं राहिलेले या रुपयाची व्यवस्था करावी अगर मी तुमचे रु. ४०० चारशे व्याजासुद्धां देण्यास तयार आहे. नाहींतर माझे तुमचेजवळ असलेले रु. १६०० सोळाशे आजपर्यंत झालेल्या व्याजासुद्धां आणून द्यावे तसें न केल्यास तुमचेवर विश्वासघात केल्याबद्दल रीतीप्रमाणें काम चालवीन पुढें तुमची कोणतच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. कारितां अगाऊ [illegible] कळविलें आहे. कळावे ता० [illegible]

सही

[illegible]

रा० [illegible]

नो० नं० १९

## नोटीस

नोटीसीचे उत्तर रा. नारायण रामचंद्र यादव डेकार राहणार मुर्तिजापूर यास——

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तुमची नोटीस ता॥ २४-३-१४ ई॥ रोजीं पावली मजकुर समजला तुह्मी लिहिता कीं आतां आमचेकडे कोणत्याच प्रकारची जबाबदारी राहिली नाहीं त्यास हे तुमचे लिहीनें गलत आहे. ज्या अर्थी तुमचे जिमेस सर्व कारभार होता व तो तुह्मी समजून देऊन च्यार्जपटीवर सही घेतली नाहीं त्या अर्थी कमी पेसीबद्दल तुह्मी जबाबदार आहांच. व तुह्मी ह्मणता कीं नोकरीचा पांच वर्षाचा करार होता हर हे लिहीणें तुमचे खोटे आहे आमची व तुमची दरम्यान हीगोष्ट मुळींच झाली नाहीं त्या नोकरी तुह्मी आप खुसीनें सोडून गेले सबब तुह्मास नोटीस देणे भाग आले फाजल तनखा घेतल्याबद्दल तुमचे नांवे हीशेबानें जी बाकी निघत आहे ती रकम व कामाचा मोहजबा. पुरवी नोटीस दिल्याप्रमाणें समजाऊन द्यावी कळावे. ता॥ २९ ३-१९१४ इसवी

घासीराम गुलाबराय याचे दुकान मालक त्रींबक बनसीलाल तर्फे दस्तुर यादव व गोविंद दुकान मुर्तिजापूर द. मु.

नो. नं. २०

## जाहिर नोटीस

खालीं सही करणार याजकडून सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं मी मज तर्फे माझे लहान भाऊ नीजामोदीन वा॥ नुरूल्लाखां जहागीरदार रा० आकोला हल्ली मुक्काम एलीचपुर यांस मौजे कोहळा, जवळा व शेखापुर ता० आकोला. व पींगळा ता० मुर्तिजापुर असे चार ही गांवांचे मुखत्यार पत्र तारीख ४-१०-१३ इसवी रोजीं दिले होतें. सदहू नीजामोदीनखां हा वाईट चालीचा दिसून आल्यामुळें त्याचे मुखत्यार पत्र आज तारखेपासून रद्द केले आहे. कळावें. ता. ९-४-१९१४

सही

गुलामदस्तगीरखां वा॥ नुरूल्लाखां जहागीरदार रा. आकोला

नो. नं. २१

## नोटीस

नोटीस बेशमी अबदुल समद फत्ते महमद रा० मलकापूर पो० व ता० मलकापूर जि० बुलडाणा

यांसः—

खालीं सही करणार इजकडून असें कळविण्यांत येते कीं. मी तुह्मास तारीख ३१-३-१४ ची कार्ड नोटीस तुह्मी [illegible] कार्ड नोटिशीचे उत्तर दिले [illegible] नोटीस पावल्यापा- [illegible] उत्तर [illegible] ग्याचे सोडून [illegible] समाचार पत्रांत छापून [illegible] मजकूर वाचून मनाचे ठिकाणीं [illegible] वाटते. कारण आपण कोणत्याच रि[illegible] विचार न करितां व धर्माचा व जग वर्तनाचा विचार न करितां वाटल्या त्या गोष्टी नोटीशींत खऱ्या खोट्या लिहून ईर्षा वाढवितां आणि माझे बापास विनाकारण त्रास देतां हें बरोबर नाहीं. तरी असे न करितां वर दर्शविलेले तारखेचें नोटीशींत ज्या शर्ती व अन्नवस्त्रा बद्दल आणि महेराबद्दल रकम रुपये असेल ते आपल्या महमदी धर्मा प्रमाणें तुह्मीं कबूल करित नसून रिती प्रमाणें माझी व्यवस्था लावित नाहीं व माझा बाप आपणास व पंचासमक्ष रिती प्रमाणें जग वर्तनासंबंधी ज्या रिती असतात त्या प्रमाणें वागाविण्या विषयीं कायदेशीर स्टांपावर करारनामा नोंदून मागत असतां ते तुह्मी देण्याचे नाकारतां आणि वऱ्हाड समाचारांत खोट्या गोष्टी छापिन्या संबंधी लिहीतां व आपला बचाव करूं पाहतां तेव्हां अशा गोष्टीनें बचाव होणें दुर्लभ आहें तरी आपण पूर्ण पणे विचार करून दिलेल्या कार्ड नोटीशीचे मुदतीचे आंत स्वतः जातीनें माझे बापाचे घरीं सारगांवी येऊन त्यांचे व माझे मता प्रमाणें आणि हिंदु व मुसलमान पथाचे धर्माप्रमाणें ज्या प्रमाणें उभयतांस वागण्यांस सांगतील त्या प्रमाणें आपण उभयतांना त्या गोष्टी कबूल करून घेऊन योग्य रितीनें मला आपण वागाविण्यांस तयार असल्यास मी आपलें घरीं नांदण्यास येण्यास तयार आहे जर आपणास नोटीसींत लिहिलेल्या गोष्टी कबूल नसल्यास मी दिलेल्या मुदतींत स्वतः जातीनें येऊन निकाल करावा नाहीं तर रीती प्रों॥ व्यवस्था करण्यांत येईल. कळावे ता० ९-४-१४

सही

अबजलबाई भ्रतार अबदुल समद अ० पा० बाप रुस्तमखां पीरखां मसलमान नी० हातची बांगडी दस्तुर विष्णु रामचंद्र कुलकरणी

नो० नं० २२

## नोटीस

नोटीस बेशमी सोनाई मर्द लक्ष्मण निकोले रा० कान्हेरी ता० आकोला यांस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी सखी चुलती आहे मयत लक्ष्मण यानें तुझ्या समक्ष पांडू व अमृता यांस मृत्युपत्र करून दिलें असून त्यां आपल्या पाहिल्या नवऱ्याच्या मुलीला ह्मणजे नामें सारजीला कांहीं पैसे देऊन शेत घेऊन दिलें. या कारणामुळें आह्माला असें दिसून आलें कीं तूं आमचा ताबा असलेली सर्व इष्टेट अफरा तफर करिते या करितां सर्व इष्टेट सरकारच्या हुकमानें आह्मी आपल्या ताब्यांत घेतो. व तुला खाण्या पिण्यास वस्त्रास आह्मी देत जाऊं. सर्वत्र लोकास कळविण्यांत येतें कीं [illegible] कर्जाऊ पैसे दिले तर त्याचे जबाबदार आह्मी नाहीं कळावें ता० ११-४-१४

सहीची निशाणी आंगठा

पांडू वा॥ गंभीर निकोले रा० कान्हेरी

नो. नं. २३

**तांबूल नवरत्न** — न कत्थेकी परवा न चुनेसे काम, हमारे मसालेका सबको सलाम. पानाच्या विड्यांत खाण्याचा उत्तम मसाला. चुना व काथाची जरूर नाहीं. किंमत डबीस सहा आणे.

**नवरत्न टेबलेट** — उत्तम सुवासिक अत्तराच्या वड्या. किंमत डबीस तीन आणे.

**नवरत्न तमाखु** — पानांत खाण्याची केशर, कस्तुरी इत्यादि सुवासिक वस्तु मिश्रित तमाखु. किंमत दर तोळ्यास दीड आणा.

**मद्रासी नस** — अति उत्तम सुवासिक नस. मेंदूवर, खास गुणकारी. बाटलीस चार आणे

**गजकर्णाचें मलम** — गजकर्णावर उत्तम औषध. डबीस चार आणे.

**केश काढण्याचें तेल** — केश काढण्याचा उत्तम इलाज. किंमत सीसीस अडीच आणे.

**चन्द्रकांत बाम** — मेंदूला व डोक्याला अति उपयोगी. सीसीस किंमत आठ आणे.

बनविणार टी. एस. मित्र. जळगांव.

आकोल्याचे सोल एजंट- चमन कंपनी.

पत्ता— ताजनापेठ बाजार— आकोला.

नो. नं. ११



अनुभवास योग्य

सुवर्ण पदक मिळालेलें

# ओटोमोहिनी

टिकाऊ, आनंद दायक, सुगंधी पदार्थ. जर कोणी ओटो मोहिनीचा सुवास चार दिवसांत उडून जाता असें प्रमाणसिद्ध करून दाखवील तर त्यास १०० रुपये बक्षीस देऊं, तर एकदां अवश्य १ बाटली खरेदी करून अनुभव पहावा व बक्षीसास तयार व्हावें. ·।।· औंसाच्या बाटलीची किंमत २ रुपये आणि १ ड्रामाच्या नळीस १२ आणे. ओटो मोहिनीचे सुगंधी कागद १२ आणे डझन.

मिळण्याचा पत्ता—ओरियंटल ड्रग आणि केमिकल कंपनी सोल प्रोप्रायटर्स जुमा मसजिद मुंबई

ना. नं. १३



## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी

### राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

### राजवंशी साळ्याचें तेल,

किंमत रुपये ६ ट्रेड मार्क "सँडो"

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे. सरकारचे जनेलाखझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

**परमा सायरप**

कसल्याही प्रमेहावर तीन दीवसांत खात्रीनें गुण देणारें औषध- एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट, यांचा दवाखाना. ३८ जांबळी मोहल्ला मुंबई.

नो० नं० १४



## Oriental Government security Life Assurance Company, Limited,

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

R. PATERSON BROWN, MANAGER.

**FUNDS EXCEED 4½ CRORES.**

Claims paid for over 3½ Crores.

***ALL PERSONS***

WHO ASSURE FOR THE FIRST TIME
OR
WHO INCREASE THEIR PRESENT ASSURANCE
WITH

***THE ORIENTAL***

BY EFFECTING A WITH PROFIT POLICY
ON OR BEFORE 31 ST DECEMBER 1913 WILL BE ENTITLED TO

# THREE YEARS BONUS

PROVIDED
THREE YEARS PREMIUMS HAVE BEEN PAID
AND
THE POLICY IS IN FORCE ON 31St DECEMBER 1915.

Prospectus, forms, and further information can be obtained on application to—
CHIEF AGENCY FOR C. P. BERARS AND KHANDESH,—
NAGPUR.

M. DESOUZA
CHIEF AGENT,
*Nagpur.*

No N. 12



सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा



डॉ० वामन गोपाळ याचा

## आयोडाईज्ड सार्सापरिला.



हा सार्सापरिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षे अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धीवर गुण वाटून इतर रक्तशुद्धी करणाऱ्या औषधांत "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे. जुना संधिवात, त्वचे संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याची सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे. याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाण:-- डॉ. गैातमराव केशव

नो० नं० १६ ५६३ ठाकूरद्वार मुंबई.


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४८ ] आकोला-- सोमवार तारीख २० माहे एप्रील सन १९१४ इ० १५

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवचे ट हां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस मुद्रांच्या असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठुन येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकी एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकी मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर सेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ } एजंट
नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन १०३/४ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत व आरभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } G. A. PHILLIPS.
आकोला २१-९-१० } एजंट.
नो० नं० २

## 'विकावयाचा आहे.'

वाशीम येथील, पूर्वीच्या डिस्ट्रिक्ट कोर्टा-जवळ असलेला कै॥ राव बहादूर पुरुषोत्तमराव नारायण भट यांचा बंगला विकावयाचा आहे.

खंडवा ते इंगोली व्हाया वाशीम लोकरच रेल्वे लाईन ओपन होणार असल्यानें गरजूनीं किंमती वगैरे विषयीं समक्ष किंवा पत्रद्वारें खालील पत्यावर खुलासा मागवावा.

ना० खं० फडके
वऱ्हाड समाचार ऑफीस आकोला
नो० नं० ३ वऱ्हाड

## खिजाबे मसीहा ( कलप )

हा लावला असतांना पांढरे केंस ९ मिनीटांत काळे होतात इतकेंच नव्हे तर अगदीं मृदु होऊन तकाकी देतात. हा कलप बरेच दिवस टिकून कलप लाउन केस काळे केले आहेत असा मासच होत नाहीं. एकदा अनुभव पहावा. पेटीस १ रु. व्ही. पी. खर्च निराळा.


**खाकीसास जनावे टानिक पिल्स** या योगें नपुंसक मनुष्य तेव्हांच बरा होतो. औषधाचा गुण ३ दिवसांत कि. रु. २ व्ही. पी. खर्च निराळा.

**खाकीसास तिलाये मसिहा.** इंद्रियाच्या ढीलेपणावर आश्चर्यकारक खात्रीचा इलाज. तीन दिवसांतच सदहूं औषध आपला गुण दाखवितें. कि. रु. २ व्ही. पी. खर्च वेगळा.

शेट हरकचंद रतनजी आणि कंपनी.
३७ जुमा मसजिद मुंबई
नो० नं० ४

## अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेग्रनाईट नोटपेपस व त्याच्या बेताची चैकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ८८ व्हीपीनें ८१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही.पी.नें रु० १८६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
पत्ता—वैद्रे आणि कंपनी पुर्णेसिटी

नो० नं० ९

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ६

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १८०

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुनळी खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ७

## WANTED

Seven Revenue Inspectors. Pay Rs. 25 plus Rs. 10 as pony allowance None need apply who have not passed the Matriculation or School Final Examination.

Applications with testimonials should reach the undersigned by the end of April 1914. Rejected applications will not be replied to. Selected candidates will have to join the posts at once

Dated Akola the 19 March 1914.

F. Dewar
Deputy Commissioner, Akola.

No. N. 8

NATIONAL MEDICAL COLLEGE OF INDIA SCHOLARSHIPS.

Registered as a corporate body under Act XXI of 1860 of the Acts of the Viceroy teaches the full curriculum of L. M. S. & M. B. Standards, classes.

Grants L. M. S. ( Natl ) & M. C. P. S Diploma Hospital Practice College Fee Rs 3 monthly Dissections Boarding.

Scholarship offered by the Founder Dr. S. K. Mullic Rs. 50, 40, 30, 25, for Matriculates and non-Matriculates College Council Hon'ble Maharaja of Cassimbazar, Rajah Peary Mohun Mukerjee Bahadur C.S.I. Honble Justice A. Chaudhury. The Session begins in January and June. Apply to the DEAN *301, Upper Circular Road, Calcutta.*

No. No. 9

## जाहीर नोटीस.

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं मौजे धुई प्रगणे बाळापूर ता० खामगांव येथील शेत सर्वे नंबर ९८ एकर १-१९ आकार ९-११-३ हा नंबर आमचे वडिलोपार्जित असून हा नंबर आमची चुलती नामे रखमाई मर्द नारायण हरी हजाम रा० खीरपुरी ता० बाळापूर इजपासून खरेदी किंवा गहाण अगर बक्षीस घेऊं नये तिला गहाण अगर खरेदी अगर बक्षीस देण्याचा अधिकार नाहीं घेतल्यास त्याची जबाबदारी माझेवर नाहीं ती फक्त अल्पवयाची मालकीण आहे तिचे पश्चात वारस मी आहे. कळावें ता० ११-४-१४

द० कृष्णाजी केशव रा० आकोला
सही
निशाणीची रेघ भिकाजी हरी हजाम
रा० पारस याचे हातची असे
नो० नं० १०

## नोटीस

नोटीस बेशमी गणाजी पाटील व रामजी डागे राहणार मौजे हाळद यांसः—

मी खाली सही करणार आपणास कळवितों कीं आपण माझा आजा नामे लक्ष्मण आपा रा० गिरोली याजपासून शेत व जागा कोणतेप्रकारे इस्टेट लिहून घेऊंनये घेतल्यास ती पोकळ ठरली जाईल. कळावें ता० ७-४-१९१४ ई०

दस्तुर नारायण रामाजी महाजन
मानोरा.
सही
१ रामचंद्र बळीराम वाणी राहणार गिरोली द० खु०
नो० नं० ११

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य १० शके १८३६

## सौंदर्य बुद्धि.

मनुष्याच्या ठायीं सौंदर्य ओळखण्याची बुद्धि आहे. तिचें बीज काय व त्या बीजाचा विकास कसा झाला या प्रश्नाची मीमांसा करतां करतां आजपर्यंत मोठमोठे तत्वज्ञ थकले आणि नेति नेति ह्मणून हताश होऊन बसले त्यांची मति जेथें गुंग झाली तेथें आमच्या सारख्यांचा काय पाड? ह्मणून ती मीमांसा करण्याचें काम आह्मीही सोडून देतों आणि या सौंदर्यबुद्धि संबंधानें चार सामान्य विचार वाचकांपुढें मांडतों.

मनुष्याच्या अंगचे इतर धर्म कांहीं एका विशिष्ट तत्त्वावर विकसित झाले आहेत. कोणी त्याला उपयोगिता ह्मणतात. इंग्रजींत त्याला युटिलिटी असें नांव आहे. जें मनुष्याला त्याच्या आयुष्यांत उपयोगी पडणारें, त्याच्या जीवनसंग्रामाला अनुकूळ, ज्याच्या साह्यानें त्याला आपलें आयुष्य सुखमय करून घेतां येतें, त्याचाच विकास सृष्टि किंवा प्रकृति करते. मनुष्याच्या अंगांत शक्ति कमी, ह्मणून प्रकृतीनें त्या शारीरिक बळाला बुद्धि शक्तीची जोड दिली आहे. त्या बुद्धिशक्तीमुळें तो समाज करून समाजशक्तीनें स्वतःचें रक्षण करूं शकतो. समाजशक्ति किंवा संघशक्ति दुर्बळ होऊं नये व तिचें साह्य सतत मिळावें यासाठीं व्यक्तिहितापेक्षां समाजहित श्रेष्ठ ठरविणारें नीतिशास्त्र जन्माला आलें. अशाच रीतीनें मनुष्याचे नानाविध इतर धर्मांचा प्रादुर्भाव होऊन मनुष्यप्राणी इतर प्राण्यांहून उन्नत झाला. वस्तुतः हें सगळें प्रकृतीचें कार्य आहे. त्यांत मनुष्यानें गर्व मानण्यासारखें कांहीं नाहीं.

सौंदर्यबुद्धि हाही एक मनुष्यधर्म आहे व तोही अशाच रीतीनें प्रकृति–मूलक आहे. मनुष्येतर प्राण्याचे ठायीं सौंदर्यबुद्धि आहे कीं नाहीं तें सांगतां येत नाहीं. येवढें खरें कीं इतर प्राण्यांच्याही ठायीं सौंदर्यबुद्धि नसली तरी सौंदर्य प्रियता तरी खास आहे. पक्षी सुस्वर गायन करीत तासचे तास बसतात, ते त्यांना गाणें आवडतें ह्मणून हें उघड आहे. मोर आपला पिसारा उभारून डौलानें फिरतो तो कां? त्याला आपलें सौंदर्य पाहून तें दुसऱ्यांसही दाखविण्याचा मोह पडतो हें त्याचें कारण स्त्रियांना व कित्येक पुरुषांनाही आपल्या शरीराचें सौंदर्य कृत्रिम उपायांनीं वाढवावें असें वाटतें तेव्हां सौंदर्य प्रियता हा प्राणिमात्रांचा सामान्य धर्म झाला. पण मनुष्यांत कित्येकांच्या ठायीं सौंदर्याला लुब्ध होण्याचा गुण विशेष अंशानें आढळतो; आणि कित्येकांत तर सामान्य वस्तूंपासून सौंदर्य उत्पन्न करण्याची अलौकिक शक्ती ही दिसून येते. गवई भिन्न भिन्न प्रकारच्या स्वरांच्या मिश्रणानें कर्णमधूर असे आलाप काढतो, किंवा कुशल चित्रकार निरनिराळ्या रंगांच्या मिश्रणानें आणि ब्रशासारख्या साध्या वस्तूच्या साह्यानें मनाला लुब्ध करून सोडणारें सुंदर चित्र काढतो, ही सौंदर्य उत्पादनाची शक्ति त्याच्याठायीं कशी आली? ही इतर प्राण्यांमध्यें आढळत नाहीं, माणसाच्याच ठायीं ती कां दिसते? या प्रश्नाचें उत्तर देणें कठीण आहे. अनेक तत्वज्ञांनीं हा प्रश्न सोडविण्याची पराकाष्ठेची खटपट करून पाहिली आहे. वर ह्मटल्या प्रमाणें मनुष्य जीवन संग्रामाला उपयुक्त अशी ही शक्ति प्रकृती पासून मिळाली अतएव उपयोगितां हें हिचें मूळ आहे असें कित्येक तत्वज्ञ ह्मणतात. पण ही मीमांसा सर्वांना मान्य नाहीं.

दुसरे कित्येक तत्त्वज्ञ असें ह्मणतात कीं सौंदर्यप्रियता हें उत्क्रांति तत्त्वाचें एक आगंतुक फळ आहे. पक्ष्याचें सौंदर्य त्याच्या जीवनरक्षणाला उपयोगी असतें ह्मणून प्रकृतीनें तें त्याला दिलें आहे असें नाहीं कित्येक वेळा तर उलटच प्रकार दिसतो. पोपटाचा हिरवागार रंग व त्याची अनुकरण कुशलता हीच त्याच्या बंदिवासाला–नुकसानीला–कारण होते. मोराच्या पिसात सौंदर्य नसतें तर त्याचा संहारही झाला नसता. सांबराला शिंगाचा भार वाहावा लागला नसता तर बिचाऱ्याला पारध्या पासून आपली सुटका करून घेण्यासाठीं चार उड्या ज्यास्त मारतां आल्या असत्या. या व इतर उदाहरणांवरून उपयुक्ततेसाठीं या प्राण्याच्या ठायीं प्रकृतीनें सौंदर्य ठेविलें आहे असें ह्मणणें सयुक्तिक दिसत नाहीं ह्मणून सौंदर्यप्रियता व तदनुरोधानें सौंदर्यबुद्धि हे धर्म मनुष्याच्या ठायीं आगंतुक आले आहेत, उत्क्रांतीतत्त्वाच्या अनुरोधानें मनुष्याच्या शरीराची व स्वभावाची वाढ होतां होता अनपेक्षित रीतीनें त्यांचा उदय झाला आहे असे कित्येक तत्त्वज्ञ ह्मणतात. कोंबड्याच्या डोक्यावर जसा तुरा, किंवा मनुष्यप्राण्यात पुरुषाच्या ओंठावर जशा मिशा त्याच्या सौंदर्याची वृद्धि करणाऱ्या किंवा त्याच्या प्रकृतीला आय करणाऱ्या कशाही असल्या तरी त्या अवश्यक नाहींत, केवळ आगंतुक आहेत, त्याचप्रमाणें मनुष्याचा सौंदर्यप्रियतेचा धर्म हा खरोखर आनंदांत भर टाकून मनुष्यजन्म सुखमय करणारा असो, किंवा कविजना प्रमाणें सौंदर्यानें लुब्ध होऊन वेडेचार करण्यास लावणारा असो, पण तो अनवश्यक आहे, संग्रामांत त्याला उपयुक्त स्थान नाहीं असें कित्येकाचें ह्मणणें आहे.

वस्तुतः विचार पूर्वक या प्रश्नाची मीमांसाच अद्याप झाली नाहीं. जी झाली आहे ती केवळ एकतर्फी-वकिली बाण्याची-झालेली आहे. सौंदर्यप्रियतेचा किंवा सौंदर्य बुद्धीचा जीवन संग्रामांत उपयोग नाहीं असें ह्मणणें आणि जें जें उपयुक्त तें तें सुंदर अशा साक्रेटिसाच्या पद्धतीनें सौंदर्याची मीमांसा करणें हे दोन्ही प्रकार श्लाघ्य आहेत. सौंदर्याविषयींचा अनुराग किंवा सौंदर्यबुद्धी यांचा जीवनकलह साह्य करण्याचे कामी केवढा उपयोग आहे तें सिद्ध करण्यास बाहेरचीं प्रमाणें दाखविण्याचें वस्तुतः कारण नाहीं. प्रत्येकाचा अनुभवच या कामीं निकाल देण्यास समर्थ आहे. जें जें उपयुक्त तें तें सुंदर हा सिद्धान्त साक्रेटिसाच्या काळीं जरी सर्वमान्य असला आणि त्या काळीं उपयुक्ततेच्या दृष्टीनें भंग्याची ?टी ही एक सुंदर वस्तु जरी गणिली गेली असली तरी आतां तो सिद्धान्त मान्य करण्यासारखी मनुष्याच्या बुद्धीची स्थिती राहिलेली नाहीं. उपयुक्तता हेंच सौंदर्याचें मूळ हा सिद्धान्त आतां मागें पडला आहे. जग या सिद्धान्ताला मागें टाकून पुष्कळ पुढें सरकलें आहे तसेंच सौंदर्यप्रियता व सौंदर्यबुद्धी हीं प्रकृती दत्त विकासाचीं आगन्तुक फळें होत हा ही सिद्धांत सध्याच्या काळीं मान्य होण्यासारखी स्थिती नाहीं. सृष्टीदेवतेची प्रत्येक कृती सहेतुक असते अशी आतां शास्त्रज्ञांची ठाम समजूत झालेली आहे. ती पालटण्याचा संभव फार कमी आहे. अशा काळीं प्रकृतिदेवीला अनपेक्षित असें कांहीं कृत्य तिच्या हातून झालें आहे असें मानून स्वतःच्या ज्ञानाची घमेंड बाळगण्यापेक्षां सौंदर्यतत्व हें मनुष्याच्या संकुचित बुद्धीला अगम्य आहे अशी आपली दुर्बलता कबूल करणें व निराळ्या दिशेनें या तत्त्वाचा शोध करण्याचा प्रयत्न ठेवणें हें आधिक योग्य आहे.

---

## आधुनिक गुरु अवस्था दुसरी
## ( मंत्रोपदेशा नंतरची. )

### स्त्रियांस उपदेश करावा किंवा करूं नये.

मागील अंकावरून पुढें चालूं

हल्लींच्या सुधारणा काळीं सर्व गुरुजी समाजाचें अहित करण्यास पुढें सरसावले आहेत. शुद्ध परमार्थ वाढावा. स्त्री पुरुषांचें कल्याण व्हावें, अधर्म व अन्याय घडूं नयेत ही इच्छा फारच थोड्या गुरु महाराजाच्या ठिकाणीं आढळते. त्यास जर इतर सर्व सर्व दिशांनीं सुधारणेचें पाऊल पुढें पडत आहे तर आपणही थोडासा सुधारणेस हात भार लावावा अशी लोककल्याणाची इच्छा होत असावीसें दिसतें. ही सुधारणोत्कंठा कदाचित् स्वार्थामुळेंही असेल परंतु ह्या इच्छेची मीमांसा न करितां या प्रघाताबद्दल आपणास विचार करणें आहे. सबंध रामदासपंथ ह्मणजे खास समर्थ, रामीरामदास आणि दिनकर महाराज स्त्रियांना उपदेश देण्याच्या बिलकुल विरुद्ध आहेत. भक्तिरहस्य सुगमोपाय हे स्त्रियांना उपदेश देण्याविरुद्ध आहेत. तुकाराम हे तर मुळींच गुरुशिष्य सांप्रदायाच्याच विरुद्ध आहेत. नामदेव याच प्रमाणें आधुनिक गुरु सारख्या गुरूंच्या विरुद्ध आहेत. जर संतमत स्त्रियांस उपदेश देण्याविरुद्ध आहे तर हे गुरु संतांचा अनादर करीत नाहींत काय?

करुनि संतांचा अनादर।
जो माझी पूजा करी पामर।
पूजा नव्हे तो लत्ता प्रहार।
त्यानें मजला समर्पिला ॥ असो.

श्री तुकाराम ह्मणतातः——

एकांतीं लोकांतीं स्त्रियांसी भाषण
प्राण गेल्या करूं नये.
विधवा अथवा सुवासिनी।
असालिया तरुण कामिनी।
तयांसी कदापिही भल्यांनीं।
प्रबोधवार्ता करूं नये ॥

परवानिता पडतां दृष्टी।
निष्कामासीहि अभिलाश उठी।
त्या येकांतीं बोधितां सुख संतुष्टि।
घडों शके कैसेनि ॥

स्वानुभव दिनकर ४-४

स्त्रियेसी केवळ दैवत भर्तार।
तीर्थ व्रत क्षेत्र देव तोचि साचार।
भर्तार सेवे वाचून नर्क अघोर।
युगानुयुगीं स्त्रियेसीं ॥
जे स्त्री पतिसेवेसी निजभावें सादर।
तियेचे चरण रज वंदिती सुरवर।
प्रत्यक्ष ब्रह्मा आाण हरिहर।
झालीं बालकें अनुसूयेचा ॥
ज्या नित्य पतिसेवा परायणी।
त्याची कीर्ति वाखाणे शास्त्रीं पुराणीं।
ज्यांच्या नामस्मरणें पापां पळणी।
दिगंता बाहेरी हातस ॥
ह्मणोनि ज्या सुवासिनी सम्?
तिहीं अत्यादरें सेवावें निज नाय?
तेणेंविण ना भजावें सहसा आ?
काय वाचा मनेंसी ॥
सकळ तीर्थ व्रत क्षेत्र गुरु दे?
स्त्रियेसी निजभर्ताराचि स्वयमेव?
त्याविण आणिकें स्थळीं धरितां ?।
नर्कीं पतन निश्चयें ॥
सकामता अथवा निष्कामता।
स्त्रियेसी भताराच पूज्य तत्वता।
यद्यपि ज्ञान प्राप्ति व्हावी ऐसें वाटे
चित्ता।
तरि भर्तार आज्ञां गुरु सेव्य ॥
आहे निजपतीसी आत्मज्ञान प्राप्ति।
परंतु नाहीं जरि प्रबोध शक्ति।
तरि भर्तार आज्ञेनें यथानिगुति।
ज्ञान विचार करावा ॥
यद्यपि भर्तारासी नसली ज्ञानीं श्रद्धा।
आणि स्त्रियेसी सत्संगें उपजली मेधा।
तरी आज्ञेवांचूनि कदां।
ज्ञान विचार न करावा ॥
कदाचित् भर्तार असलियां दुष्ट बुद्धी।
तरि स्त्रियेनें आचरावी पुरश्चरणविधि।
भर्तारासी उपजवूनि सद्बुद्धी।
ज्ञान प्राप्ति साधावी ॥
परि भर्तारे विना करितां ज्ञान प्राप्ति।
स्त्रियेसी सहसा होय अधोगति।
स्त्रियेसी ज्ञान सर्वथा घडेना ॥
येथें ज्ञानाची अवज्ञा दिसोनि आली।
जे ज्ञाना परिस सेवाचि थोर जाली।
ऐसी करितां सहसा बोली।
दूषण उत्पन्न होईल ॥
कांजे भजना वांचूनि ज्ञान प्राप्ति।
सर्वथा न घडे पैं निश्चितीं।
आधीं जरि घडे भगवत् भक्ति।
तरि ज्ञान साधे सहजेंचि ॥
ह्मणोनि यथाशास्त्रें आचरणीयभजन।
तें आचरावें यथाविधी करून ॥
ह्मणिजे अवश्य साधेल आत्मज्ञान।
स्वधर्म कर्म आचरतां ॥
येथें मुख्य पातिव्रतेचें स्वधर्माचरण।
विशुद्धि करावें भर्तार सेवन।
तेंची तियेचें विधि उपासन।
तेणेंचि होय ज्ञानप्राप्ति ॥
यानंतर विधवा स्त्री जे कां तरुण?
तिनें निष्काम करावें तीर्थाटन।

र्थांटनें निजदोष क्षालण।
न्मांतरींचें करावें ॥
सेनि नाळिया काम निवृत्ति।
ग उत्तम धरावी सत् संगति।
धर्माचरणें भगवन् भक्ति।
त्तरोत्तर करावी ॥
गवत् भजनें ज्ञानप्राप्ति।
ाधूनि करावी गुरुभक्ति।
वधर्माचरणें न्यायनीतीं।
न्म सार्थक करावें ॥

स्वानुभवदिनकर ६-९

दोन्हीं उताऱ्यां पैकीं पहिल्या उता-
बोध वार्ता करूं नये हे शब्द मह-
त. इतर गोष्टी बोलणें तर दूरच
वार्ता देखील दिनकर महाराज
नाहीं. दुसऱ्या उताऱ्यांत ९२ वी
ानांत ठेवण्या जोगी आहे. ज्ञानी
मारतात कीं उत्तम गति प्राप्त
मूळ स्वरूपाचें ज्ञान हीच श्रेष्ठ
ाहे. परंतु त्याठिकाणीं पोंचण्यास
असें भजन, पूजन, हे मार्ग आहेत.
ज्याप्रमाणें सगुण मूर्तीचें ध्यान,
जन, इत्यादिकें करून ज्ञान प्राप्ति
सांगितलें त्याच प्रमाणें स्त्रियांचा
जे त्यांचा पति याची सेवा, भजन,
केल्यानेंच त्यांना ज्ञानप्राप्ति होईल
सांगितलें आहे.

ामदास आपल्या सुगमोपाय प्रकरण
या ९४ ते ९९ मध्यें ह्मणतातः—

णें स्वामी सद्गुरुनाथें।
यथाधिकारें उद्धरावीं अनाथें।
परंतु शिष्य लक्षणें समर्थें।
लक्षावींच कीं ॥९४॥
तरि एक शिष्य एक असच्छिष्य।
त्याहीमध्यें उपेक्ष्य रुपेक्ष्य ऐसें भाष्य।
एकते कवळे आशिष्य।
पतित आणि सुवासिनी ॥९५॥
प्रत्यक्ष पातित तों पाहोंचि नये।
कामिनी चित्रीं ही नये नये।
तेथें एकांत करणें हे काये।
अनुग्रह कीं ग्रहगती ॥९६॥
कदापि ऐसें ह्मणती उच्छृंखळ।
आह्मी स्त्री पुरुषवचनेणों केवळ।
तरी काय वसिष्ठ पराशरादुनि दुर्बळ।
अधिक होईल कलीचा ॥९७॥
स्त्री पुरुषत्वनादिसे अनुभेंव जेणें।
अनुग्रह करणें कोविवडे तेणें।
अमर्यादतेचा पक्ष जयासी घेणें।
तो अपभ्रंशे तत्वता ॥९८॥
अहो स्वर्गाची ही भिन्नवार्ता।
भर्ता देव गुरु भर्ता।
तेथें अन्यधर्म सखोलगर्ता।
पतनाशीच कीं ॥९९॥
े समर्था भगवंताची भक्ति।
े दुर्बळा भ्रताराची व्यक्ति।
ेही अभावाची वृत्ति।
ुरुसेवेनेंही सरेना ॥६३॥

उताऱ्यांतील ९८ वी व ६३ वी
ा विशेष मनन करण्यासारख्या
हल्लींचे ज्ञानी गुरु ह्मणतात
ज्ञानावस्थेंत स्त्रीत्व व पुरुषत्व यांत
देसत नाहीं हे वसिष्ठ पराशराहून
हत काय? नजाणों कलियुगामुळें
असतील. ज्यांस लिंगउपाधि दिसतच
नाहीं त्यांस गुरु आणि शिष्य हा संबंध तरी
कसा दिसावा. ६३ वी ओंवी अशीच
मार्मिक आहे. गुरुलोक ह्मणतात ईश्वराची
नवविधाभक्ति कोणीकडे व दुर्बळ भ्रताराची
नवविधाभक्ति कोणीकडे त्यांस उत्तर येव-
ढेंच कीं ज्या स्त्रीस पतिविषयीं अभाववृत्ति
आहे तिचें समाधान गुरुतरी करील ह्मणून
कशावरून?

शिष्य लक्षणांत रामदास आपल्या दास-
बोधांत दशक ५ समास ३ ओंवी ३१
मध्यें या उभयतांपेक्षांही पुढें जातातः—

शिष्य असावा स्वतंत्र।
शिष्य असावा जगमित्र।
शिष्य असावा सत्पात्र।
सर्व गुणें ॥३१॥

यांत रामदास नुसत्या स्त्रियांनांच उप-
देश करूं नये असें ह्मणत नसून सर्व पर-
तंत्र लोकांना उपदेश करण्याचा निषेध
करतात. या आज्ञा पाळणें दुरापास्त आहे
कारण स्त्रिया दांभणें सोडकें, नोकरीपेशाचे
ब्राह्मण सोडले तर गुरुत्वतरी कोठें मिरवावें.
गुरु सुधारक होणें अगदीं रास्त आहे.

स्त्रियांमाजी घोळों लागला।
त्याचे जितेंद्रियाचा किळस आला।
केवळ वैश्वानर आणि नारद भ्रंशला।
कलीचे मानव ते किती ॥३९॥
जया श्रीमान आवडे।
तया ज्ञानावरी वीज कां न पडे।
तें ब्रह्म भ्रमें झाले वेडे।
उभय लोकीं अतिनिंद्य ॥३७॥

भक्तिरहस्य ७.

जरि विधवा जाली सार्थकोद्यता।
तरि तिसीं तीर्थाटण करववें तत्वता।
तीर्थाटणें निष्काम विरक्तता।
प्राप्त होईल सहजें ॥१६॥
सुवासिनी तरुण स्त्रियेसीं।
भर्तार देव निश्चयेंसीं।
त्याचिया भजनें तिबेसीं।
उत्तम गति सहजें ॥१४॥
तथापि विरक्त सुशील न्यस्तकामा।
मुमक्षुभावें धरूनि प्रेमा।
भर्तार सहित सतगुरु सर्वोत्तमा।
शरण आलिया जरि ॥१०॥

स्वा० दि० ४४

कृष्णाचेन अंग संगें।
नारि तरल्या हें क्रमलें मार्गें।
पुढें ऐसिया सतसंग प्रसंगें।
वर्तो नये सर्वथा ॥७८॥

आतां कलियुगीं यथेष्टाचार।
रुचि धर्म आचरती नारी नर।
पाषंड बंड लंड मतांतर।
नारकी ॥७९॥
तया गुरु तरगाचें फळ।
त्याच्या मोह ज्ञान गोष्टी निर्फळ।
ज्ञान गोष्टी क्रिया अमंगळ।
तेथें मंगळ तें केंचें ॥८०॥

भक्तिरहस्य प्रकरण ६६

वर्णानां ब्राह्मणो गुरुः
हास्मृति वाक्याचा आधारु।
स्त्रियासि गुरुत्वें वंद्य भ्रतारु।
तेंही अन्यगुरु न करावा ॥१५॥
स्त्रियेसि देव गुरुतीर्थ व्रत।
भ्रतारचि होय निश्चित।
भ्रतारेंविण अन्य दैवत।
नियवत स्त्रियेसि ॥१६॥
यद्यापि भ्रताराति नसले आत्मज्ञान।
तरि त्याचे अज्ञे गुरु करावा आन।
भ्रतार क्रूर खळ असालिया जाण।
त्याचेंच सेवन करावें ॥१७॥
भ्रतारासि सुबुद्धि उपजे जेणें।
ऐशीं करावीं पुरश्चरणें।
परि भ्रतारेंविण अन्य सेवनें।
होतीं पतनें स्त्रियांसि ॥१८॥
कोणी कारतील येथें आक्षेप।
कीं गुरु ह्मणजे माय बाप।
तरि भ्रतार गुरु करितां पाप।
ह्मणावें बाप त्यास क ॥१९॥
तरि हे गोष्टी बोलणें अप्रमाण।
स्त्रियेसीं गुरुत्वें भ्रतारचि प्रमाण।
प्रत्यक्ष शंकरें पार्वतीस उपदेशून।
केलें निरूपण गुरु गीतेचें ॥२०॥
तैसेच थोर थोर ऋषेश्वर।
तीहीं स्वस्त्रिया अनुग्राहिल्या साचार।
त्यांचे ग्रंथ असती अपार।
संवादपर उभयतां ॥२१॥
असो स्त्रिया विधवा ज्या कां तरुण।
तेंही करावें तीर्थाटण।
विगत काम झालिया गुरु भजन।
स्वहिता चरण करावें ॥


श्री सिताराम संवाद प्रकरण २

कित्येक संतांनां शिव्या देणारे अध-
निज्ञानी ह्मणतील "संपूर्ण विश्वांत एक सर्व
शक्तिमान परमेश्वर किंवा माझा सद्गुरु-
यांनांच कायतें धर्म रहस्य अतएव सत्य
कळलेलें आहे. आह्मी ही फालतु लोकांचीं
वचनें प्रमाण धरीत नाहीं. वेदात कोठें
आधार असेल तर सांगा. यावर उत्तरें
अनेक आहेत. पैकीं पाहिलें उत्तर हें कीं
पूर्वीच्या ऋषींचें रूपांतर हल्लीं आधुनिक
गुरुमध्यें झालें आहे. देशाना समाजाचा
आणि धर्माचा इतका ऱ्हास झाला आहे
कीं परमेश्वराची जागा या गुरुंनीं पटका
विली आहे. पण असे गरुः—

शिष्यास न लविती साधन।
न करविती इंद्रियें दमन।
ऐसे गुरु अडक्याचे तीन।
मिळालि तरी त्यजावे ॥२१॥

दासबोध द० ५ स० २

ब्राह्मण फक्त पुरुष जाति




(उच्छृंखळ, आचारविचारें अशुद्ध परंतु सज्ञान शुद्ध)

हा गुरुमधील स्थूल भेद आहे. अशांतील
गुरु आणि असद्गुरु याचे समाधान प्रत्यक्ष
ब्रह्मदेव देखील करूं शकत नाहीं तरी

"स्त्रिया आणि हीनवर्ण।
त्यांसीं गुरुत्वची नाही"

हें उघड आहे.

ज्यासीं महावाक्यीं अनाधिकारत्व।
त्यासीं गुरुत्व हे धनेविण दातृत्व।
आणि पूर्व परंपराचें ही कर्तृत्व।
त्यासीं ठावें न पडे" ॥

जर स्त्रिया आणि हीनवर्णाला वेदपठनाचा
अधिकार नाहीं तर महावाक्योपदेशाचा
अधिकार कोठून असणार शास्त्रकारांना
स्त्रियांस उपदेश करणारे पुढें निपजणार
आहेत हें कळलेंच नव्हतें ह्मणून त्यांनीं
स्पष्ट निषेध केलेला नाहीं. तरी उपनिष-
दांत अगर श्रुतींत स्त्रियांस एखाद्या परपु-
रुषानें उपदेश केलेला कोठेंच आढळत
नाहीं. विवाह पद्धतीस जितकें धार्मिक स्वरूप
यावें तितकें देण्याचा ऋषिवरांचा हेतु
होता ह्मणून हिंदु धर्मांत पत्नीस पुरुषाचें
अर्धांग मानले आहे. शरीरें भिन्न परंतु
जीवित मात्र एक अशी दोघांची अवस्था
असावी असा यत्न केलेला मनु पराशरादि
स्मृतींवरून स्पष्ट होतो. शास्त्राचा आधार
देऊन जें गुरुशिष्य नातें हल्लीं बेलगाम
उघळूं पहात आहे तें आपल्या भरमक्रम
पणासाठीं शास्त्राधार घेतें पण अन्य कामिनी
उपदेशासाठीं त्याच शास्त्रांना तुडवूं पहात
आहे. हा विसंगतपणा नाहीं काय? देवी भागवत
अध्याय ३ श्लोक २१ ह्मणतो कीं:—

स्त्री शूद्र द्विजबंधूनां। न वेद श्रवणं मतम्॥
तेषामेवहितार्थाय। पुराणानि कृतानिच ॥

भावार्थ— स्त्रिया, शूद्र आणि द्विजेतर यांना
वेद श्रवण शास्त्र संमत नसल्यामुळें विशे-
षतः त्यांच्या हिता करितां पुराणें काढिलीं
आहेत.

स्त्रियांनां जर वेदाचा अधिकार नाहीं
तर अर्थात महावाक्य श्रवणाचा अधिकार
नाहीं ह्मणून स्त्रियांनां मंत्रोपदेशही नाहीं
स्त्रियांनां आम्नाय मंत्र नाहीं त्याचें
काम पौराणिक मंत्रानें भागवितात.
ही सवड युक्तीस धरुनच आहे. कढी
करण्यास ताक नाहीं ह्मणून ताकाचें काम
चिंचेवर भागवितात. आमचें ह्मणणें गुरु
लोकांनीं एक पायरी पुढें जावें ह्मणजे
गुरुचें उपदेश करण्याचें काम पतीवरच
भागवावे अर्थात असें केल्यानें

'जळो जळो तें गुरुपण।
जळो जळो तें चेलेपण ॥१॥
गुरु आला वेशी द्वारीं।
शिष्य पळतो खिडोरीं ॥२॥
कणासाठीं जाळें येणें।
त्यावें आलें वर्षासन ॥३॥
तुका ह्मणे चेला।
गुरु देवेहि नरकाला ॥४॥
आणीक नका करूं चेष्टा।
व्हाल कष्टा वर पडी ॥१॥
सुखें करा (हरिकथा।
सर्वथा हे तारील ॥ २ ॥
अनाथाचा नाथ देव।
अनुभव सत्य हा ॥ ३ ॥
तुका ह्मणे बहुता रीती।
धरा चित्तीं सकळ ॥ ४ ॥
मुखें सांगे ब्रह्मज्ञान।
जन लोकाची कापितो मान ॥१॥
ज्ञान सांगतो जनासी।
नाहीं अनुभव आपणासी ॥२॥
कथा करितो देवाची।
अंतरी आशा बहु लोभाची ॥३॥
तुका ह्मणे तोचि वेडा।
त्याचें हाणावे थोबाड फोडा ॥४॥

स्त्रियांस गुरुपदेश देण्यास श्रुतीचा आधार
नाहीं ७५८ उपनिषदांवरून सिद्ध आहे कीं

पतीवांचून अन्य गुरु नाहीं पण हल्लींचें ह्मणतात स्त्रियांना गुरु उपदेश नाहीं त्यांनां मोक्षच नाहीं आह्मी पौराणिक तों आणि त्यांचा उद्धार करितो खरें धरिलें तरी गुरुचें काम ा कां करवून घेत नाहीं असें ास त्याचें उत्तर हेंच कीं पती सतात त्यांसच मोक्षापेक्षां असते यांस काय उद्धरणार यावर उत्तर कीं अग्नि समोर शपथ घेतलेल्या कामांत नाती चरण करणारा जर ऊं शकत नसेल किंवा स्त्रियांवर व होऊं शकत नसेल तर ज्या ब्राह्मण व ब्राह्मणेतर जातीं दिस- रु आणि शिष्य दिसतात असा नी स्त्री पुरुष उपाधि विपरत संभवतच नाहीं. युरोपांत सुवर्ण स्त्रीदाक्षिण्य हा गुण असे हा गुण महाराष्ट्र ब्राह्मण समाजांत असेल आपल्या दाक्षिण्याचा प्रभाव पतीवर त्यास ज्ञान देऊन त्याच्या करवीं स्त्रीचा उद्धार कां करवीत नाहीं ापलेंच घोडें कशास दकलतात. ापामुळें त्यांची पोळी पिकत अनेक ागतील ते भोग भोगतां येत असतील ्या महत्कार्याचा आरंभ द्वैतांत ीस पतीचा व पतीस स्त्रीचा वीट ह्मणजे अद्वैतांत आरंभ करुन ्कं कामल्याची वेदप्राक्रिया बरेंच पहाण्यांत येत आहे.

**कर्ण भिद्यते मंत्रः** या सूत्राचा ऊन गुरुशिष्यिणीची ग्रंथी एकांतांत पाहिजे तिसरा कोणी जवळ ं चार कानांचे सहा कान होणार ाची लोकांत टर उडू नये विद्वान स्त्री रस्त्यानें एकटी ाल्यास तिच्यावर टीका व्हावी ःकरण मग्न होईल असे तिजवर र करावे व वाक् प्रहार कर- त्याची मर्दुमकी लोकांनीं गावी ्री उन्नतिका अवनति हेंच आह्मांस ाहीं.

## विलक्षण खटला

ास नुकत्याच एका विलक्षण समाप्ती झाली. थोड्या दिवसां- एक पोलिस इन्स्पेक्टराचा भर र झाला, आणि त्याच वेळीं ाय नांवाचा एक बंगाली तरुण ून पकडला गेला. अलीकडे बरेचशे अत्याचार घडले व ते पत्ता लागला नाहीं,तेव्हां या ा आरोपी हातीं लागल्या बद्दल अत्यानंद होऊन त्या आनंदाच्या पोला पकडून देणाराला बक्षिसें समारंभही आरोपीची चौकशी ापूर्वीच घाईघाईनें उरकण्यात रीतीप्रमाणें जज्ज व ज्युरी आरोपीची चौकशी झाली. या ं आरोपी तर्फे ब्यारिस्टर हे होते. यांच्या उलट तपा- शक्ते पुढें पोलिसाचे साक्षीदार आणि जुरीनें आरोपी खुनाचे धानें निर्दोषी आहे असें मत जज्जाला ज्युरीचें मत पटलें नाहीं. ह्मणून आरोपीवर खुनापेक्षां थोडासा सौम्य असा सदोष मनुष्य वधाचा आरोप ठेवून त्याची पुनः निराळ्या ज्युरीपुढें चौकशी झाली. पुनः तोच प्रकार घडला यावेळेसही ज्युरीनें बहु मतानें आरोपीला ठरविलें, पण जज्जाला ज्युरीचा निकाल न पटल्यामुळें तिसऱ्याना चौकशी होईल अशा वदंता पसरूं लागल्या. पण यावेळीं सर- कारतर्फे ॲडव्होकेट जनरल यांनीं 'आह्मी खटला पुढें चालवूं इच्छित नाहीं' असें सांगितल्यामुळ जज्जाला आरोपी सोडून द्यणें भाग पडलें. दोन निरनिराळ्या ज्युरींनीं आरोपी निर्दोषी असल्या बद्दल मत देणें ही कांहीं सामान्य गोष्ट नाहीं. आरोपी कदाचित् दोषी ही असूं शकेल, पण त्याला दोषी ठरविण्यास पुरेसा पुरावा पुढें आलेला नाहीं असें ज्युरीला वाटत असल्याखेरीज आणि पुरेशा पुराव्याच्या अभावीं त्याला गुन्हेगार ठरविण्यांत आपण अन्याय केला असें होईल अशी जबाबदा- रीची जाणीव त्र त्यांच्या मनांत वागत असल्या खेरीज दोन निरनिराळ्या ज्युरींनीं एकसारखें मत देणें शक्य नाहीं. आमच्या देशांत ज्यूरीची संस्था नवीन आहे असें नाहीं. गावपंचायतीच्या रूपानें ती हजारों वर्षांपासून आहे. अर्थात् ही जबाबदारीची जाणीव सजीव आहे आणि तिला सजीव ठेवण्यांत लोकांची शास्त्रवचना वरील श्रद्धा आणि पापभीरुता यांनीं मोठें साह्य केलें आहे. तेव्हां आमच्या ज्यूरींचा निकाल हा लह- रीचा किंवा अज्ञानमूलक ह्मणण्यापेक्षां तो न्यायबुद्धीची पक्वता व अन्यायभीरुत्व यांचें परिणत फळ आहे असेंच ह्मणणें योग्य आहे. पण कलकत्त्याच्या दोन ज्यूरींनीं आपल्या मनाजोगता निकाल दिला नाहीं ह्मणून ज्यूरी- पद्धतिच समूळ खणून टाकण्यास उद्युक्त झालेलीं कित्येक ॲंग्लोइंडियन पत्र असा टाहो फोडीत आहेत कीं देशी ज्यूरर लोकांना आपल्या अधिकाराचा उपयोग करता येत नाहीं, सबब ज्युरीची पद्धतिच हिंदुस्थानांत बंद करावी! हिंदुस्थानच्या लोकांच्या आंगचे बहुमोल गुणच या पत्रकर्त्यांना दुर्गुण भासूं लागले तर 'भवि- तव्यता बलीयसी' ह्मटलें पाहिजे. सुदैवानें बंगालचीं राज्य सूत्रें लॉर्ड कारमायकेल सारख्या न्यायप्रीय अधिकाऱ्याचे हातीं असल्यामुळें कांहीं अनिष्ट परिणाम होण्याची विशेष भीती नाहीं.

# वऱ्हाडवृत्त

**हवाभान**—आकाश निरभ्र असून उन्हाळा विशेष भासावयास लागला आहे सकाळीं गुलाबी थंडी असते. हवेंतील झालेल्या फरका- मुळें ताप वगैरे किरकोळ आजाराशिवाय सार्व- जनिक आरोग्य ठीक आहे.

रा. रा. सि. सी. चिध्याम आसि. डे. पो. सुप. ऑफ इन्व्हेस्टीगेशन डिपार्टमेंट मध्यप्रांत यास डे. सु. ऑफ पोलिस करून यवत माळास बदलले त्यांनीं आपल्या कामाचा चार्ज घेतला ह्मणजे रा. रा. ए. सी- आर्मस्ट्रांग आफि. डे. सु. ऑफ पोलीस हे इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस मध्यप्रांत यांच्या आफिसांत स्पेशल ड्यूटीवर जातील.

राजापूरकर नाटक मंडळी आज पंधरा वीस दिवस झाले आपले लोकमान्य खेळ करून दाखवीत आहे. गेल्या शनिवारीं त्याचा संततुकाराम हा खेळ बरा झाला. सीनसीनरी व नाच हे बरे आहेत. कांहीं उत्तम गाणाऱ्या मंडळींची जोड मिळाल्यास ही कंपनी यापेक्षांही जास्त लोकादरास प्राप्त होईल. अनियमितपणामुळेंही ... बरीच प्रेक्षक मंडळी नाराज होतात.

**म्युनिसिपालिटी इकडे लक्ष देईल काय**— सध्या नदीचे पाणी बरेंच खराब झालें आहे. व त्यापासून सार्वजनिक आरो- ग्यास धक्का बसण्याचा संभव आहे तर म्युनिसिपालीटी इकडे लक्ष देऊन आधीच त्याबद्दल कांहीं तरी तजवीज आगाऊं पासून करील तर बरें.

## NOTICE

CITATION UNDER SECTION 250 OF THE INDIAN SUCCESSION ACT, 1865, OR SECTION 69 OF THE PROBATE AND ADMINISTRA TION ACT, 1881.

IN THE Court OF The district Judge W .B. D.

AT Akola

Mis, Judl case No. 34 of 1914. Petitioner Ramlal Ratanlal Khandelwal Marwadi of Mangrul Navghariache T. Chikhli

SUBJECT—

WHEREAS the Petitioner above named has filed a petition in this Court for the grant of probate of the will of the late Bisanlal son of Ratanlal, caste Marwadi, resident of Mangrul Navghariache Tahsil Chikhli, District Buldana and the petition will be heard in this Court at Akola on the 2nd day of May 1914 all persons claiming to have any interest in the estate of the said deceased Bisanlal are hereby given notice to appear and see the proceedings before the grant of probate.

Given under my hand and the seal of the Court, this 3rd day of April 1914

( Seal. ) G. W. Bapat
A. D. J.
for
District Judge. Akola.

N. o. 31

## नोटीस

वि॥० सीनीअर सबजज्ज सो। बहादुर कोर्ट आकोला यांचें कोर्टात सक्सेशन सरटीफीकीट नंबर ४/१४ चौकशीची तारीख २-५-१९१४ अर्ज सक्सेशन सरटीफीकीट मिळण्या करितां सवत्र लोकांस कळविण्यात येतें कीं, तुळसाबाई जवजे गोविंदा कुणबी रा. केळीवेळी ता। आकोट जी॥ आकोला इनें सरटीफीकीट मिळण्या करिता आमचें कोर्टात ता. १३ ३ १४ इसवी रोजी अर्ज केला आहे व त्याचा चौकशीची तारीख २-५-१४ ईसवी ची नेमली आहे तरी ज्याची कांहीं अर्जा विरुद्ध तक्रार असेल त्यांनीं आमचे कोर्टात ता। २-५-१४ ईसवी रोजी सकाळी १० वाजतां हजर राहावे तसे न केल्यास अर्जदार यास सक्सेशन सर्टीफीकीट दिले जाईल व मग कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकीली जाणार नाहीं कळावे ता. १५-४-१४

R. N. Trivedi.

नं० १२ सीनीअर सबजज्ज आकोला

## नोटीस

नोटीस बेशमी गुणापा वीरापा वाणी रा. चोंढी तालुके बाळापूर याजकडून १ सोनाई मर्द राघोजी २ अंबाई मर्द उदाजी उभयतां जात आंध आडनांव डुकर रा. चोंढी तालुके बाळापूर यांस नोटीस देण्यांत येतें कीं तारीख १५-६-१९०३ ई रोजी तुह्मी दोघीं जणींनीं आमचे पासून रकम रुपये ८५ चा भरणा कबूल करून गहाणखत लिहून दिले आहे त्यांत तुह्मी करारा प्रमाणें वसूल देऊन फेड केली नाहीं तरी या नोटीशीनें तुह्मास कळविण्यांत येतें कीं ही पावल्या पासून १५ दिवसांत तुह्मी दोघींनीं येऊन आपसांत नीकाल करुन घ्यावा नाहीं पेक्षां अह्मास कोर्ट मार्फत योग्य तजवीज करुन या नोटीशीचा खर्च व व्याजासुद्धां रकम वसूल करण्या करितां दावा करावा लागेल तारीख १४-४-१९१४ सही

गुणापा वीरापा द. खु.

नो. नं. ३३

## जाहिर नोटीस

जाहीर नोटीस देण्यात येतें कीं मी खालीं सही करणार हिनें आपले तर्फे कोर्टाचीं व इतर कामें करण्या करितां बलदेवसिंग वलद अनुसिंग रजपूत राहणार आकोट तालुके व जिल्हे आकोला यांस—

तारीख २१।१०।१३ इसवी रोजीं कुलमुखत्यारपत्र दिलें होतें परंतु हल्लीं मी या जाहीर नोटीसी वरून त्याचे आज तारखे पासून मुखत्यारपत्र रद्द केलें आहे त्याचेशीं मज संबंधानें या पुढें कोणीही व्यवहार करू नये. केल्यास तो कायदेशीर होणार नाहीं व मी त्या बद्दल जबाबदार नाहीं तारीख १४१९१४ इसवी

सही

गोदावरी जवजे ईश्वरसींग रजपूत राहणार आकोट हल्ली रा. बेळगांव ता. आकोट हिचे हातची निशाणी बांगडी असे

नो० नं० ३४

## " खरें पौष्टिक औषध "

पाहिजे असल्यास, आमचे हात भट्टीचे, शास्त्रोक्त यासांग पद्धतीनें, निर्विकारी व ज्यात (कारखान्याचे औ० प्रमाणें) उष्ण गुणधर्म नाहीं, व प्रतिज्ञेनें १४ दिवसांत हटकून गुण देते, असे वंग भस्म वापरा किं. तो. ३ रु. अनुपान खरडा सोबत असतो ४० विकार यानें दुरस्त होतात तसेच वरील पद्धतीनें, प्रवाल भस्म तयार असून ११ विकार घालविते, खरडा सोबत असतो. ज्याना, परमा, उपदंश व इतर कांहीं कारणामुळें, उन्हाळ्यात, उन्हाळी लवकीत आग धातुस्थानची कडकी, असे विकार होतात, त्याना याचा फार उपयोग होतो. किं. तो. २ रु. शिवाय पोष्टकही आहे. **त्वच्यारोगांतक**— १ मलम, खरूज, गजकर्ण खवडा, आगीण वगैरे कोणत्याही त्वचा रोगावर चालतो. अनेक मलमाची जरुरी नाहीं. किं ८ आणे, वि. खु. क्याटलाग मागवा. फुकट व्ही. आर मुळें, नांदुरा, जी. आर. पी.

नो. नं. १९

## नोटीस

तारांचंद मंगणीराम दुकान कुनगाड खुर्द ताँ० जळगांव जि० बुल्ढाणा या दुकानचे वहिवाटदार मालक शिवनारायण मंगणीराम

यांस –

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं तुम्ही आमचे पासून सुमारें चार महिन्यापूर्वीं आमचे पासून मौजे कुनगाड येथील आमचे पूर्ण मालकीचें शेत सर्वे नं. ९ ११ एकर ८ गुंठे आकार रुपये २४ यांतील एक त्रितीयांष हिस्सा उत्तरे कडील १९०० रुपयांस खरेदी घेतला. त्या पैकीं ९०० रुपयांचा भरणा तुम्ही मला दिला बाकी राहिलेले ६०० रुपये घरीं गेल्यावर देतो असे मला जळगांव येथील रजिस्द्रार यांचे कचेरींत तुम्ही व मी खरेदीखत रजिस्टर करण्यास गेलो होता त्यावेळीं मला सांगितले. व रजिस्द्रार साहेब याचे समोर पूर्ण भरणा पावल्या विषयीं जबानी देण्यांस तुम्ही मला सांगितले. त्याप्रमाणें आपले बोलण्यावर मी पूर्ण विश्वास ठेवून रजिस्द्रार साहेब यांचे समोर पूर्ण भरणा म्हणजे १९०० रुपये पावल्याबद्दल जबानी दिली. पुढें घरीं गेल्यावर आपणा जवळ ६०० रुपये मागितले असतां तुम्ही मजवर उलट कुभांड रचून रुपये देण्याचे नाकारले. व म्हणाला कीं खरेदीखत करून देण्यापूर्वींच मी तुम्हांस सर्व भरणा दिला आहे. आपले जवळ मी अनेक वेळां रुपये मागितलें परंतु आपण माझे रुपये देणें नाहीं असा रोकडा जबाब देऊन मला माघारें पाठविलें तरी या नोटीशीनें आपणास कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत माझे देणे राहिलेले ६०० रुपये माझे घरीं पोंचते करून द्यावे तसे न केल्यास कायदेशीर दिवाणी व फौजदारी इलाज केले जातील. आपणा सारख्या मोठ्या मनुष्याचे शद्बावर भरंवसा ठेवून भरणा पावल्याचे रजिस्द्रार समोर कबूल केले. असो आपणास आपला शद्ब राखण्याची आणखीं एकवेळ संधी घ्यावी असे वाटून ही नोटीस मी आपणास देत आहे. तरी माझे आपणाकडे येणें असलेले रुपये ६०० नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत आणून द्यावे नाहींत कायदेशीर इलाज केले जातील. आपण माझे रुपये देईपर्यंत शेताचा ताबा मी सोडणार नाहीं. कळावें ता. १२-४-१४ इ.

सही

यशवंतराव शामराव देशमुख रा. कुनगाड

नो. नं. १२

## नोटीस

नोटीस बेशमी पारूबाई मर्द संतु आपा वाणी व रुदु आपा वाणी रा० उमरड बाजारचे ता० मुतजापूर जि० आकोला नोटीस देतो कीं माझा आजा लक्ष्मण आपा रा० गीरोली यांजपासून शेत किंवा जागा वगैरे इस्टेट कोणते प्रकारें लिहून घेऊं नये घेतली तर ती पोकळ समजली जाईल कारण ह्मातारा वृद्ध फार झाला तो देहावर नाहीं. फंदफीतुरानें इस्टेट लिहुन घेऊं नये करितां आपणास नोटीसीनें कळविले सही ता० ७-४-१४ इ.

द० नारायण रामासा महाजन मानोरा

सही

रामचंद्र बळीराम वाणी राहणार गीरोली दस्तुर खुद

नो. नं. १३

## नोटीस

नोटीस बेशमी रखमाई मर्द नारायण हंरी हजाम रा० खिरपुरी ता० बाळापूर ईजला:–

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी साक्षांत चुलती असून आमची वडिलोपार्जित स्थावर माल मौजे घुई प्रगणे बाळापूर ता० मजकूर व येथील शेत सर्व नंबर ६८ एकर ३८१२ आकार ९८११८३ असून हा नंबर तूं खरेदी देणार असे समजतें करितां या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं सदरहु नंबर तुला खरेदी अगर गहाण किंवा बक्षीस देण्याचा अधिकार नाहीं दिल्यास त्याची जबाबदारी तुझेवर आहे माझेवर नाहीं तूं फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहे. कळावें ता० १२ ४ १४

द० कृष्णाजी केशव रा० आकोला

सही

निशाणीची रेघ भिकाजी हरी हजाम रा० पारस याचे हातची

नो० नं० १४

## नोटीस

गंगाराम बा भिकाजी माळी राहणार जळगांव नाथ्याचे ता० आकोट

मी खालीं सही करणार सर्वत्र लोकांस नोटीस देतों कीं माझा भाऊ लक्ष्मण वल्लद मुकाजी माळी रा० जळगांव नाटे ता० आकोट हा अंदाजानें पांचएक वर्षापूर्वीं मरण पावला. त्याची सर्व स्थावर आणि जंगम मिळकत वडिलोपार्जित होती ती सर्व जिनगी त्याची विधवा रमाई मर्द लक्ष्मण हिचे जवळ आहे आणि सदर्हु जिनगींत तिचा फक्त अन्नवस्त्राचा हक आहे आणि ती मेल्यावर किंवा तिनें गंधर्व केल्यावर त्या सर्व जिनगीचा मालक मी आहे. ह्मणून सर्व लोकास या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं कोणीहि साहूसावकारवगैरे लोकांनीं तिजला कर्ज देऊं नये किंवा तिचे पासून कोणतीहि स्थावर जंगम मिळकत गहाण किंवा खरेदी वगैरे कांहीं घेऊं नये तसें केल्यास मयत लक्ष्मण मुकाजीची जिनगी कांहीं जबाबदार राहणार नाहीं. हे कळावें ता. २ माहे एप्रील सन १९१४

सही

गंगाराम भिकाजी नि. खुद हातची असे

नो. नं. १५

## नोटीस

नोटीस बेशमी चंद्री मर्द सकाराम वाणी रा० गीरोली व सकाराम वा रघु आपा वाणी सेटे रा० गीरोली

यांस:–

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही माझा आजा नामे लक्ष्मण आपा याजपासून फंदफीतुर करून कोणते प्रकारे शेत व इस्टेट लिहून घेऊं नये घेतल्यास तुम्ही जबाबदार व्हाल व ती पोकळ लिहून घेतली समजली जाईल करितां या नोटीसीनें आपणास कळविले ह्मातारा शुद्दीवर नाहीं वृद्ध फार झाला तो कोणतेही तऱ्हेनें मिळकत लिहुन देईल तर तुम्ही लिहुन घेऊ नये ता. ७-४-१४

द० नारायण रामासा महाजन मानोरा

सही

रामचंद्र बळीराम वाणी ख. रा. गीरोली दस्तुर खुद

नो. नं. १६

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं माझी मौजे पाटखेड ता० आकोला जि० आकोला येथें सर्वे नं. १४४ व १४६ अशी दोन शेतें आहेत. न. १४४ मध्ये एक द्वितीयांश हिस्सा व १४६ मध्ये एक शष्टमांश असे हिस्से आहेत. या शेतांतील हिस्से माझे. पूर्ण मालकीचे असून त्यांच्या स्वामित्वाचा, उपभोगाचा, यांस दान देण्याचा, गहाण टाकण्याचा, विकण्याचा, अगर पट्यानें देण्याचा पूर्ण अधिकार माझा एकटीचा असून दुसरे कोणाचाही नाहीं. ऐकण्यांत येत आहे कीं मारुती वा विठोबा ठिकार हा माझ्या कबजास भंग करूं पहात आहे. या साठीं सर्वांस कळविण्यांत येते कीं तो कदाचित कांहीं कसल्याही प्रकारची या शेतांची वासलात लावील तर लोकांनीं वेळींच सावध रहावें. त्याचें करणें बेकायदेशीर आहे. व त्यास सामील झाल्यास सामील होणारावर कायदेशीर इलाज योजिले जातील. कळावें ता० १४ एप्रिल १४

सही

उमाई मर्द उद्देभान घोतरे राहणार मौजे पाटखेड ता० व जि० आकोला इचे हातची निशाणी बांगडी

नो. नं. १७

## नोटीस

नोटीस बेशमी संपत दिवटाजी कुणबी रा० अंबिकापूर ता० आकोले

यांस:—

खालीं सही करणार नोटीस देतों ती येणें प्रमाणें–तुम्ही आमचे पक्षकार हाजी सेखईब्राहीम यास तुमचे भावानें ता. १२-२-१२ इ० रोजीं दिलेल्या खरेदी खतात असा जामीन लिहून दिला आहे कीं सर्वे नं० १९ साठीमच्या कबजास जर कोणत्याही रितीनें आमचे पक्षकारास हरकत झाली तर तुम्ही आपला स्वतःचा मौजे अंबिकापूर ता० आकोले येथील शेत सर्वे नं० ३९ ए० २४०२ आ. ८. २८ सालीम हे त्याचे मोबदल्यात त्यास देण्यास तयार आहोंत. आतां तुमचे बंधूस तुमचे समक्ष सर्वे नं० १९ च्या कबजाबदल विचारले असतां त्यानें कबजा देता येत नाहीं असे कळविले ह्मणून तुम्हांस सदर्हू जामीनकी प्रमाणे सर्वे नं. ३९ चा कबजा देण्याबद्दल विचारले असतां तुम्ही कबजा देत नाहीं तर असे न करतां ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत आमचे पक्षकारास सर्वे नं० ३९ चा कबजा द्यावा व आमचे पक्षकाराची पावती घ्यावी असे न केल्यास आह्मास कायदेशीर तजवीज करावी लागेल ही नोटीस आज ता० १२-४-१४ इ.

आपला

विनायकराव लक्ष्मणराव ओक बी. ए. एल्. एल्. बी. वकील

नो० नं० १८

## नोटीस

नोटीस कलम ११ एक्ट ८ सन १८९० प्रमाणें.

किरकोळ मुकदमा नंबर ३१ सन १९१४ ई.

विद्यमान डी. जज साहेब यांचें कोर्ट मुक्काम आकोला

नांव बळीराम

गुरु लक्ष्मण भारथी

जात गोसावी राहणार काटी

तहसील मलकापूर जिल्हे बुल्ढाणा

त्या अल्पवयी फुलगीर गुरु गणेशगीर

उमर वर्ष अंदाज १४

राहणार पळसीसुपो तहसिलीचे (२) जळगांव डी. बुलढाणा साठीं पालन कर्ता (१)

नेमण्या विषयींच्या अर्जा संबंधी (१)

सर्वत्र लोकांस यांस

सदर्हु अर्जदारानें सदर्हु अल्पवयीचें (२) स्वतः व त्याची मालमत्ता साठीं पालन कर्ता (४) नेमण्या विषयीं अर्ज केल्या वरून सदर्हू अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख ३० माहे ४ सन १९१४ ई० रोजीं नेमिली आहे, त्या वरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं सदर्हू अर्जदाराच्या अर्जा बद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जा संबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हाजर झाले पाहिजे; आणि त्यास अशी ही नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल.

आज तारीख २ माहे ४ सन १९१४ ई० रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्यानिशीं दिली.

शिक्का G. W. Bapat

A. D. J. for डि. जज. आकोला

नो० नं० १९

| | |
|---|---|
| तांबूल नवरत्न | न कत्थेकी परवा न चुनेसे काम, हमार मसालेका सबको सलाम. पानाच्या विड्यांत खाण्याचा उत्तम मसाला. चुना व काथाची जरूर नाहीं. किंमत डबीस सहा आणे. |
| नवरत्न टेबलेट | उत्तम सुवासिक अत्तराच्या वड्या. किंमत डबीस तीन आणे. |
| नवरत्न तमाखु | पानांत खाण्याची केशर, कस्तुरी इत्यादि सुवासिक वस्तु मिश्रित तमाखु. किंमत दर तोळ्यास दीड आणा. |
| मद्रासी नस | अति उत्तम सुवासिक नस. मेंदूवर, खास गुणकारी. बाटलीस चार आणे |
| गजकर्णीचें मलम | गजकर्णीवर उत्तम औषध. डबीस चार आणे. |
| केश काढण्याचें तेल | केश काढण्याचा उत्तम इलाज. किंमत सीसीस अडीच आणे. |
| चन्द्रकांत बाम | मेंदूला व डोक्याला अति उपयोगी. सीसीस किंमत आठ आणे. |

बनविणार टी. एस. मित्र. जळगांव.

आकोल्याचे सोल एजंट— चमन कंपनी.

पत्ता— ताजनापेठ बाजार— आकोला.

नो. नं. २०



अनुभवास योग्य

सुवर्ण पदक मिळालेलें

# ओटोमोहिनी

टिकाऊ, आनंद दायक, सुगंधी पदार्थ. जर कोणी ओटो मोहिनीचा सुवास चार दिवसात उडून जाता असें प्रमाणसिद्ध करून दाखवील तर त्यास १०० रुपये बक्षीस देऊं, तर एकदां अवश्य १ बाटली खरेदी करून अनुभव पहावा व बक्षीसास तयार व्हावें. ॥ औंसाच्या बाटलीची किंमत २ रुपये आणि १ ड्रामाच्या नळीस १२ आणे. ओटो मोहिनीचे सुगंधी कागद १२ आणे डझन.

मिळण्याचा पत्ता—ओरियेंटल ड्रग आणि केमिकल कंपनी सोल प्रोप्रायटर्स जुमा मसजिद मुंबई

नो. नं. २२



Oriental Government Security

Life Assurance Company, Limited,

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

R. PATERSON BROWN, MANAGER.

FUNDS EXCEED 4½ CRORES.

Claims paid for over 3½ Crores.

*ALL PERSONS*

WHO ASSURE FOR THE FIRST TIME

OR

WHO INCREASE THEIR PRESENT ASSURANCE

WITH

*THE ORIENTAL*

BY EFFECTING A WITH PROFIT POLICY

ON OR BEFORE 31 ST DECEMBER 1913 WILL BE ENTITLED TO

THREE YEARS BONUS

PROVIDED

THREE YEARS PREMIUMS HAVE BEEN PAID

AND

THE POLICY IS IN FORCE ON 31St DECEMBER 1915.

Prospectus, forms, and further information can be obtained on application to—

CHIEF AGENCY FOR C. P. BERARS AND KHANDESH,—

NAGPUR.

M. DESOUZA

CHIEF AGENT!

*Nagpur.*

No N. 21



वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी

राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० देड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

राजवंशी सांड्याचें तेल,

किंमत रुपये १ देड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे. सरकारचे केमिकलएक्झामिनर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

परमा सायरप

कमरेचाही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध- एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज कि० १ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया.

ठिकाणा :— डॉ० शि० एच० भट, यांचा दवाखाना.

२८ जांबळी मोहल्ला मुंबई.

नो० नं० २३



सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा



डॉ० वामन गोपाळ याचा

आयोडाईज्ड सार्सापरिला.



हा सार्सापरिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धीवर गुण वाटून इतर रक्तशुद्धी करणाऱ्या औषधांत "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे. जुना संधिवात, त्वचे संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याची सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे. याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाणः-- डॉ. गैतमराव केशव

नो० नं० २४ ५६३ ठाकूरद्वार मुंबई.


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

## नोटीस

नोटीस कलम ११ एक्ट ८ सन १८९० प्रमाणें.

किरकोळ मुकद्दमा नंबर २८ सन १९१४ ई.
विद्यमान डी. जज साहेब यांचें कोर्ट
मुक्काम आकोला

नांव बनाई मर्द गंगाराम
जात पटवी राहणार तेल्हारा
तहसील आकोट जिल्हे आकोला
ज्या अल्पवयी बाबू ऊर्फ भगवती गंगाराम
उमर वर्ष १७॥
राहणार तेल्हारा ता० आकोट तहासिलीचे (२)
साठीं पालन कर्ता ( १ )
नेमण्या विषयींच्या अर्जा संबंधी
( ३ )

सर्वत्र लोकांस यांस
सदर्हु अर्जदारानें सदर्हु अल्पवयींचें ( २ ) स्वतः व त्याचीं मालमत्ता साठीं पालन कर्ता ( ४ ) नेमण्या विषयीं अर्ज केल्या वरून सदर्हू अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख १ माहे ५ सन १९१४ ई० रोजीं नेमिली आहे, त्या वरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं सदर्हू अर्जदाराच्या अर्जा बद्दल जर कोणास काहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जा संबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हाजर झाले पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल.

आज तारीख २८ माहे ३ सन १९१४ ई० रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्यानिशीं दिली.

शिक्का G. W. Bapat
A. D. J. for डि. जज. आकोला
नो० नं०२५

---

## नोटीस

नोटीस बेशमी मारुती दिव्रटाजी कुणबी रा० अंबिकापूर ता० आकोले
यांसः—

खालीं सही करणार नोटीस देतो कीं आमचे पक्षकार हाजी सेखईब्राहीम वा। महमद अमीर मुसलमान रा० आकोले यांनी तुमचे पासून रु० २००० अक्षरी दोन हजाराचे भरण्यांत तुमचे मालकीचे मौजे वढद ता० आकोले येथील शेते सर्वे नंबर ४९ ए० २६६२ आ० रु० ४६ सालीम व मौजे खरप बुनरुक ता० आकोले येथील शेत सर्वे नं० १९ ए० ३१६१७ आ० रु० ४८ यांतील १ हिस्सा अशी शेतें
१८
ता० ४-१०-११ व ता० १२-२-१२ इ. रोजीच्या दोन राजिस्टर खरेदीखताअन्वयें विकत घेतली आहेत. व ता० ४-१०-११ चे सर्वे नं० ४९ चे एक द्वितीयांश हिश्याचे खरेदीखतात त्यांत नमूद केलेला एक द्वितीयांश हिस्सा मारोती कुकाजीवर दिवाणींत दावा करून कबजा मिळाल्यावर कबजा देईन व त० १२-२-१२ चे खरेदीखतातील सालीम जमीन तावडतोब कबजांत दिली आहेत असे लिहून दिले आहे. परंतु तुह्मी सदरहू दोन खरेदीखतातील जमीन आमचे पक्षकाराचे ताब्यात देऊं शकाल अगर नाहीं अशी शंका आल्यामुळें आमचे पक्षकारानें तुमचे बंधुकडून ता० १२-२-१२ चे खरेदीखतात जामीन ही लिहून घेतली आहे. तुह्मास आमचे पक्षकारानें सदर्हू खरेदीखतातील जमीनीचा कबजा बरेच वेळां मागितला असतां तुह्मी ता० ४-१०-११ चे खरेदीखतात ह्मटल्याप्रमाणें दावा वगैरे हि केला नाहीं व कबजाहि दिला नाहीं. तरी या नोटीसीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं हा नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत तुह्मी आमचे पक्षकारास सदरहू दोन्ही खरेदीखतातील शेतांचा कबजा द्यावा असे न केल्यास तुमचेवर कायदेशीर इलाज करून या नोटीशीच्या खर्चासुद्धां व विकाच्या नुकसानी सुद्धां कोर्ट मार्फत कबजा घ्यावा लागेल ही नोटीस आज तारीख १३-४-१४ इ.

आपला
विनायकराव लक्ष्मणराव ओक बी. ए.
एल. एल. बी. वकील आकोला
नो. नं. २६

---

## नोटीस

मारुती वा। विठोबा टिकार राहणार पाठखेड ता। आकोला जि० आकोला
यांसः—

खालीं सही करणार या नोटीशीनें कळविते कीं माझे शेत सर्वे नं० १४६ चें आहे त्यात माझा सहावा हिस्सा आहे आणि दुसरें नं० १४४ चें आहे त्यांत माझा आठ आण्याचा हिस्सा आहे. हीं दोन्हीं शेतें मौजे पाठखेड प्रा। आकोलें ता० व जि० आकोलें येथें आहेत. या शेतांतील माझ्या हिश्यांवर पूर्ण हक्क माझा असून तीं कोणासही पत्त्यानें देण्याचा दान देण्याचा विकण्याचा अगर गहाण ठेवण्याचा किंवा दुसरे कोणतेही रितीनें त्यांचा उपभोग घेण्याचा अगर त्यातील उत्पन्नाची व्यवस्था लावण्याचा पूर्ण अधिकार माझा आहे. माझ्या ऐकण्यांत येतें आहे कीं तुह्मी त्या शेताचा कबजा आपला आहे असें समजतां ही तुमची चूक आहे. तुह्मी माझ्या मालकीच्या जमिनीची कसलीही अफरातफर कराल तर तुह्मावर मी फौजदारी आणि दिवाणी कामें चालविन. वेळीं सावध व्हावें कळावें, ता० १४ एप्रिल १९१४ इ,

सही
उमाई मर्द उदेभान धोतरे रा०
पाटखेड ता० व जि० आकोला
इचे हातची नि० बांगडी
नो० नं० २७

---

## नोटीस

नोटीस कलम ११ एक्ट ८ सन १८९० प्रमाणें.

किरकोळ मुकद्दमा नंबर २९ सन १९१४ ई.
विद्यमान डि. जज साहेब यांचें कोर्ट
मुक्काम आकोला

नांव शिवराम
बापाचें नांव संतोबा बोरळ
जात राहणार जालना
तहसील जिल्हे
ज्या अल्पवयी प्रयागजी मर्द गोपाळ सखाराम
उमर वर्ष ११
राहणार शेळगाव अटोळी तहासिलीचे ( १ ) चिखली जिल्हे बुलडाणा हल्लीं राहणार जालना
साठी पालन कर्ता ( १ )
नेमण्या विषयींच्या अर्जा संबंधी
( ३ )

सर्वत्र लोकांस यांस
सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचें ( २ ) स्वतः व तीची
मालमत्ता साठीं पालन कर्ता
( ४ ) नेमण्या विषयीं अर्ज केल्या वरून सदर्हू अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख २ माहे ५ सन १९१४ ई० रोजीं नेमिली आहे, त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जा बद्दल जर कोणास काहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जवाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जवाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हाजर झाले पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यात येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल.

आज तारीख ३० माहे ३ सन १९१४ ई० रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्यानिशीं दिली.

शिक्का G. W. Bapat A. D. J.
For डि. जज. आकोला
नो० नं० २८

---

## नोटीस.

नोटीस बेशमी सूर्यभान वल्लद परशराम पाटील राहणार चांगेफळ तालुके बाळापूर
यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं एलाई मर्द रायभान ही माझे चुलत भावाची बायको आहे. तुमची मामे बहीण आहे. एलाईचा नवरा मयत होण्यास ३ वर्षें झालीं सर्व जिनगी वडिलोपार्जीत असून वाटण्या वगैरे झाल्या नाहींत. एलाईच्या नावानें २ शेताचीं खातीं आहेत त्यासुद्धां एकंदर जमीन माझे ताब्यांत आहे. एलाईचे नांवाचीं २ शेतांचीं खातीं माझे नांवानीं करून दे. असे ह्मटलें तेव्हां आपसांत असें ठरलें कीं एलाई व तिची पालनकर्ती सासू रुखमाई या दोघी मिळून १२०० रुपये खाती करून देतील तर द्यावें न करतील तर कांहीं द्यावयाचें नाहीं. या कामा करितां प्रथम पुर्जा लिहुन देशील तर मी बाळापुरास रुपये घऊन येईन. असें तुह्मी सांगितलें व रुपये देण्याचें काम न पडलें तर करून घेतलेला दस्तऐवज परत देईन. तेव्हां तुह्मी माझे मेव्हणे ह्मणून तुमचे विश्वासावर तुमचे बरोबर मी बोरी आडगांव येथें आलों तेथें माझे जवळून मला भरणा न देतां चार चारशे रुपयाचे ३ रोखे तारीख ४-२-१४ रोजीं माझे पासून लिहून घेतले व मी गांवाकडे निघून आलों. त्यानंतर तुह्मी कबूल केल्याप्रमाणें तारीख १४-२-१४ रोजीं बाळापुरास आलेत त्यावेळीं तुमचा मामा बळवंता हा रुपया बद्दल तक्रार करूं लागला. तो ह्मणे रुपये पटवाल त्यांतले कांहीं मला द्या. रुखमाई ह्मणे बळवंता यांस कांहीं एक द्यावयाचें नाहीं. अशा तक्रारी वरून शेताचीं खातीं माझें नावचीं एलाईनें करून दिली नाहींत ह्मणून मला तुमचे पासून रुपये घ्यावयाचे काम पडलें नाहीं. सबब बाळापुर मुक्कामींच मी सदर्हू १२०० रुपयाचे रोखे परत मागितले तुह्मी सांगितलें रोखे बरोबर आणीले नाहींत. ते माझे घरीं येऊन वेऊन जा. त्याप्रमाणें मी तुमच्या घरीं आलों असतां तुह्मी मागितलें कीं, बळवंता यास विचारून रोखे परत देईन. तेव्हां तुमचे मनांत दगेबाजी आली व तुह्मी मामे भाचे एक होऊन मला बुडविण्याचा बेत आणिलात तुह्मास मी ३।४ वेळ घरीं येऊन रोखे परत मागितले. तेव्हां हो देतो अशी थापबाजी मात्र दिलीत व बळवंता यास विचारण्याचें कांहीं कारण नसतां त्यास विचारून देतो असें सांगितलें व शेवटीं तारीख ६।४।१४ रोजीं आलो असतां रोखे साफ देत नाहीं असें सांगता त्यावरून तुमचे कपट पूर्णपणें माझे लक्षांत आलें. खातीं माझें नावचीं झालीं नाहींत. ह्मणून तुमचे पासून मी वरील रकम मुळींच घेतली नाहीं. पोकळ रोखे तुमचे पाशीं आहेत. ते तुह्मांस मागितले असतां दिले नाहींत सबब आतां नोटीस देऊन कळावितों कीं, ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसांचे आंत तारीख ४-२-१४ रोजीं तुह्मांस मी करून दिलेले चार चारशे रुपयाचे तीन रोखे मला परत देऊन पावती घ्यावी. याउपर तुह्मी सदर्हू पोकळ दस्तऐवजा वरून माझ्यावर फिर्याद कराल तर रकमेचा व कोर्ट खर्चाचा मी जबाबदार नाहीं. व वरील मुदतींत दस्तऐवज परत न द्याल तर तुमच्यावर फौजदारींत कायदेशीर काम चालवीन. या नोटीसीचा खर्च तुमच्यावर बसेल कळावें. तारीख १२-४-१४ इसवी.

सही
गोविंदा वा॥ रायभान पा॥ कान्हेरी द. खु.
नो० नं० २९

---

**पाहिजे आहेत.** पैसा आणि जोखमे वांचून धंदा करणारे. जास्त माहिती जे. आदम आणि कंपनी कोर्ट मुंबईकडून विचारणें.
नो. नं. ३०

Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४८ ] आकोला—– सोमवार तारीख २७ माहे एप्रील सन १९१४ इ० [ अंक १६

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठुदें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेविता येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमाच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ } एजंट
नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २१¦ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } G. A. PHILLIPS.
आकोला २१-९-१० } एजंट.
नो० नं० २

## ‘ विकावयाचा आहे. ’

वाशीम येथील, पूर्वीच्या डिस्ट्रिक्ट कोर्टाजवळ असलेला कै॥ राव बहादूर पुरुषोत्तमराव नारायण भट यांचा बंगला विकावयाचा आहे.

खंडवा ते इंगोली व्हाया वाशीम लोकरच रेल्वे लाईन ओपन होणार असल्यानें गरजूनीं किंमती वगैरे विषयीं समक्ष किंवा पत्रद्वारें खालील पत्यावर खुलासा मागवावा.

ना० खं० फडके
वऱ्हाड समाचार ऑफीस आकोला
नो० नं० ३ वऱ्हाड

## खिजाबे मसीहा ( कलप )

हा लावला असतांना पांढरे केंस ६ मिनीटांत काळे होतात इतकेंच नव्हे तर अगदीं मृदु होऊन तकाकी देतात. हा कलप बरेच दिवस टिकून कलप लाऊन केस काळे केले आहेत असा भासच होत नाहीं. एकदा अनुभव पहावा. पेटीस १ रु. व्ही. पी. खर्च निराळा.

खाकीसास जनावे टानिक पिल्स या योगें नपूंसक मनुष्य तेव्हांच बरा होतो. औषधाचा गुण ३ दिवसात कि. रु. २ व्ही. पी. खर्च निराळा.

खाकीसास तिल्लाये मासिहा. इंद्रियाच्या ढीलेपणावर आश्चर्यकारक खात्रीचा इलाज. तीन दिवसांतच सदहू औषध आपला गुण दाखविते. कि. रु. २ व्ही. पी. खर्च वेगळा.

शेट हरकचंद रतनजी आणि कंपनी.
१७ जुमा मसजिद मुंबई
नो० नं० ४

## अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेमप्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही.पी.नें रु० १०६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी

नो० नं० ५

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ६

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानातील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ विकार ताबडतोब दूर होतात. किं रु. १०८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे किं. ०४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात

नो० नं० ७

## WANTED

Seven Revenue Inspectors. Pay Rs. 25 plus Rs. 10 as pony allowance None need apply who have not passed the Matriculation or School Final Examination.

Applications with testimonials should reach the undersigned by the end of April 1914. Rejected applications will not be replied to. Selected candidates will have to join the posts at once

Dated Akola the 19 March 1914.

F. Dewar
Deputy Commissioner, Akola.

No. N. 8

### NATIONAL MEDICAL COLLEGE OF INDIA SCHOLARSHIPS.

Registered as a corporate body under Act XXI of 1860 of the Acts of the Viceroy teaches the full curriculum of L. M. S. & M. B. Standards, classes.

Grants L. M. S. ( Natl ) & M. C. P. S Diploma Hospital Practice College Fee Rs 3 monthly Dissections Boarding.

Scholarship offered by the Founder Dr. S. K. Mullic Rs. 50, 40, 30, 25, for Matriculates and non-Matriculates College Council Hon'ble Maharaja of Cassimbazar, Rajah Peary Mohun Mukerjee Bahadur C.S. I. Honble Justice A. Chaudhury. The Session begins in January and June. Apply to the DEAN *301, Upper Circular Road, Calcutta.*

No. No. 9

### नोटीस

सांगो बल्लद रावोजी इंगळे जात राहणार मजरे उमरवाडी मौजे येवसी ता० वाशिम पांस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझी मुलगी नामें सर्क इच्याशी तुझें लग्न लावून दिलें. ती आतां वयांत आली असून शहाणी आहे. पण तिच्या तुमच्याबरोबर संसार होऊं शकत नाहीं. तुह्माला खालीरितीची गोष्ट सांगावी आणि पंचाच्या अनुमतानें जो निकाल ठरेल तो आपण उभयतांनीं कबूल करावा असा विचार ठरल्याअन्वयें कराराप्रमाणें गेल्या मंगळवारीं ह्मणजे ता० २१ एप्रिल १९१४ रोजीं उमरवाडी येथें पंचाईत भरली होती. सर्व गोष्टींचा शहानिशा होऊन पंचांनीं निकाल केला कीं तुह्मी सरूला फारकत द्यावी. या जाहिर नोटिशीनें कळविण्यात येते कीं तुह्मी पंचाच्या ठरावाप्रमाणें लेखी फारकत लिहून द्यावी. असे करण्याला ८ दिवसांची मुदत दिली आहे. तुह्मी लेखी फारकत दिला ह्मणजे तिला योग्य वरठाव पहून पुनः दुनियेदारीला लावण्यात येईल. तुह्मी जर लेखी फारकत देण्याचा इनकार कराल तर तुमच्या तोंडी फारकतीच्या व या नोटिशीच्या आधारानें मी तिचा दुसरा मोहतीर करून देईन; मग तुमची तक्रार कांहीमात्र ऐकिली जाणार नाहीं. कळावें ता० २४ एप्रिल १९१४ इ०

सही

तुळशीराम दगडूजी ठाकड जात
राहणार मजरे पांगरताडी मौजे
सांवरगाव ता० बाळापूर जि.
वऱ्हाड

नो० नं० १०

वऱ्हाडसमाचार

मित्ती वैशाख शुद्ध २ शके १८३६

## मंगल शक्ति अथवा धर्मबल.

मंगल शक्ति अथवा धर्मबल याच्या द्वारें मनुष्यसमाज चालणें शक्य आहे कीं नाहीं या विषयीं पुष्कळांना शंका वाटते. त्यांची समजूत अशी दिसते कीं धर्मचर्चा व धर्मोपदेश यांच्या योगानें मनुष्याच्या मनाला शांति प्राप्त होईल, समाधान वाटेल, परोपकार करण्याकडे मनाची प्रवृत्ति होईल, पण त्याच्या योगानें मनुष्याची शक्ति वाढेल असें त्यांत कांहीं नाहीं. उलट मन कोमल होऊन लोक शांतिप्रिय, दुर्बळ आणि निष्क्रिय होतील. ही समजूत सर्वत्रिक आहे खरी, पण ती चुकीची आहे. लोकांना असें वाटतें कीं अंगांतल्या शक्तीचा वारंवार उपयोग करण्याचे प्रसंग आल्यावांचून · दोन धक्के देण्याचे व खाण्याचे प्रसंग आल्यावांचून मनुष्याची शक्ति वाढावयाची नाहीं. या साठीं देशांत शांतता न राहतां नेहमीं युद्ध प्रसंग येत गेले पाहिजेत. शारीरिक शक्तीविषयीं हें फार तर खरें म्हणतां येईल. पण शारीरिक शक्तीचे नियम मानसिक शक्तिला लावणें ही चूक आहे. धर्माच्या योगानें शारीरिक शक्ति प्रत्यक्षतया वाढत नाहीं. मानसिक बळ वाढें ही एक गोष्ट झाली. दुसरी गोष्ट अशी आहे कीं धर्म जागृति आपणास दुर्बळ करून सोडील ही भीती पाश्चत्य सुधारणे बरोबर आमच्यात आलेली आहे. ती मळची आमची नाहीं. आमचा देश मुळचा धर्मकल्पनाप्रधान आहे, आणि धर्मकल्पना जागृत असल्या पासून अंगात संचरणारा आवेश व त्यापासून उत्पन्न होणारी शक्ति याची विस्मृति आमच्या लोकांना सध्या झालेली आहे, त्यामुळें अशा मलमल्ल्या विचारांचें प्राबल्य आमच्या लोकांत दिसत आहे. वस्तुतः 'यतो धर्मस्ततो जयः' हा आमच्या धर्मग्रंथांचा मुलमंत्र आहे, आणि हा मुलमंत्र अनेक ऐतिहासिक प्रसंगीं खरा ठरला आहे. आमचे पूर्वज शारीरिक, मानसिक, धार्मिक आध्यात्मिक हीं सर्व एकाच वस्तूचीं निरनिराळीं अंगें समजत असत. ज्या राष्ट्रांत धर्मबळ अधिक तें नीतिबळानें, व शारीरिक बळानें ही इतराहून श्रेष्ठ असलेंच पाहिजे असा त्याचा पूर्ण विश्वास असे व हा त्याचा विश्वास त्याच्या प्रत्यंतरास ही येत असे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ त्यांच्या समजुतीप्रमाणें कधीं परस्परांना सोडून स्वतंत्र राहणारे नव्हत. ही त्यांची श्रद्धा कायम होती तोंपर्यंत ते जसे आध्यात्मिक बळांत श्रेष्ठ होते, तसे शारीरिक बळांत ही श्रेष्ठ होते. महाभारत व रामायण या सर्वमान्य ग्रंथांतल्या कथांचें स्थूल मर्म हेंच आहे. पण हें मर्म जाणण्याची पात्रता आतां आमचे ठायीं नसल्यामुळें आम्ही भ्रांतचित्त होऊन धर्मबळ आणि शारीरिक बळ याचीं फार खत झालेली आहे असें प्रतिपादूं लागलों आहों. वस्तुतः तसा कांहीं प्रकार मूळचा नाहीं. ज्याच्या ठायीं मनोबळ, धर्मबळ अथवा नैतिक बळ नाहीं त्यांची शरीरें दुर्बळ झालीं तर त्यांत नवल काय आहे? आमच्यांतली आध्यात्मिक बळावरची श्रद्धा उडाली, धर्मबळ व्यवहारांत उपयोगीं पडत नाहीं अशी खोटी समजूत आमच्या मनानें करून घेतली, आणि शील घालविलें तेव्हांच आमच्या अवनतीचा पाया घातला गेला. तेव्हांपासून आमची एकसारखी अवनतिच होत गेली. या अवनतीच्या मार्गानें आम्ही झपाझप खालीं उतरत असतां जडवादी पाश्चात्य शिक्षणानें आम्हांला जो धक्का दिला त्यानें आमची अवनति अधिकच झपाट्यानें होत गेली, आणि आतां तर पूर्वींच्या आमच्या मंगलमय उन्नत आदर्शाचें स्मरण सुद्धां आम्हांस राहिलें नाहीं, उलट त्या आदर्शाच्या उपयुक्त वासंबंधानें कुतर्क व कुशंका काढण्यांतच मोठी बहादरी समजण्यांत येऊं लागली आहे! आमच्या अवनतीचा पुरावा याहून अधिक काय पाहिजे?

वस्तुतः भारतवर्षाचा मूलमंत्र अद्वैत हा आहे. साकार निराकार एक, जडचैतन्य एक, ज्ञानशक्ति, आध्यात्मिक शक्ति, शारीरिक शक्ति एक, स्थूलसूक्ष्म एक, ज्ञान प्रेम कर्म एक, असें सगळीकडे अद्वैत ज्याकाळीं या भरतखंडांत नांदत होतें तो काळ आतां स्वप्नात सुद्धां दिसत नाहीं. आतां सर्वत्र द्वैताचें साम्राज्य झालेलें आहे. अंतर्जगत् आणि बाह्यजगत् हीं एकाच वस्तूचीं दोन अंगें आहेत, ही गोष्ट पाश्चात्य जगाला अश्रुतपूर्व असली तरी आम्हांला ती सनातन परिचयाची आहे. पण गंमत ही आहे कीं सर ऑलिव्हर लॉज यांच्या सारखे पाश्चात्य तत्त्वज्ञांना ती गोष्ट पटूं लागली आहे, आणि आम्ही मात्र तिला हळूहळू पारखे होत गेलों आहों. पाश्चात्य सुधारणा आतांपर्यंत एकांगी-केवळ बाह्यजगत्संबंधची होती, ती आतां पूर्णांग होत आहे, आणि आमची भारतीय सुधारणा मूळची अद्वैताच्या भक्कम पायावर स्थापन झालेली असून तिचा पाया आम्हीं आपल्या हातानें डळमळीत केल्यापासून आमच्या सुधारणेची इमारत पूर्णपणें खचली आहे. यातलें रहस्य काय आहे तें वर सांगितलेंच आहे. तें हें कीं आमच्यांतली मंगलशक्ति अथवा धर्मबळ नष्ट झालें आहे. तें पुनः प्राप्त करून शील संपादन केल्याशिवाय आमचे कोणतेही व्यवहार यशस्वी होणार नाहींत.

## सर्वं आत्मवशं सुखम्

हें तत्त्व आम्हां भारतवासीयांना समजलें आहे, पण उमजलें नाहीं असें आजपर्यंत अनेक वेळां अनुभवास आलें आहे. आपली उन्नति आपणच स्वतःच्या प्रयत्नानें करून घेतली पाहिजे, आणि अशा रीतीनें जी उन्नति होईल तीच खरी आणि टिकाऊ असेल. नाहीं तर १९०६ सालीं ज्या प्रमाणें विकारवश होऊन आमच्या लोकांनी अनेक संस्था काढल्या, आणि सात आठ वर्षांच्या आंतच त्या नामशेष ही झाल्या अशा संस्थांपैकीं कलकत्त्याचें नॅशनल कॉलेज ऑफ एज्युकेशन ही एक आहे. या संस्थेची भरभराट पहिल्या तीन वर्षांत झाली तेवढीच. १९१० सालापासून तिला सारखी ओहोटी लागली आहे. हें आमच्या राष्ट्रीय जागृतीचा पोकळपणा दाखविण्यास पुरेशी आहे. आमच्या स्वदेशी बँका, स्वदेशी कारखानें, स्वदेशी स्टोअर्स यांची जी वाट लागली तीच या शिक्षणाविषयक संस्थेची लागणार हें आतां इतकें स्पष्ट दिसत आहे कीं खुद्द त्या कालेजचे एक प्रोफेसर बाबू पंचानन सिंह एम. ए. बी. एल. यांनीं जाहीर विनंति पत्र काढून ती सर्वांच्या निदर्शनास आणिली आहे. आमच्या लोकांत विकारवशता वाढली आहे. तिच्या बरोबर करारीपणा, दृढनिश्चय, आत्मप्रत्यय आणि शील यांची वाढ व्हावयास पाहिजे ती मात्र झाली नाहीं तिचा हा परिणाम आहे. त्यामुळें क्षणमात्र स्वतःच्या बळाबळाचा विचार न करतां आम्ही परकीयांच्या अनुकरणानें नव्या नव्या संस्था निर्माण करतों, पण त्या नेटानें चालविण्याची शक्ति आमचें अंगीं आलेली नाहीं हें प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे. राष्ट्रीय उन्नतीचा हा पहिला धडा पुष्कळ दिवसांच्या कटु अनुभवानें आणि बव्हाचशा खर्चानें आम्हीं घेतला आहे. पण अजून हा धडा आमचे मनावर पक्का ठसेल व आम्ही जागे होऊन परिस्थितीचें सम्यक् आलोचन करून स्वतःची न्यूनता भरून काढण्याच्या उद्योगास लागलों तर शहाणे म्हणवून घेऊं. पण अजूनही आमचे लोक जागे होत नाहींत. आणी नॅशनल कॉलेज सारखी 'सर्वं आत्मवशं सुखं' या तत्त्वावर काढलेल्या संस्थेला उघड्या डोळ्यानीं आसन्न मरण झालेली पाहून आमच्या अंतःकरणास द्रव येत नाहीं ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे.

—o—

## स्पष्ट उद्गार.

म्हैसूरचे दिवाण मि० विश्वेश्वरय्या सी आय. ई. हे मोठे कर्तृत्ववान् आहेत, तसे स्पष्टवक्ते ही आहेत. यानीं आपल्या स्पष्टवक्तेपणाचा मासला ता. १४ रोजीं भरलेल्या म्हैसूरच्या कायदे कौंसिलाच्या बैठकीचे वेळीं केलेल्या भाषणांत दाखविला. इंग्रज अधिकाऱ्यांची सामान्यतः अशी समजूत झालेली दिसते कीं हिंदुस्थानांतलीं वर्तमानपत्रें अविचारानें व द्वेषानें सरकारी अधिकाऱ्यांच्या कृत्यावर टीका करतात, व म्हणून तिला आळा घालण्यासाठीं वर्तमानपत्रांची मुस्कुटदाबी करणारे अनेक कायदे त्यांनीं घाई घाईनें पास करून घेतले आहेत. मि. विश्वेश्वरअय्या यांचें मत अगदीं उलट आहे. ते म्हणतात कीं हिंदुस्थानांतल्या वर्तमानपत्रांची टीका फारच सौम्य असते. या दोन मतांपैकीं दुसरें मत सर्वांशीं सत्य आहे हें विचारी वाचकांस सांगावयास नकोच. संपादकाच्या डोक्यावर बारीकशा सुतानें टांगून ठेविलेली कायद्याची तरवार लटकत असल्यावर त्यांच्या लेखणींतून जोरदार व कडक टीका बाहेर पडणें ही असंभवनीय गोष्ट आहे. इतकीं सौम्य टीका येत असून ही सरकारी अधिकाऱ्यांचा जर संपादकांवर येवढा घुस्सा आहे, तर मि. विश्वेश्वरअय्या यांना हवी आहे तशी कडक व जोरदार कडक केल्यावर काय परिणाम होईल कोण जाणे! मि. विश्वेश्वरअय्यासारखे कडक टीकेसाठीं भुकेले असलेले दिवाण ज्या संस्थानाला सुदैवानें लाभले आहेत त्या संस्थानांतले संपादक भाग्यवान् म्हटले पाहिजेत. पण हें त्यांचें भाग्य किती दिवस टिकेल याचा नेम कोणी सांगाव?

## जेल कामिशन

ना. लॉर्ड हार्डिंज साहेब माजी व्हाइसराय लॉर्ड कर्झन याच्यासारखे कमिशन नेमण्याचे बाबतींत उद्दिष्ट नाहींत. तथापि त्यांचा विचार कांहीं प्रश्नांचा विचार करण्यासाठीं कामिशनें नेमण्याचा आहे अशी वदंता आहे. बंगाली पत्राच्या सिमला येथील बातमीदारानें म्हटलें आहे कीं तुरुंगांची सुधारणा करण्याचे बाबतींत जेल कामिशन नेमण्याचा त्यांचा विचार नक्की ठरला असून प्रांतिक सरकाराशीं या बाबतींत पत्रव्यवहार चालला आहे. हिंदुस्थानच्या तुरुंगात सुधारणा करण्याला हवी तेवढी जागा आहे. विशेषतः पोलिटिकल कैद्यांना वागविण्याची हल्लींची पद्धत अत्यंत दोषयुक्त आहे असें पुष्कळ पाश्चात्यांचें ही मत आहे. तसेंच प्रथम गुन्हेगारांना विशेषतः तरुण गुन्हेगारांना, त्याची पापकर्मापासून पराङ्मुखता होईल अशा प्रकारची स्वतंत्र व स्पेशल वागणूक तरुगांत मिळावयास पाहिजे ती हल्लींच्या व्यवस्थेंत मिळत नाहीं, तेव्हां या दोन्ही बाबतींत लवकर सुधारणा होणें अवश्य आहे. या सुधारणा ना. लॉर्ड हार्डिंज साहेब आतां जें कमिशन नेमणार आहेत त्यांच्या हातून घडून येतील तर हें कमिशन हिंदुस्थानाला हितावहच होईल अशी उमेद बाळगण्यास पुष्कळ जागा आहे.

## बैलगाड्यांत सुधारणा.

गेल्या शें दोडशें वर्षांत हिंदुस्थानांत राजकीय, सामाजिक, व धार्मिक अनेक स्थित्यंतर झालीं, आगगाड्या, सायकलीं, मोटार गाड्या आल्या, पण आमची बैलगाडी बिचारी शाहू महाराजाच्या किंवा रघोजी भोसल्याच्या वेळेस होती तशीच अद्याप आहे. तिला सुधारणा शिवली नाहीं. बैलगाडींत सुधारणा करण्यास जागा नाहीं काय? ज्याला यंत्रशास्त्राचें यत्किंचित् ज्ञान आहे, तो तरी निदान या प्रश्नाचें उत्तर 'पुष्कळ आहे' असें देईल. आम्ही त्या शास्त्रांत प्रवीण नाहीं, पण आमच्या दृष्टीला त्यांतले कित्येक ठळक दोष स्पष्ट दिसत आहेत व कोणी यंत्रशास्त्रवेत्ता कल्पक गृहस्थाने दोष काढून टाकील याच हेतूनें ते आम्ही येथें मांडीत आहों. आमच्या बैलगाडींतले मुख्य दोष चाकें व आंस यांत आहेत. सध्याच्या सुधारणायुगांत ते आमच्या ज्ञानाला कलंक लावणारे आहेत. आसा भोंवतीं चाकें असतात तीं इतकीं डगमग हल-

तात कीं त्यायोगानें गाडी सरळपणानें वंक्क न खाता चालणें अशक्यच असतें. इंग्रजी कारखान्यांतील लोखंडी धावा चाकाच्या ...हून जराशा कमीच असतात. त्यामुळे ... खराब होतात ही साधी गोष्ट अद्याप ...णाच्या कशी लक्षांत येत नाहीं याचें ...श्चर्य वाटतें. चाकाच्या ढिलेपणामुळें ...आंखावर घर्षण ज्यास्त होऊन आंख ...लोखंडी असले तरी ते लवकर झिजून ...त्याचे तुकडे पडतात. यासाठीं आंसावर ...चाकें घट्ट बसतील व तीं घटकेंत इकडे ...तर घटकेंत तिकडे अशीं वेडीवाकडी होणार नाहींत अशी योजना प्रथम करावयास पाहिजे. टांग्यांना ज्याप्रमाणें चाकें घट्ट बसविण्याची योजना असते तशी योजना बैलगाडींत करण्यास कोणती हरकत आहे? तसेंच गाडीचें जूं गाडीच्या दांड्याला दोऱ्यानीं किंवा लोखंडी सांखळ्यानीं बांधलें असतें. येथेंही अशी कांहीं योजना पाहिजे कीं तिच्या योगानें गाडीचा सगळा भार बैलाच्या मानेवर न पडतां तो दोन्ही चाकांवर सारखा वाटला जाईल. अशी योजना करणें अशक्य गोष्ट आहे असें आह्मांस वाटत नाहीं. आमचे वऱ्हाडी व खानदेशी बैल मजबूत असतात व त्यांना मानेवर जड जूं वाहण्याची सवय अंगवळणी पडलेली असते ही गोष्ट निराळी. पण या मुक्या प्राण्यांवरचें ओझें कमी करण्याची युक्ति जर काढतां येण्यासारखी असेल तर हें भूतदयेचें कृत्य करण्यास हुशार यांत्रिकानीं अवश्य पुढें यावें अशी आमची सूचना आहे. घोड्याच्या टांग्याचे निरनिराळे विलायती सुखकर नमुने गाड्या कारखानेवाल्याच्या क्याटलागांतून पाहण्यास मिळतात. ह्मणून त्या नमुन्यांवर आमच्या टांग्यातून व बग्गी व्हिक्टोरिया वगैरेंतून झपाट्यानें सुधारणा होते आहे. पण बैलगाड्यांत सुधारणा करण्याची बुद्धि ही परकीयानींच आह्मांस शिकविली पाहिजे इतके बुद्धिमंद आमचे देशबंधू खास नाहींत. आमच्या लोकांत यंत्रशास्त्राचें ज्ञान असलेले थोडे लोक आहेत खरे; पण त्यानीं आपल्या ज्ञानाचा व बुद्धिप्रभावाचा व कल्पकतेचा ओघ साध्या दिसणाऱ्या पण व्यवहारांत पदोपदीं नडणाऱ्या अडचणीकडे वळविला तर या सुधारणेला फारसा काळ लागणार नाहीं, अशी आमची खात्री आहे.

---

## आमचें वळणच असें.

संयुक्त भांडवलानें अथवा संयुक्त प्रयत्नानें एखादें सार्वजानिक कार्य करण्याचें वळण अद्यापही आह्मां लोकांस लागलें नाहीं या गोष्टीचें तारें प्रत्यंतर पाहणें असेल तर विलायतेस डेप्युटेशन पाठविण्याच्या संबंधांत कांग्रेसच्या दोघा जनरल सेक्रेटरींनीं स्वीकारलेला मार्ग पहा ह्मणजे झालें. राष्ट्रीय सभेचे दोघेही जनरल सेक्रेटरी ना. नबाब सय्यद महंमद व मि. एन. सुब्बराव पंतुलु मद्रास येथलेच आहेत. दोघेही खऱ्या कळकळीचे, देशहितचिंतक आणि निरपेक्ष रीतीनें देशहितार्थ झटणारे आहेत याबद्दल वाद नाहीं. असें असतां सध्या विलायतेंत आयरिश होमरूलासंबंधानें धमधक्की सुरू असतांना तिकडे कांग्रेसनें डेप्युटेशन पाठविणें हिताचें होईल कीं नाहीं याबद्दल देशांतल्या पुढाऱ्यांचीं मतें विचारण्याबद्दलचीं पत्रेंसुद्धां या दोघां सेक्रेटरींनीं एकविचारें दोघांच्या सह्यांचीं न लिहितां निरनिराळीं लिहिलीं! आणि याचा परिणाम असा झाला कीं दोघाना आलेल्या जबाबांवरून त्यानीं जो निष्कर्ष आपापल्या बुद्धीनें काढला तो उत्तरदक्षिणध्रुवाइतका भिन्न होता! डेप्युटेशन पाठविण्याला सध्याची वेळ फार सोईची आहे असें नबाबसाहेबांचें मत झालें व सध्या तें मुळींच पाठवूं नये असें मि. सुब्बराव ह्मणतात! खुद्द राष्ट्रीयसभेचा कारभार हा अशा प्रकारचा, मग इतर संस्थासंबंधानें कशाला बोलावयास पाहिजे? या दोघां गृहस्थांच्या जागीं दोघे युरोपियन सेक्रेटरी असते तर त्यांनी असा स्वतंत्र कारभार मुळींच केला नसता. दोघा सेक्रेटरींनी परस्परांना भेटून दोघांच्या सह्यानिशीं पत्रें पाठविलीं असतीं. युरोपियन लोकांची भाषा, पोषाखाच्या पद्धति, व त्यांच्या संस्था यांची आह्मी कितीही नकल केली तरी त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीचें रहस्य आमच्या लोकांनीं अद्याप उचललें नाहीं यांत संशय नाहीं. तें आह्मी उचलूं आणि संयुक्त प्रयत्नानीं काम करण्याचें वळण आह्मास लागेल तो दिवस खऱ्या सुधारणेचा ह्मणतां येईल, पण हा सुदिन दुर्दैवानें दूर आहे असें दिसतें. कांग्रेसच्या सेक्रेटरींनीं नावें ठेवण्याचा किंवा त्या संस्थेच्या कामांत छिद्रान्वेषण करण्याचा आमचा बिलकूल हेतु नाहीं. कांग्रेसचें डेप्युटेशन विलायतेला जाईल व जें काय करावयाचें तें उत्तम प्रकारें करील, ईश्वर कृपेनें सर्व कांहीं गोष्टी यथास्थित व्हाव्या अशी आमची इच्छा आहे. आह्मांला दाखवावयाचें तें येवढेंच कीं पाश्चात्यांपासून आह्मांला अद्याप पुष्कळ गोष्टी शिकावयाच्या आहेत, आणि त्यांतली मुख्य गोष्ट संयुक्त प्रयत्न ही आहे. हिच्या अभावीं आमचे राजकीय, सामाजिक, औद्योगिक सर्वच उन्नतीचे प्रयत्न निष्फळ होत असलेले दिसत असून हीं अद्याप आमचे डोळे उघडत नाहीं, आणि अद्याप आह्मी आमचें जुनें वळण सोडण्यास तयार नाहीं.

---

## कलकत्त्यांतलें साहित्य संमेलन

खरें साहित्यविषयक प्रेम आज बंगालमध्यें दिसत आहे तसें हिंदुस्थानच्या कोणत्याही प्रांतांत आढळत नाहीं. तिकडे जिल्हानिहाय साहित्य संमेलनें भरूं लागलीं आहेत, आणि या संमेलनांना दुरून येणाऱ्या प्रतिनिधींची ही संख्या मोठी असते. तसेंच इतर प्रगतीप्रमाणें साहित्याची प्रगती ही सरकारी अधिकाऱ्यांशीं सलोखा ठेवून ते लोक करीत आहेत. गेल्या आठवड्यांत कलकत्त्यास भरलेल्या साहित्य संमेलनाला तेथील गव्हर्नर ना. लॉर्ड कारमायकेल स्वतः हजर होते व त्यानीं प्रोत्साहनपर भाषणही केलें. फ्रेंच अक्याडमी सारख्या पाश्चात्य साहित्यविषयक संस्थाप्रमाणें कलकत्त्याच्या साहित्यसंमेलनाचे वेळीं इतिहास, भौतिक शास्त्रें, काव्य, वगैरे निरनिराळ्या शाखांच्या निरनिराळ्या बैठकी होऊन त्यांत त्या त्या विषयांचा ऊहापोह झाला. आमच्या इकडे हा प्रघात सुरू करण्यास अद्याप पुष्कळ अवकाश आहे. प्रत्येक जिल्ह्यांत राहो, पण मुंबई, महाराष्ट्र, वऱ्हाड व नागपूर व देशी महाराष्ट्रीय संस्थानें या सर्वांचें संमेलन वर्षांतून एकदा भरविणें मुंबईकरासारख्यांच्या जिवावर यावें याहून अधिक शोचनीय प्रकार कोठें असेल काय?

---

## अनाथालयें व ख्रिस्ती मिशनरी.

ता. २१ मार्च रोजीं लखनौ येथें भरलेल्या संयुक्त प्रांताच्या कायदे कौंसिलाच्या बैठकींत रायसाहेब शंकर सहाय यांनीं असा प्रश्न विचारला होता कीं हमीरपूर जिल्ह्यातल्या एका गांवच्या दोघा अनाथांना तेथील म्याजिस्ट्रेटानें हिंदुअनाथालयांत न पाठवितां ख्रिस्ती अनाथालयांत पाठविलें ही गोष्ट खरी आहे काय? या प्रश्नाचें उत्तर देतांना सरकारी अधिकाऱ्यांनीं सांगितलें कीं त्या जिल्ह्यांत हिंदु अनाथालय नव्हतें ख्रिस्ती मिशनरीच्या अनाथालयांत पाठविलें बरबर पाहणारास हें उत्तर समाधान कारक वाटेल. हिंदुंना आपल्या जातभाईनीं धर्मांतर करूं नये असें वाटत असेल तर ख्रिस्ती मिशनरी प्रमाणें त्यांनींही अनाथालयें उघडावीं. आपण स्वतःही अशीं अनाथगृहें उघडावयाचीं नाहींत आणि त्याच्या अभावीं सरकारी अधिकाऱ्यानीं दयार्द्र दृष्टीनें व सद्धेतुपूर्वक अनाथांना ख्रिस्ती मिशनरीच्या स्वाधीन केलें तर त्याबद्दल त्यांना दोष द्यावयाचा, हें कोणीही सूज्ञ व विचारी माणूस रास्त समजणार नाहीं. तेव्हां या दृष्टीनें सरकारी अधिकाऱ्यांनीं जें केलें तें योग्यच केलें असें ह्मणतां येईल पण येथें प्रश्न येवढाच आहे कीं हा केवळ प्राणरक्षणाचाच प्रश्न नाहीं, धर्मरक्षणाचाही आहे. हिंदुधर्मांतून ख्रिस्ती धर्मांत गेले त्यांना परत हिंदुधर्मांत येण्यास राजमार्ग असतां तर गोष्ट निराळी होती. पण तसा प्रकार नाहीं अर्थात ख्रिस्ती मिशनरींच्या स्वाधीन दोघां हिंदुअनाथांना करण्यापूर्वीं त्या जिल्ह्यांत हिंदुअनाथालयें नसलीं तर पर जिल्ह्यांत तरी कोठें आहेत कीं नाहींत व असल्यास तेथें या दोघांची सोय करणें शक्य होतें कीं नाहीं हें तेथील जिल्हाधिकाऱ्यांनीं पाहणें जरूर होतें. सरकारी अधिकाऱ्यांचें वर्तन भूतदयनें प्रेरित होतें यांत शंका नाहीं पण धर्मविचाराच्या दृष्टीनें तें दुषणीय झालें. यापुढें तरी असा प्रकार पुनः घडणार नाहीं याविषयीं सरकारानें आपल्या अधिकाऱ्यांना योग्य ताकीद करणें जरूर आहे असें आह्मांस वाटतें. ख्रिस्ती मिशनरींविषयीं आमची बिलकूल तक्रार नाहीं. ते करीत आहेत तें काम फार उदारपणाचें, पुण्यकारक, आणि प्रशंसनीय आहे. पण लोकांचा धर्म, आचार विचार व समजुती यांनाही धक्का न बसेल असें वर्तन ठेवणें हें सरकारी अधिकाऱ्यांचें अवश्य कर्तव्य आहे.

---

## वऱ्हाडवृत्त

**हवामानः**—हल्लीं बरेंच कडक ऊन प... असून ऊष्ण वारे वहाण्यास सुरवात झ... आहे. दिवसांतून कांहीं वेळ हवा अ... कुंद होते त्यावेळीं अतिशय उष्मा हे... वऱ्हाडांतल्या खऱ्या उन्हाळ्यास प्र... झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ... राई विशेष नाहीं.

**गैरसोय**—सध्यां येथील जिल्हा ... व त्यांच्या ताब्यांतील इतर दिवाणी ... यांमधून ज्या पक्षकारांचीं कामें अस... त्यांना अशा कडक उन्हाळ्याच्या दिव... उन्हांत झाडाखालीं बसावें लागतें, ... त्यांची या बाबतींत फार हालअपेष्टा ... या गोष्टीकडे आमचे दयाळू डि... जज्ज रा० ब० ठाकूरसाहेब पूर्ण ... पुरवितील असा आह्मांस मोठा भ... आहे.

**अध वृत्ती**—न्यायदेवतेचा पुतळा ... रतात तेव्हां तिचे डोळे बांधलेले ... दाखवितात. त्या प्रमाणें आमच्या नाम... हायकोर्टाचे डोळे वऱ्हाडांतील उन्हाळ्या... खऱ्या स्वरूपा संबंधानें मुद्दाम बांध... आहेत असे दिसतें. दिवाणी कोर्टांना ... उन्हाळ्याची सुट्टी देतात तिला प्रारंभ ... मेपासून सुरू करण्याची वहिवाट ... १९०९ पासून जी पडली आहे ती ... दळण्याचें कारण इतक्या वर्षांत दि... येऊ नये याचें आश्चर्य वाटतें.

**धन्यवाद**—रा० सा० केशव मो... दामले, हायकोर्ट वकील, आकोला, य... आपल्या पब्लिक् प्रॉसिक्युटरचे जा... दिलेला राजिनामा पुढील महिन्याप... मंजूर करण्यांत आला आहे. हें सर... काम रावसाहेबांनीं फार उत्कृष्टपणें ब... असें सर्व अधिकारी ह्मणत असतात. आणि हा धन्यवाद त्यांची विद्वत्ता, ... व परिश्रम यांना अनुरूपच आहे.

रा. रा. सोराबजी दादाभाई काम... ए. एल. एल. बी. वकील, अ... यांस पश्चिम वऱ्हाडकरितां ... प्रॉसिक्यूटर नेमण्यांत आलें आहे. त्याच्या बढती बद्दल आह्मी त्यांचें ... नंदन करितों.

**अभिनंदनः**—आमच्या येथील म्यु... पालिटीच्या व्यवस्थापकांनीं नदीचें घाण ... तत्काळ काढून टाकिलें व आता दोन्ही ... कटांमध्यें चांगल्या पाण्याचा पुरवठ... असून नदीवर बंदोबस्तही कडक ... आहे. या शिवाय पिण्याचे पाणी ... कापशी येथील व्यवस्था अधिक समंते... ठेवण्यांत आली आहे. याशिवाय ... म्युनिसिपालिटी लखलखीत ग्यासचे ... शहरभर देण्याची खटपट करित ... सर्वां बद्दल आह्मी आमच्या म्युनि... टीचें अभिनंदन करितों.

रा. रा. सी, सी. चिथाम आसिस्टं... सुपरिंटेंडेंट यांस नागपुराहून ... येथें जिल्हा सुपरिंटेंडेंट करण्यांत आ...

उमरावतीचें ऑनररी मॅजिस्ट्रे... वर्ग २ यांस क्रिमिनल प्रोसीजर ... कलम ५६२ प्रमाणें पहिल्या ... शिक्षेची माफी देण्याचा अधिका...

आला आहे. या अधिकाराच्या दानाला उमरावतीचे बेंच असें सत्पात्र ठरलें तशीं वऱ्हाडांतील इतर बेंचेही लवकरच आदरणीय ठरतील असा आह्मांस भरंवसा आहे.

वनितारुग्णालयः—पश्चिम वऱ्हाडा करितां आकोल्यास ही संस्था लवकरच उभारण्यांत येईल अशी आह्मांस आतां बळकट उमेद वाटत आहे. या सार्वजनिक कामानिमित्त आमचे कमिशनर साहेब रा० स्टॅंडन व डेप्युटी कमिशनर रा० देवर हे फार परिश्रम घेत आहेत आणि वर्गण्या गोळा करण्याचें काम झपाट्यानें चालूं आहे. तेव्हां अशा सार्वजनिक कार्याला आमचे उदार धनिक लोक मनोभावानें हातभार लावतील आणि ज्यांनीं ज्यांनीं आकोल्यास नळाचे पाणी आणण्यासंबंधानें वर्गणीचे आंकडे पूर्वीच घातलेले आहेत त्यांच्या त्या रकमा याच कामाकडे वळत्या करून घेण्याचा संकल्प पूर्वीच ठरलेला आहे. श्री दानशूर मंडळी या संस्थेला मोठमोठ्या रकमा देतील त्यांच्या इच्छे प्रमाणें दवाखान्यांतील मुख्य मुख्य भागाला निरनिराळीं नांवें देण्याचाही सन्मान त्यांस मिळावा अशी योजना होणार आहे ही गोष्ट आह्मी येथें मुद्दाम सुचवून ठेवितों.

रा. रा. लुगार्ड साहेब, एक्झिक्युटिव्ह एंजिनेयर, उमरावती, हे लवकरच मोठ्या रजेवर विलायतेस जाणार आहेत. आणि त्यांच्या जागीं सध्यां रा. रा. सरकार हे एक्झिक्युटिव्ह एंजिनियर होतील असें कळतें.

राजापूरकर संगीत मंडळीचे पुंडलीक, संततुकाराम, कुमुदचंपा, हे खेळ विशेष लोकप्रिय आहेत. या नाटक कंपनीच्या अंतरंगापेक्षा बाह्यरंग विशेष प्रेक्षणीय आहे.

नागपूर येथील ॲग्रिकल्चरल कॉलेज मधील शेवटच्या परिक्षेंत खालील बारा उमेदवार पसार झाले आहेत व त्यांस शेतकी खात्याची डिग्री देण्यांत आली आहे. अनुक्रमानें त्यांची नामावळी येणेंप्रमाणें आहे:—

१ रा. रा. के. सुब्रह्मण्यं पिले
२ " लक्ष्मण वासुदेव घाटे
३ " रामदीन कमलप्रसाद
४ " इब्राहमजी शेखदाऊद
५ " एन्. नारायण थंबी
६ " करतारसिंग
७ " संगिनेनी हनुमंत
८ " चुनिलाल गोपाळदास शहा
९ " जोगेशचंद्र रॉय
१० " गोपाळ बाबूराव देशमुख
११ " अनंत हरी बर्डे
१२ " शारदा प्रसाद ठक्क

रा. रा. रघुनाथदास प्रॉसिक्युटिंग इन्स्पेक्टर बुलडाणा यांस हक्काची रजा देऊन यांचे जागीं रा. रा. गोविंद शंकर सब-इन्स्पेक्टर, बुलडाणा यांस नेमण्यांत आलें.

रा. रा. वामनराव साठे प्रॉसिक्युटिंग इन्स्पेक्टर, आकोला यांस हक्काची रजा देण्यांत आले असून त्यांचे जागीं रा० रा० वामनराव जोशी सबइन्स्पेक्टर यांस नेमण्यांत आलें.

रा० रा० गझनफरअली शहा सर्कल इन्स्पेक्टर, उमरावती यांस सहा आठवड्यांची हक्काची रजा देण्यांत येऊन त्यांचे जागीं रा० रा० नजालुद्दीन सबइन्स्पेक्टर यांस नेमण्यांत आलें.

"पत्रिका" या ज्योतिषसंबंधीं मासिकाची पुरवणी आमचे अंकासोबत वाटण्यांत येत आहे.

रावसाहेब के. व्ही. ब्रह्म हायकोर्ट वकील यांची उमरावती म्युनिसिपाल सभासदांच्या गेल्या निवडणुकीचे वेळीं बहुमतानें निवडणूक झाली नाहीं खरी पण स्थानिक वातावरणाकडे लक्ष देऊन व या गृहस्थाची कामगिरी ओळखून आतां त्यांस सरकारतर्फेंचे मेंबर नेमण्यांत आलें आहे हें कळविण्यास विशेष आनंद वाटतो.

पुण्याचे प्रसिद्ध राष्ट्रभक्त रा. रा. धोंडो केशव कर्वे यांच्या अनाथ बालिकाश्रमाचा व महिला विद्यालयाचा गतवर्षीचा रिपोर्ट आह्माकडे आला आहे. त्यावरून पहातां या दोन्ही संस्था उत्तरोत्तर लोकांस आवडूं लागल्या आहेत हें कळविण्यास आनंद वाटतो.

---

रा० रा० विनायक राजाराम दिक्षित, बॅरिस्टर अट लॉ, नागपूर यांस गेल्या गुरुवारीं काळपुळीच्या आजारानें देवाज्ञा झाली. हें कळविण्यास फार दुःख वाटतें. याच्या मरणानें ऐन चाळिशीतल्या वयाचा एक तरुण विद्वान गृहस्थ नाहींसा झाला ही त्यांच्या आप्तमित्राची व वृद्ध मातापित्याची व तशीच समाजाची मोठी हानि होय. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो!

---

## पत्र व्यवहार

### अनाथ बालिकाश्रम फंड

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

सा. न. वि. वि. आश्रमास मदत मागणें करितां मी बुलढाणेस गेलेवर माझे बालपणचे मित्र रा. पी. एल. दामले M. A. LL. B. वकील यांनीं मला वर्गणीचे कामीं फारफार मदत केली मी रा० दामले यांचा फार आभारी आहे.

#### इमारत फंडा करितां

| | |
|---|---|
| श्रीमती सौ. मिसेस के व्ही. अठार | ९० |
| रा० सा. एन. आर. भट. | २५ |
| मि० व्ही. के. गर्दे | २५ |
| " पी. एल. दामले | २५ |
| " ए. आर. पींपरीकर | २० |
| रावबहादुर एम्. एस्. बापट | १० |
| मि० आर. ए. कानिटकर | १० |
| शेट अमोलकचंद | १० |
| बनशीलाल | १० |
| रा. के. जी. वैद्य | ५ |
| रा. सा. ए. एस. साठे | ५ |
| मि. व्य. आर. मधोळकर | ५ |
| "एस्. जी. देशपांडे | ५ |
| मेसर्स क्षीरसागर | ५ |
| मि० धोपेश्वरकर | ५ |
| " X | ५ |
| मि. देशपांडे | ४ |
| मि. घाणेकर | ३ |
| " चवधरी | २ |
| रा. सा. फरासखानवाला | २ |
| | २३२ |

#### वार्षिक वर्गणी

| | रु. |
|---|---|
| मि. व्ही. के. गर्दे | १२ |
| " पी. एल. दामले | १२ |
| " कानिटकर | ६ |
| रा. व्य. आर मुधोळकर | ६ |
| " ए. आर. पिंपरीकर | ५ |
| शेट अमोलकचंद | ५ |
| " बनशीलाल | ५ |
| मि. धोपेश्वरकर | ३ |
| " क्षिरसागर | २ |
| " देशपांडे | २ |
| रा. सा. काळे | २ |
| श्रीमती सभामाया दुबे | २ |
| मि. देशपांडे | २ |
| | ६४ |

एकूण २९६ रु०

**आकोला**

| | |
|---|---|
| मि. श्रीराम मुरजमल | ५ |

**मनमाड**

| | |
|---|---|
| मि. द. वि. सपरे | १ |

**मलकापूर**

| | |
|---|---|
| मि. डी. व्ही. गोखले | २ |

चिखली व मेहेकर वगैरेची बाकीची पोंच पुढें पाठवून देईन क. हे. वि.

बुलढाणें ता. २२-४ १९१४ इ.

केशव मोरेश्वर फडके लाईफ वर्कर अनाथबालिकाश्रम

---

## नोटीस

नोटीस कलम ११ एक्ट ८ सन १८९० प्रमाणें.

किरकोळ मुकदमा नंबर १९ सन १९१४ इ०

विद्यमान डि. जज साहेब याचें कोर्ट मुक्काम आकोला

नाव सैयद अबजल उर्फ सैयद आजो
बापाचें नांव—सयदमीर अजम
जात मुसलमान राहणार मोताळा
तहसील मलकापूर जिल्हे बुलढाणा
ज्या अल्पवयी सयद अबदुलरहीम उमर वर्षे अदाज १०
राहणार गंगाजी ता नवाबाजार तहसिलीचे (२)
जिस्त्रा केष्टा साठीं पालन कर्ता (१)
नेमण्या विषयींच्या अर्जा संबंधीं (३)

सर्वत्र लोकास यास सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचें (२) स्वतः व त्याची मालमत्ता साठीं पालन कर्ता ४ नेमण्या विषयीं अर्ज केल्यावरून सदर्हू अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख १७ माहे ६ सन १९१४ ई० रोजीं नेमिली आहे, त्या वरून अशी नोटीस देण्यात येत आहे कीं सदर्हू अर्जदाराच्या अर्जा बद्दल जर कोणास काहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालाचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल अशा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हाजर झाले पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास' त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल.

आज तारीख २३ माहे ४ सन १९१४ ई० रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्यानिशीं दिली.

शिक्का G. W. Bapat
A. D. J.
for
डि. जज. आकोला

नो. नं० २४

---

## नोटीस

नोटीस कलम ११ एक्ट ८ सन १८९० प्रमाणें.

किरकोळ मुकदमा नंबर २९ सन १९१४ ई

विद्यमान डि जज साहेब यांचें कोर्ट

मुक्काम आकोला

नांव जुगलदास
बापाचें नांव मिवराज
जात मारवाडी राहणार रायपूर
तहसील चिखली जिल्हे बुलढाणा
ज्या अल्पवयी मोतिलाल तनसुखदास उमर वर्षे १२
राहणार रायपूर ता चिखली तहसिलीचे (२)
साठीं पालन कर्ता (१)
नेमण्या विषयींच्या अर्जा संबंधीं (३)

सर्वत्र लोकांस यांस सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचें (२) स्वतः व त्याची मालमत्ता साठीं पालन कर्ता (४) नेमण्या विषयीं अर्ज केल्या वरून सदर्हू अर्जाची सुनावणी व चौकशी ची तारीख ११ माहे ५ सन १९१४ ई० रोजीं नेमिली आहे, त्यावरून अशी नोटीस देण्यात येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर कोणास काहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जा संबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल अशा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हाजर झाले पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल.

आज तारीख २३ माहे ४ सन १९१४ ई० रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्यानिशीं दिली.

शिक्का G. W. Bapat
A. D. J.
for
डि. जज. आकोला

नो. नं. २५

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं माझा बाप नामे पुंजाजी वा। रावोजी कुणबी राऊत रा. मौजे तोरनाळ ता. मंगरुळपिर जी० आकोला यांस खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं वर लिहिले माझ्या बापा पासून कोणी कोणते प्रकारे खरेदी गहाण बक्षीस वगैरे ईस्टेट लिहून घेऊ नये त्याचे पासून कोणतेही प्रकारे ईस्टेट लिहून घेतली तर ती रद समजली जाईल करितां सर्वत्र लोकांस जाहिर केले आहे कळावे ता। १४-४-१४ ई॥ द० नारायण रामासा महाजन मानोरा

सही

सोनबा पुंनाजी कुणबी राऊत रा. मौजे तोरनाळ निं. खु.

नो. नं. ११

## नोटीस

नोटीस बेशमी पुंनाजी वा। रावोजी जात कुणबी आडनांव राऊत रा. मौजे तोरनाळ ता. मंगरुळपिर जी० आकोला यांस खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं मला दत्तक ता. २९ माहे आगष्ट सन १९१२ ईसवी घेतले आहे त्यावरुन तुझे पाशी शेते वगैरे जागा आणि सर्व ईस्टेटीचा मी मालक आहे तूं चांगले लोकाचे संगतीनें वागत नसून वाईट लोकांचे सांगण्या प्रमाणें वागतो तर त्वां कोणते प्रकारे शेते व जागा कींवा ईस्टेट कोणास खरेदी गहाण व बक्षीस वगैरे कोणते प्रकारे लिहून देऊं नये दिल्यास ती रद समजली जाईल कळावे ता। १४-४ १४ ई द. नारायण रामासा महाजन मानोरा

सही

सोनबा वा। पुंजाजी कुणबी रा० तोरनाळ नि. खु.

नो. नं. १२

## नोटीस

अबदुलवाहेद व अबदुलकादर मुसल्मान रा० वडनेरगंगाई ता० दर्यापूर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येते कीं मी तुह्मास लायक समजून माझेतर्फे कुलमुखत्यारपत्र दिलें होतें. परंतु तुह्मी मजला पूर्वी वेडे आहा असे बद्दल नोटीस दिली होती. परंतु मी पूर्वीपासूनच चांगला शुद्धीत असून व्यवहार करीत आहे करिता तुह्माला या नोटिशीनें कळविण्यात येते कीं माझे पसंतीप्रमाणें किंवा ह्मणण्याप्रमाणें व्यवस्था ठेवीत नाहीं बद्दल मी तुमचे कुलमुखत्यारपत्र आज तारखेपासून रद केलें आहे. यापुढें तुह्मी माझे इस्टेटीसंबंधीं कोणताही व्यवहार केल्यास तो रद समजला जाईल ही नोटीस दिली ता० १६-४-१९१४ ई०

दस्तुर देवीदास जैराम देशपांडे पी. रा. आकोट

सही

अबदुल शेखमलंग इनामदार

नो० न० १६

## नोटीस.

जाहिर नोटीस सर्व लोकांस खाली लिहीलेले सह्या करणार यांजकडून देण्यांत येते कीं मैत नरसू वा। विठोबा दाते जात माळी रा० माळठान बु॥ ता० आकोट हा मैत होण्यास अजमास एक महिना झाला असून त्याला पुत्र आणि कन्या नाहीं फक्त विधवा त्याची बायको लक्ष्मी ही आहे मैताचे कबज्यांतील स्थावर जंगम मीळकत वीधवेच्या कबज्यास वारस या नात्यानीं आली आहे मैताची इस्टेट ही स्वसंपादीत नसून वडिलोपार्जीत आहे वीधवेस अन्न वस्त्राशिवाय अधीकार नसून इस्टेटीची अफरातफर खरेदी किंवा गहाण वगैरे देण्यांत कोणतेहि प्रकारे अधीकार नाहीं. करितां सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं मैताचे आह्मी चुलत चुलत भाऊ असून त्या संबंधानें आह्मी मैताचे इस्टेटीचे अधिकारी हक्कदार आहोत या प्रमाणें मैताचे वीधवेपासून मैताची इस्टेट कोणी गहाण किंवा खरेदी घेऊं नये याजवर दुर्लक्ष करुन घेतल्यास मीळकतीच्या मोबदल्याची रक्कम त्याचा बोझ्या मैताचे मीळकतीवर बसणार नाहीं कळावे ता० १०-४-१४

सह्या

किसन्या वा। पुंनाजी दाते जात माळी रा० कसबे अडगांव नि० खु०

सोनाजी वा। विठोबा दाते जात माळी रा० अडगांव नि० खु०

नो. नं. १४

## नोटीस

नोटीस बेशमी सेख हिदु वल्लद जानमहमद मु॥ रा. जामोद तालुके जळगांव

यांसः—

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं. माझी मुलगी गंव्हरबी इच्याशीं तुमचे लग्न होण्यास ९ वर्षे झाली. लग्न झाल्यावर २।३ महिने तुमचे येथें होती. नंतर तिजला मी आपले येथें आणली. ती दोन अडीच वर्षे माझे येथेंच होती. तुह्मीं तिची वास्तपुस्त तुह्मी कांहीं केली नाहीं. अडीच वर्षा नंतर तुह्मी तिजला नेण्याकारितां. तुमचा भाऊ सेख करीम व दुसरा इसम सेख अबदुला यांस पाठविलें त्याचे बरोबर तिजला तुमचे येथें पाठविली ती तुमचे येथें दीड महिना राहून नंतर तुह्मी तिजला माझेकडे पुन्हां पोंचाविले. त्यास आज २॥ वर्षे झाली तेव्हांपासून माझ घरी तुमची बायको आहे. मी गरीब मनुष्य आहे तुमची बायको शहाणी झाली असून तुह्मी तिजला वागवीत नाहीं. तिचे अन्नवस्त्राकारितां मी लोकांचे कर्ज काढले आहे तुह्मास नोटीशीनें कळवितोंकीं ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत तिचे पांच ५ वर्षांचे खावटीबद्दल ३७५ रुपये कर्ज काढलेले देऊन तिजला आपलें घरीं घेऊन जावे ती आपलें येथें नांदण्यास कबुल आहे याप्रमाणें वरील मुदतींत न कराल तर हीच नोटीस फारकत समजून ती माझी मुलगी दुसरा घरठाव करील. व खावटीच्या पैशाबद्दल योग्य कोर्टांत तुमच्यावर दावा करुन खर्चासुद्धां सर्व रुपये वसूल करील. व या नोटीशीचा खर्च तुमच्यावर बसेल कळावें तारीख २० ४-१४ इसवी

सही

बिलनखा वल्लद तुराबखा मु॥ राहणार दहिहांडा नि. खु. हातची असे

नो. नं. १९

## नोटीस

रा. रा. रघुनाथ वा। हरि पुरुषोत्तम व पुरुषोत्तम जैराम सोनार राहणार जानेफळ ता. मेहकर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी जानेफळ येथील जागा ७।८ वर्षांपूर्वी गंगाराम व. बाळाजी जाधव रा. जानेफळ यांजपासून रक्कम रुपये ४५ सांत घरे लिहून खरेदीखत करुन घेतले आहे ह्मणजे हल्लीं ज्यांत तुह्मी राहात आहात ती जागा मी त्या ठिकाणी राहत नसल्यामुळें ती जागा तुह्मी मजपासुन घर करुन राहण्याचे हेतुनें घतली. व जेव्हां तुह्मी मागाल तेव्हां देण्याचें वचन दिले होते हल्लीं मजला जरुर लागल्यामुळें दोन तिन वेळां मागणी केली परंतु काहींच बोलत नाहींत करितां नोटीस पावलेल्या दिवसापासून आठ दिवसाचे आंत सदर्हू जागा माझे ताब्यांत द्यावी न दिल्यास कोर्ट मार्फत खर्चासह पैसे व ताबा घेतला जाईल.

२ त्याच प्रमाणें मौजे जानेफळ येथील शे स. नं. १०७ आणि ११६ यांतील प्रत्येकीं ९ आणे ४ पैचा हिस्सा आपण एकत्र असतां खरेदी घेतली आहे ह्मणजे पुरुषोत्तम व नारायण आणि रघु व बाळाजी असे मिळून खरेदी घेतली तुह्मी नादार असलेमुळें तुमचा पुतण्या हरी पुरुषोत्तम याचे नावानें खरेदीखत करुन घतले आहे खरेदीखत करुन घेतले दिवसापासून सदर्हू शेते एकत्र असून त्याजबद्दल हिस्से रसी प्रमाण कांहीं स्वामित्व देत आले हल्लीं स्वामित्वाचा मागणी केली परंतु एक दोन वर्षांत काहींच मिळाले नाहीं सबब सदर्हू शेते वाटून घ्यांव वाटून न दिल्यास वरीलप्रमाणें दावा करुन कोर्ट खर्चासह व नुकसानीसह भरुन घेऊं कळावें तारीख १९.४ १४ इ.

सही

नारायण जैराम सोनार रा० सावरगांव हल्लीं मु. आकोला

नो. नं. १६ द० खु०

## नोटीस

नोटीस लक्षमण वा। सदाशिव आपा वाणी खडतकर रा० कसबे गिरोली ता० मंगरुळपीर जी० आकोला यांस—

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तूं माझा आजा आहे तुला संतती नाहीं. मी तुझा वारस सर्व प्रकारे सेतिचा व जिंदगीचा वारस आहे. तुझेवर कर्ज कोणतेच नाहीं. जरी तुझे पासी मौजे हळद प्र० गिरोली ता० मंगरुळपिर जी० आकोला येथील सेत सरवई नंबर ४ हे किंमत रुपये २००० दोन हजारचा आहे आणि जागा गिरोली येथील माळोद वगैरे जनावरे मु॥ डागीनें मु॥ ईस्टेट रुपये एक हजारची जिंदगी आहे तूं वरील ईस्टेट सकाराम वा। रघुआपा सेटे रा० गिरोली व चंद्री मर्द सखाराम रा० गिरोली यांस खरेदी बक्षीस लिहून देणार तर त्वां कोणास कोणते प्रकारे खरेदी बक्षीस गहाण किंवा कोणते प्रकारे वरील मिळकत लिहून देऊं नये. दिल्यास ती रद्दी समजले जाईल. माझे संमतिनें कोणते ही काम करावे. मी तुझा नातु वारस आहो. जरी तूं कोणास ईस्टेट शेत वगैरे लिहून दिले तर तें पोकळ समजले जाईल. तुझे वय ९० नवद वर्षांचे झाले आतां फार आशक्त झाले. ह्मणून नोटीसीनें कळवीतों कीं वरील ईस्टेटीची आफरातफर त्वा करुं नये. करितां ही नोटीस दिली सही ता। ७-४-१४ ई. द० नारायण रामासा महाजन मानोरा

सही

रामचंद्र बळीराम वाणी खडतकर राहणार गिरोली द० खु०

नो० नं० १७

## नोटीस

नोटीस बेशमी तुळसी मर्द गणाजी जात कुणबी टाकरे रा. लोहारी बु. ता. आकोट ईनका

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचेवर आह्मी आकोला येथील वि. जु. मु. साहेब यांचे कोर्टांत खाली लिहिलेले शेताचे ताब्या बद्दल दि. मु. नंबर ५०६ सन १९०९ चा दावा केला असतां त्याचा निकाल ता. ८-१२-१० ई. रोजी माझे वतीनें झाला त्याजवर तुह्मी वि. आ. डी. जज्जसाहेब आकोला याचे कोर्टांत दि. आ. नंबर ४१-११ ची केली असतां त्यांत शेत माझे मालकीचे आहे असा ठराव कायम ता. ४-१-१४ रोजी झाला पुनः तुह्मी त्या ठरावावर हायकोर्ट नागपूर येथें दि. आ. नंबर ६० सन १९१२ ची आपील केली त्यात मालकीचा वरील ठराव कायम राहून त्याचा निकाल ता. १०-६-१३ ईसवी रोजी आमचे तर्फे झाला. हल्लीं तुह्मास या नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं मौजे पिंपरी जैनपूर ता. आकोट येथील शेत स. नंबर ८ यांतील १ हिस्सा पश्चीमकडील तुमचे ताब्यांत असलेला तो हिस्सा पिकासह च्यार महिन्यांत ह्मणजे आगष्ट ता. ११ सन १९१४ पावेतो आमचे ताब्यांत देऊन आमची पावती घ्यावी, याप्रमाणें आपण वर्तन न केल्यास आह्मी तुमचेवर योग्य कोर्टांत दावा करु ताबा व पिकाची नुकसानी घेण्यांत येईल विनाकारण खर्चांत पडणे बरोबर नाहीं सबब मुदाम नोटीसीनें जाहिर केले आहे. कळावे ता. १६-४-१४

सही

चांनकाजी वा। डुमनाजी पाटील रा. पिंपरी जैनपूर द. खु.

नो. नं. १८

**तांबूल नवरत्न** — न कत्थेकी परवा न चुनेसे काम, हमारे मसालेका सबको सकाम. पानाच्या विड्यांत खाण्याचा उत्तम मसाला. चुना व काथाची जरूर नाहीं. किंमत डबीस सहा आणे.

**नवरत्न टेबलेट** — उत्तम सुवासिक अत्तराच्या वड्या. किंमत डबीस तीन आणे.

**नवरत्न तमाखु** — पानांत खाण्याची केशर, कस्तुरी इत्यादि सुवासिक वस्तु मिश्रित तमाखु. किंमत दर तोळ्यास दीड आणा.

**मद्रासी नस** — अति उत्तम सुवासिक नप. मेंदूवर खास गुणकारी. बाटलीस चार आणे

**गजकर्णाचें मलम** — गजकर्णावर उत्तम औषध. डबीस चार आणे.

**केश काढण्याचें तेल** — केश काढण्याचा उत्तम इलाज. किंमत सीसीस अडीच आणे.

**चन्द्रकात बाम** — मेंदूला व डोक्याला अति उपयोगी. सीसीस किंमत आठ आणे.

बनविणार टी. एस. मित्र. जळगांव.

आकोल्याचे सोल एजंट- चमन कंपनी.

पत्ता— ताजनापेठ बाजार- आकोला.

नो. नं. १९

**Oriental Government Security**

**Life Assurance Company, Limited,**

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

R. PATERSON BROWN, MANAGER.

**FUNDS EXCEED 4½ CRORES.**

Claims paid for over 3½ Crores.

***ALL PERSONS***

WHO ASSURE FOR THE FIRST TIME
OR
WHO INCREASE THEIR PRESENT ASSURANCE
WITH

***THE ORIENTAL***

BY EFFECTING A WITH PROFIT POLICY
ON OR BEFORE 31 ST DECEMBER 1913 WILL BE ENTITLED TO

**THREE YEARS BONUS**

PROVIDED
THREE YEARS PREMIUMS HAVE BEEN PAID
AND
THE POLICY IS IN FORCE ON 31St DECEMBER 1915.

prospectus, forms, and further information can be obtained on application to—
CHIEF AGENCY FOR C. P. BERARS AND KHANDESH,—
NAGPUR.

M. DESOUZA
CHIEF AGENT
*Nagpur.*

No N. 10

अनुभवांत योग्य

सुवर्ण पदक मिळालेले

**ओटोमोहिनी**

टिकाऊ, आनंद दायक, सुगंधी पदार्थ. जर येणी [illegible] मो[illegible] सुमारे चार दिवसांत उडून जातो असें प्रमाणसिद्ध करून दाखवील तर त्यास [illegible] बक्षीस देऊं, तर एकदां अवश्य १ बाटली खरीदी करून अनुभव [illegible] व बक्षीसास तयार व्हावें. ॥ औंसाच्या बाटलीची किंमत २ [illegible] ड्रामाच्या नळीस १२ आणे. ओटो मोहिनीचे सुगंधी कागद [illegible]

मिळण्याचा पत्ता—ओरियेंटल ड्रग आणि केमिकल कंपनी सोल प्रोप्रायटर्स जुमा मसजिद मुंबई

नो. नं. २१

**वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.**

नामर्दास मर्द बनविणारी

**राजवंशी नवरत्न याकुती,**

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

**राजवंशी सांध्याचें तेल,**

किंमत रुपये ९ ट्रेड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपार शक्ती मिळविली आहे.

सरकारचे अॅनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

**परमा सायरप**

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध- एक [illegible] अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज कि० ३ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट, यांचा दवाखाना.
२८ जांवळी मोहल्ला मुंबई.

नो० नं० २५

सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा



डॉ० वामन गोपाळ यांचा

**आयोडाईज्ड सार्सापरिला.**



हा सार्सापरिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धीवर गुण वाटून इतर रक्तशुद्धी करणाऱ्या औषधांत "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे. जुना मधुमेहात, त्वचे संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याची सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे. याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यास उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाण:-- डॉ गोतमराव केशव
५६३ ठाकुरद्वार मुंबई.

नो० नं० २३

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनी सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

पुरवणी--आकोला वऱ्हाडसमाचार सोमवार तारीख २७।४।१४

## नोटीस

नोटीस बेशमी १ गणपत २ संपत वल्द दावळ धोबी लक्ष्मी मर्द दावळ धोबी सव राहणार तादळी बु॥ ता० बाळापूर यासः—

खालीं सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचा बाप दावळ व माझा बाप रामजी हे सखे बंधू होते व ते एकत्र राहत होते. तुमची माझी मौजे तादळी बु॥ येथील वडिलोपार्जीत जागा लांब हात १६ रुंदी हात ९ यापैकीं निम्मे हिशाची माझी जागा निराळी पडली होती ती माझ्या ताब्यात असून मी कांहीं दिवस दुसरे गांवी गेल्यामागें त्या जागेवर तुम्ही गैर हक्कानें चार वर्षे झालीं नवीन वांधे बसविले. व माझ्या पाडित जागेतील माती नेऊन तुम्ही आपले कोठे बांधले आहे. सदरहु जागेवर तुमचा काहीं हक्क संबंध नाहीं. तुमची आई लक्ष्मी ही माझ्या विरुद्ध असून तिचे मनात जागा बळकावून बसण्याचा विचार झालेला आहे. याकरितां तुम्हास कळविण्यात येते कीं ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांत माझे निम्मे हिशाची जागा माझे ताब्यात द्यावी. तसें न केल्यास मी कोर्टामार्फत दावा करून जागेचा ताबा घेईन व त्या दाव्याचा खर्च व या नोटिसीचा खर्च तुमच्यावर पडेल. कळावें ता० १३-४-१४ इसवी

सही

सीताराम वा। रामजी धोबी रा० तांदळी बु॥ नि. खुद्द आंगठा असे हल्लीं मुक्काम आकोला

ना. नं. २६

## नोटीस

नोटीस बेशमी विठोबा वल्लद ईश्रामजी जोगदंड गुरव राहणार मौजे हुडी तालुके पुसद जिल्हा येवतमाळ यासी—

नोटीस देणार गंगुबाई मर्द विठोबा जोगदंड गुरव राहणार मौजे गोरेगांव तालुके हिंगोली जिल्हा परभणी इलाखा मोगलाई इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही माझे लग्नाचे नवरे आहात तुमच्याशी व माझ्याशीं लग्न लागल्यास अजमासे सुमारें १३।१४ वर्षे झालीं आहेत व मनला रुतु प्राप्त झाल्यास ही अजमास १०।११ वर्षे झालीं आहेत तुम्ही मनला रुतु प्राप्त झाल्यावर आपले घरीं एक वर्ष रितीप्रमाणें माझ्याशीं नांदार केला व पुढें माझा काहीं अपराध वगैरे नसून तुम्ही आपले घरचे माझा अंगावरील डागीनें काढून घेऊन मनला विनाकारण आपले घरातून काढून दिले त्यास आजमास वर्षे ८।९ होत आलीं आहेत तेव्हापासून मी मौजे गोरेगांव इलाखा मोगलाई या गांवीं माझ्या आईचे भावाचे सेनारी राहून लोकाचे कर्ज काढून आपला उदरनिर्वाह करीत आहे हल्लीं लोकाचे देणें फार झाल्यामुळें पुढें आतां कोणी पैसा कर्ज देऊंशकत नाहीं व कर्ज झालेल्या लोकाचा तगादा मनवर चालु आहे सबब यानोटीसीनें तुम्हास कळविण्यांत येते कीं तुम्हास ही नोटीस पावल्या तारखे पसून आठ दिवसाचे आत तुम्ही गोरेगाव येथें यावे व मनला झालेले कर्ज रुपये ४९० हे ज्याचे त्यास देऊन टाकावे व पुढें मनला चांगल्या तऱ्हेनें नांदविणें असल्यास दोन चागले भरवशालायक जामीन देऊन मनला नांदविण्यास घेऊन जावे या प्रमाणें न केल्यास मी जी ही नोटीस दिली आहे हीच फारकती आहे असे समजून माझ्या मनाप्रमाणें मी वर्तन करीन अगर दुसरा घरठाव करीन पुढें मग तुमचा मनवर हिंदु धर्मशास्त्राप्रमाणें लग्न संबंधाचा वगैरे कोणताच बिलकुल हक्क राहणार नाहीं व चालणार ही नाहीं कळावें तारीख ८।४।१४ ई० दस्तुर हरि सखाराम अर्जनवीस वाशिम

सही

गंगु मर्द विठोबा गुरव राहणार गोरगांव इची खुद्द हातची

नं. २७ निशाणी बांगडी

## नोटीस

विद्यमान सब जज साहेब खामगांव

सकसेशन नंबर १ सन १९१४

मयत धनकोरी रा. सेगांव तालुके खामगांव इचे जिनगीचे वारसाचे सर्टिफिकीट संबंधीं अर्ज—

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं धनकोरी ही तारीख ४-१-१९१० इ० रोजीं मयत झाली असून तिचे वारस सारंगपाणी पुनम बाल्मा रा. सेगांव यानें धनकोरीचे जिनगीचे वारसाचे सर्टिफिकीट मिळण्याविषयीं या कोर्टांत अर्ज केला आहे तरी सारंगपाणी याजला सर्टिफिकीट देण्याबद्दल ज्या कोणाची हरकत असल त्यानी या कोर्टात तारीख २०-६-१९१४ रोजीं हजर होऊन आपली हरकत दर्शवावी. तसें न केल्यास सारंगपाणी याजला वारसाचे सर्टिफिकेट दिलें जाईल. कळावें आज तारीख २१-४-१९१४

आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

Y. M CHITNIS.
Sub Judge
Khamgaon

नो नं० २८

## नोटीस

नोटीस शेखतुराब वा। शेखछन्नु मुसलमान रा० कुरम याजकडून तमाम सर्व लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं;—

नामदारखां वा। बिसमिल्लाखां मुसलमान रा० मुर्तिजापूर वय अंदाज ३५ हा सुमारें ६ वर्षे झाली मुर्तिजापूर सोडून दुसऱ्या कोणत्या ठिकाणी गेला याचा पत्ता नाहीं. त्याच्या पाठीमागें त्याची लहान बायको रहिमानबी मर्द नामदारखां वय १८ हा आहे. व त्याची एक आई आहे. सदरहु इसमाचा तपास त्याचे आईजवळ केला असता काहीं लागत नाहीं तरी ह्याच्यासंबंधीं कोणास कांहीं माहिती व पत्ता माहीत असल्यास ती त्यानें खालीं सही करणार याजला मेहरबानी करून कळवावी.

सदरहु इसम मयत झाला असेंही खालीं सही करणार याच्या ऐकण्यांत आहे तरी जी काहीं माहिती कोणास असेल ती कळविणें.

सदरहु नोटीस देणार शेखतुराब हा रहिमानबीचा चुलत भाऊ असून हल्लीं रहिमानबी ही त्याचेजवळ आहे तरी नामदारखां संबंधानें जी कांहीं माहिती कोणास असेल त्यानें खालीं सही करणार यास मेहरबानी करून कळविणें. ही नोटीस दिली ता० २५-४-१४

सही

शेखतुराब बल्लद शेखछन्नु मुक्काम कुरम द० खु०

नो० नं० २९

## नोटीस

यशवंता वा। फकीरजी शिंपी राहणार आलेगांव ता० बाळापूर यांस नोटीस देणार तुकाराम वा। विठोबा जिरे माळी राहणार आलेगांव ता० बाळापूर

मी खालीं सही करणार तुकाराम वा। विठोबा या लेखाच्या द्वारें तुम्हांस अशी नोटीस देतो कीं तुम्ही मजकडून ता० ९।१२।१३ इ. रोजीं एक प्रॉमेसरीनोट रु० २५ चा व एक पुर्जा रु० ७५ चा असे दोन दस्तैवज करून घेतले. सदरहु दोन्ही दस्तैवजांचा भरणा मजला मुळींच मिळाला नसून आजवर ही तुम्ही दिला नाहीं. सबब सदरहु प्रॉमेसरीनोट व पुर्जा ह्या दोन्ही दस्तैवजांचे मण्याचे रुपये तुम्ही आम्हास ही नोटीस पोंचल्यापासून आठ दिवसाचे आंत पोंहोंचते करावें तसे न केल्यास सदरहु दोन्ही दस्तैवज पोकळ व बिन भरण्याचे असून सबब रद्द आहेत असे समजावे. त्यावरून आम्ही कोणच्याही तऱ्हेनें जबाबदार राहणार नाहीं. ही नोटीस ता० सही

तुकाराम विठोबा जिरे माळी रा० आलेगाव हातची निशानी

नो० नं० ३०

## नोटीस.

रा. रा. हंसराज कुंदनमल मारवाडी दुकान मलकापूर यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही दोड दीन वर्षांपूर्वीं माझे मालकीचे शेत सर्वे नंबर ३१ सालीम देवधाबे येथील या शेताचे खरेदीखत रक्कम रुपये ३००० तीन हजाराचे करून घेतले. व त्यात भरणा २००० दोन हजाराचा वामन मोतीराम दवधाबेकर यांस गहाणाचा रक्कम देण्याचा दर्शविला. व १००० हजार रुपये मला मे. सबरजिस्टर समोर कबुल करावयास लाविले व मीं तुमचे विश्वासावर सर्व भरण्या संबंधी कबुल केले. तेव्हापासून आतांपावेतो तुम्ही गहाणाचे हवाल्याचे रुपये २००० दोन हजार वामन मोतीराम यास दिले नाहींत व मला ही १००० हजार रुपये दिले नाहींत मी रु. मागता मागता टणकून गेलो. शेवटीं मला तुमच्या ह्या थाप ऐकून ऐकून कंटाळवाणें झाले आहे. तुमच्यासारख्या मोठ्या दुकानास ह्या गोष्टी कशा शोभतात हें समजत नाहीं. तुम्ही कदाचित भरणा दिल्याबद्दल आपल्या वहीत जमाखर्च केला असल्यास मला तो अगदीं कबूल होणार नाहीं. असो ज्या अर्थी तुम्ही गहाणाचे हवाल्याचे २००० रुपये दिलें नाहींत व मला ही १००० हजार रुपये दिले नाहींत त्या अर्थी मला आपला खरेदीचा सवदा कोणत्याही रीतीनें कबूल नाहीं. व मी आपल्या खरेदीचे व्यवहारांस बांधला जात नाहीं. मी माझे शेताचा पूर्ण मालक असून मी दुसऱ्यास विकण्यांस ही पूर्ण अधिकारी आहे. जर कदाचित तुम्ही यापुढें माझवर शेताचा ताबा अगर नुकसानीं बद्दल दावा केल्यास त्याबद्दल मी स्वतः कोणत्याही तऱ्हेनें जबाबदार राहणार नाहीं व फिर्यादीचे खर्चासही पात्र होणार नाहीं. करितां तुम्हास या नोटीसीनें कळविले आहे. विश्वासाचे ठिकाणीं असा अविश्वास होईल असें वाटलें नव्हतें. कळावे ता. २२-४-१४ इ.

दस्तुर रामचंद्र रमाकांत ईंगळे पी. रायत

सही

मोतीराम वा। देवमण पारधी रा. देवधाबे नि. खु

नो. नं. ३१

## नोटीस

नोटीस कलम ११ एक्ट ८ सन १८९० प्रमाणें.

किरकोळ मुकदमा नंबर ३७ सन १९१४ ई.

विद्यमान डि. जज्ज साहेब याचे कोर्ट मुक्काम आकोला

नांव जैराम भट

बापाचें नांव बापु भट जोशी

जात ब्राह्मण राहणार देगांव

तहसील बाळापूर जिल्हे आकोला

ज्या अल्पवयी कवसीबाई उमर वर्ष ११॥

राहणार मानकी तहसिलीचे (२)

बाळापूर साठीं पालन कर्ता (१)

नेमण्या विषयींच्या अर्जा संबंधी

(३)

सर्वत्र लोकांस यांस

सदहू अर्जदारानें सदहू अल्पवयीचें (२) स्वतः व त्याची मालमत्ता साठीं पालन कर्ता (४) नेमण्या विषयीं अर्ज केल्या वरून सदहू अर्जाची सुनावणी व चौकशी ची तारीख १८ माहे ६ सन १९१४ ई० रोजीं नेमिली आहे, त्यावरून अशी नोटीस देण्यात येत आहे कीं, सदहू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर कोणास काहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जा संबंधीं सर्व मुद्याच्या सवालाचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालाचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टात हाजर झाले पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यात येत आहे कीं, सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल.

आज तारीख २३ माहे ४ सन १९१४ ई० रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्यानिशीं दिली.

शिक्का. G. W. Bapat
A. D. J.
for
डि. जज्ज. आकोला

नो. नं. ३२